# १

# सनातनपंथी आर्थिक विचारांची सुरुवात

**घटक रचना :**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ व्यापारवाद

१.४ निसर्गवाद

१.५ अॅडम स्मिथ

१.६ सारांश

१.७ प्रश्नाभ्यास

## १.१ उद्दिष्टे

- आर्थिक विचारांच्या इतिहासाची माहिती घेणे.
- आर्थिक विचारांचा विकास समजून घेणे.
- व्यापारवाद-निसर्गवाद संकल्पनांना जाणून घेणे.
- सनातनवादी अर्थतज्ञांची ओळख करुन घेणे.
- अॅडम स्मिथ यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

## १.२ प्रास्ताविक

आर्थिक विचारांच्या इतिहासाला समजून घेण्यासाठी आपणांस आर्थिक विचार व आर्थिक इतिहास या दोन बाजूंना समजणे महत्त्वाचे आहे, आर्थिक परिप्रेक्षामध्ये, मानवाने जीवनास समृद्ध करण्यासाठी व समाधान प्राप्तीसाठी व्यापार, उपयोग, वाहतूक व यांसारख्या अनेक संस्था निर्माण केल्या. या सर्व बाबी भौतिक घटकात नमूद केल्या जातात. ही भौतिक संस्कृती मानवी आर्थिक विकासाचा एक भाग होती, काळानूरूप या भौतिक साधनांची आर्थिक इतिहास म्हणून नोंद केली गेली, कारण आर्थिक विकासाच्या टप्प्यांमध्ये या साधनांना अधिक महत्त्व प्राप्त आहे. मानवी विकासात आर्थिक साधने महत्त्वपूर्ण ठरत असतानाच, या साधनांच्या वापर व तंत्राबद्दल काही विचार पूढे येऊ लागले. संस्थांच्या कार्यपद्धतीच्या संकल्पना, पद्धती तसेच कामगार व तंत्र यासारख्या घटकांचे परिचालन या संदर्भात भाष्य, विवेचन व विचारांची परिक्रमा तयार झाली. बदलत्या वेळेनुसार तत्त्वे, सिद्धांत, मूल्ये व नियमांमध्येही सुधार घडून आले, या सगळ्या एकत्रित प्रभावशाली विचारानांच आर्थिक विचार असे संबोधले जाते.

munotes.in

आर्थिक विचारांच्या इतिहासाचा अभ्यास तीन कालखंडामध्ये विभागून केला जाऊ शकतो. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळ, प्राचीन आर्थिक विचारांमध्ये हिब्रू संस्कृती (Hibrew Culture) आणि हिंदू संस्कृतीचे (Hindu Culture) विचार अभ्यासायला मिळतात. प्राचीन कालखंडात ग्रीकमध्ये आर्थिक विचार श्रमविभागणी, समाज उत्पत्ती, कृषी लाभ आणि कामगार संरक्षण (दास मुक्ती) या काही मुद्यांवरती मांडले गेले होते. यात मुख्यत: प्लेटो, ॲरीस्टॉटल आणि झेनॉफोन या विचारवंतांचा समावेश होता. याच काळात भारतामध्ये वेदांचे प्रमाण मानले जात होते. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद मधून अनुक्रमे ज्ञान, कर्म, उपासना व विज्ञानाची अनुभूती आहे, मध्ययुगीन आर्थिक विचारांवर मुख्यत: नैतिक मुल्यांचा प्रभाव होता. युरोपमध्ये मध्ययुगात समाज आणि आर्थिक घटक यांतील संबंधाची सरंजाम रचना होती, यात रोमन कॅथोलिक चर्चचा अधिक प्रभाव दिसून येतो. भारतामध्ये शतक दहा ते पंधरा कालावधीत संत कवी कबीर, तुलसीदास, सुरदास व मीराबाई यांनी जाती व्यवस्था, बंधूता, कामगारांचा सन्मान व संपत्तीच्या अधिकारांवर भाष्य केले. मुस्लीम राजवटीत गुलाम, खिलजी, तुघलक, लोदी व मुघल असे काही कालावधी गणले जातात. मध्ययुगीन काळातील विचाराला शतक पंधरापर्यंत विरोध झाला नाही, परंतू या जुन्या व्यवस्थेला विरोध सुरुळ होऊन, आर्थिक जीवनाची पुनर्रचना करण्याचा काळ सुरुळ झाला. वाणिज्य पद्धत, कोल्बर्टवाद, व्यापार पद्धत, व्यापार वाद इत्यादी अनेक नावे समोर येऊ लागली.

## १.३ व्यापारवाद (MERCANTILISM)

युरोपमध्ये सोळाव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत आर्थिक विचारांचा एक वर्ग प्रचलित होता, यास व्यापारवाद म्हणतात. फ्रान्समध्ये याच वर्गास कोल्बर्टवाद असे संबोधतात. कारण फ्रान्सच्या लुईस् XIV या राजाचा अर्थमंत्री कोल्बर्ट हा व्यापारी धोरणांचा समर्थक होता. कोल्बर्टने सत्तेसाठी आर्थिक शक्तीचे महत्त्व जाणले होते. युरोपमध्ये या कालखंडामध्ये व्यापारी, उद्योजक, राजे व प्रशासक यांच्याच विचारांतून व्यापारवाद उदयास आला. त्यांनी वेगवेगळी कागदपत्रे, प्रशासनातील दस्तावेज व लेख जे आर्थिक समस्या व इतर घटकांच्या संबंधातील आहेत यांचे जतन केले. यावरुन आपणांस हे लक्षात येते की, व्यापारवाद हा राजसत्ता व व्यापारी वर्गाच्या हितास धरुन उदयास आला.

**व्याख्या :**

प्रा. स्पॅन यांच्या मते, ’त्या काळाच्या आर्थिक जीवनात, राज्यकर्ते आणि व्यापारी यांनी ज्या तत्त्वांचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग केला त्यांचा एकत्रितपणे निर्देश करण्यासाठी स्थुलमानाने व्यापारवाद हा शब्दप्रयोग केला जातो.“

इमॉलर यांच्या मते, ’व्यापारवाद म्हणजे केवळ राज्याची निर्मिती किंवा आर्थिक बाजूने राज्य निर्माण करणे होय.“

प्रा. लॅक्चमन यांच्या मते, ’व्यापारवाद म्हणजे मार्ग रोखण्याऱ्या मध्ययुगीन विचाराविरुद्ध व रुढींविरुद्ध उभारलेले बंड होय.“

प्रा. एल.एच. हॅने यांच्या नुसार, 'शतक सोळा ते अठराव्या उत्तरार्धापर्यंत युरोपातील राज्यकर्त्यांमध्ये जे अर्थशास्त्रीय विचार प्रचलित होते, एकत्रितपणे अशा सर्व विचारांना व्यापारवाद असे म्हणतात."

वरील सर्व व्याख्यांमध्ये शतक सोळा ते अठरामधील आर्थिक विचार, मध्ययुगीन विचाराविरुद्ध होते हे लक्षात येते. युरोपातील राजकारणी उद्योगपती, व्यापारी व प्रशासक यांचा या वर्गात समावेश होता.

**व्यापारवाद्यांवरील टिपण्णी :**

सर थॉमस मन (१५७१-१६४१) हे ईस्ट इंडिया कंपनीच्या इंग्लीश व्यापारी सर्कलचे संचालक होते. यांनी 'अ डिस्कोर्स ऑफ ट्रेड फ्रॉम इंग्लंड इन टू द इस्ट इंडीज' (१६२१) आणि 'इंग्लंडस् ट्रीजर बाय फॉरेन ट्रेड' (१६३०) पुस्तके लिहिली.

सर जोमिइ चाइल्ड (१६३०-१६९९) इंग्रजी व्यापारी, यांनी 'डिस्कोर्स ऑन ट्रेड' साठी योगदान दिले आहे.

रिचार्ड कॅन्टीलीय्न (१६३०-१६९९) फ्रेन्च व्यापारी, यांनी 'एसे ऑन द नेचर ऑफ कॉमर्स इन जनरल' ह्या ग्रंथांचे लेखन केले.

सर जेमस् स्टुअर्ट (१७१२-१७८०) व्यापारवादाचा शेवटचा तत्वज्ञ असे यांना संबोधले जाते. यांनी 'ॲन इनक्वायरी इन टू द प्रिंसीपल्स् ऑफ पॉलिटिकल इकोनॉमी' ग्रंथांचे लेखन केले.

जीन बाप्टीस कोल्बर्ट (१६१९-१६८३) फ्रेन्च अर्थमंत्री (लुईस् XIV) यांनी प्रायोगिक विवरण देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. व्यापारवादास राज्यामध्ये अंमलात आणले.

**व्यापारवादाच्या उन्नतीचे घटक :**

व्यापारवादाच्या विचारांमध्ये अनेक विसंगती व वेगळेपण दिसून येते, कारण व्यापारवाद तीन शतकांच्या काळामध्ये अनेक देशांमध्ये पसरला होता, तरीही व्यापारवादाच्या काही मूलभूत संकल्पना होत्या ज्या खालीलप्रमाणे आहेत.

i. सोने व चांदी ही दोन महत्त्वाची व लोकप्रिय साधने राज्याच्या बळकटीस व समृद्धीस उपयोगात येत होती.
ii. त्या साधनांना विदेशी व्यापारामधून प्राप्त करता येत होते. जर निर्यात जास्त व आयात कमी असेल तर याचा फायदा राज्याच्या तिजोरीत होत होता.
iii. मोठ्या प्रमाणावर संतुलीत व्यापारशर्ती निर्माण करण्यासाठी देशाच्या अंतर्गत उत्पादनावर भर देणे आवश्यक होते, यामुळे निर्यात जास्त व आयात कमी होऊन व्यापारशर्ती अनुकूल राहतील.

**व्यापारवादातील विचार व वैशिष्ट्ये :**

**१) पैशाचे महत्त्व :**

काही व्यापारवादी मौल्यवान धातु, सोने व चांदी यांस अत्यंत लोकप्रिय व किंमती साधन म्हणून संपत्तीच्या दृष्टीने महत्त्व देत होते. राज्यातील / देशातील सर्व आर्थिक क्रिया /

munotes.in

व्यवहार हे सोने व चांदी वाढविण्याच्या हेतूने केली जात होती. या काळात 'अधिक सोने - अधिक संपत्ती - अधिक शक्ती" असे सुत्रच बनले होते. विनिमय अर्थव्यवस्थेमुळे, पैसा (सोने व चांदी आधारीत) हा प्रचलित होऊ लागला, कामगारांना मोबदला, सैनिकांचा पगार व विनिमयासाठी (दैनंदिन व्यवहारासाठी) पैशाची आवश्यकता भासू लागली. राज्य व प्रशासनामध्ये प्राप्ती (उत्पन्न) वाढीसाठी कराची धोरणे राबवून पैशाच्या माध्यमातून वसूली करण्यास सुरुवात झाली. काही कालावधीनंतर (शतक सोळावे) युद्धांमध्ये पैशाचा वापर होऊ लागला, यांत युद्ध जिंकण्यासाठी ही पैशाचे महत्त्व अधिक होते. म्हणूनच, 'पैसा, अधिक पैसा आणि अजून अधिक पैसा" अशी बोधवाक्ये युद्धांवेळी उद्गारली होती.

काही कालवधीनंतर, सर जेमस् स्टुअर्ट यांनी, 'पैसा हे केवळ विनिमयाचे साधन आहे.' असे प्रतिपादन करुन व्यापारवाद्यांच्या विचारांवर घाव घातला.

**२) विदेशी व्यापाराचे महत्त्व :**

एखाद्या देशास सामर्थ्य (शक्ती) प्राप्त करायच असेल त्यांनी सोने व चांदी अधिक कमवावे, जर असे असेल, तर फ्रान्स व इंग्लंडसारख्या देशांकडे सोने-चांदी जास्त नसताना अधिक वर्चस्व कसे? याचे उत्तर आहे - विदेशी व्यापार. निर्यात जास्त, आयात कमी आणि व्यापार संतुलन या सुत्राचे अवलंबन करणे, याप्रमाणेच व्यापारवादामध्ये विदेशी व्यापारास प्रथन स्थानी ठेवले होते. निर्यात कशाची करायची? एखाद्या देशात अधिक प्रमाणात उत्पादित होत असणाऱ्या वस्तू, ज्या वस्तूस अधिक मूल्य असेल. हे अधिकचे मूल्य आंतरराष्ट्रीय स्तरावर वाहतूक खर्चापेक्षा अधिक असावे. दूसऱ्या देशाकडून कमीत कमी आयात करणे. अंतर्गत उत्पादन, जरी ते कृषी उत्पादन (अन्न धान्य) असले तरी वाढवावे.

**३) उद्योग व व्यापार नियंत्रण :**

व्यापारवाद्यांचे असे उद्दिष्ट असायचे की, सरकारी नियंत्रणे, जकात यांसारख्या साधनांचा वापर करुन राष्ट्रीय उत्पादक कार्यक्षमता वाढवावी. निर्यात व आयात ही शेवटी उद्योग व व्यापारावर अवलंबून असते. यावर सरकारचे नियंत्रण असणे आवश्यक असते. सरकारच्या नियंत्रणाचे दोन भाग केले होते. (अ) अंगर्तत नियंत्रणे (ब) बाह्य नियंत्रणे

**अ) अंगर्तत नियंत्रणे :**

यामध्ये देशांतर्गत बाबींचा विचार केला होता, जसे देशांतर्गत मूल्य नियंत्रण, उत्पादित वस्तूचा दर्जा, श्रम नियंत्रण व अवगुण वस्तू कायदे इ. चा समावेश होता. मुल्य नियंत्रणासाठी 'कॉर्न लॉ' (Corn Law) चा उपयोग, म्हणजेच एखाद्या वस्तुची (धान्याची) किंमत एका टप्प्यापुढे गेली की, त्याची आयात करणेच फायद्याचे होते. श्रमीकांवर निर्बंध घालणारे नियमही लागू होते. इंग्लंडमध्ये तंबाखु, चहासारख्या वस्तूचा उपभोगसुद्धा मर्यादित करण्याचा प्रयत्न केला होता.

**ब) बाह्य नियंत्रण :**

यामध्ये जकाती, सागरी वाहतूक व अनूदान यांसारखी नियंत्रणे आहेत. इंग्लंडसारखा देश, सागरी वाहतूक केवळ सेवा वाढावी यासाठी कार्यरत नव्हता, तर इतर राष्ट्रांच्या सेवांवर मर्यादा घालण्यासाठी होता. देशाची आयात कमी होण्यासाठी जकात भरपूर होती.

### ४) नैसर्गिक साधने :

अन्नधान्य उत्पादनासाठी पडीक जमीनींचा वापर करणे, सागरी सत्ता मजबूत करण्यासाठी मासेमारीसारखे उद्योग करणे; जे परकीय संरक्षणाचाही भाग होता, अंतर्गत उद्योग सुधारण्यासाठी देशांत उपलब्ध संसाधनांचा वापर करुन, कच्चा माल पुरवणे, अशा विविध अंगांनी व्यापारवादी विचारांनी कार्य चालू ठेवले होते. नैसर्गिक साधने ही उद्योग व व्यापारासाठी प्राथमिक स्त्रोत म्हणून सेवा देण्याचा वाटा देत होती.

### ५) लोकसंख्या विचार :

लोकसंख्येच्या विपुलतेचा विचार व्यापारवाद्यांनी केला होता. अधिक लोकसंख्येमुळे श्रमपुरवठा व सैन्यबळात वाढ होते. जर देशातील अधिक लोकसंख्या गरीब असेल, तर शिक्षण, उद्योगांमधील प्रशिक्षण अधिक लोकांपर्यंत पोहचवण्याचे प्रयोग व्यापारवादी काळात केले होते. यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढून, देशात उत्पन्न जास्त होईल आणि यामुळे देशाचे सामर्थ्य वाढते.

### ६) सरकारी धोरणे :

व्यापारवादी विचारांप्रमाणे, व्यापारी देश विदेशी व्यापारात बलाढ्य होण्यासाठी आर्थिक क्रियाकलापांच्या निर्बंधासाठी व नियंत्रणासाठी सरकारचा हस्तक्षेप असणे महत्त्वाचे आहे. अनेक कायदे जसे की, कॉन लॉ, नेविगेशन लॉ आणि अन्नधान्यांवरील इतर कायदे या व्यापारी लोभापोटी व कायद्याच्या अनुषंगाने बनवले होते. व्यापारवादी विचारांमध्ये 'सरकारी हस्तक्षेप' सर्वात महत्त्वाचा भाग होता. ‘State intervention was an essential part of mercantilist doctrine’ या सर्व कार्यान्वयनासाठी प्रबळ शासनाची व प्रबळ राज्याची अत्यंत गरज होती. याशिवाय लोकांचे कल्याण होणे शक्य नव्हते, असे व्यापारवाद्यांचे प्रतिपादन होते.

### ७) युरोपीय देशांत व्यापारवादी कार्य :

युरोपमधील वेगवेगळ्या देशांत वेगळ्या नियमांची प्रचिती होते. त्या कालखंडामध्ये एक विशिष्ट आदर्शवादी व्यापारवादी संकल्पना प्रचलित नव्हती. त्यामुळे त्या-त्या नियमाच्या अनुषंगाने त्या-त्या देशाचा विचार करणे महत्त्वाचे ठरते.

**फ्रान्स :** व्यापारी नियमांत उद्योग अधिनियम, कोल्बर्टने दिलेल्या निर्देशनांनुसार अत्यंत महत्त्वाच्या स्थानी होते. नियंत्रण व निर्बंधांचे सर्व हक्क उद्योगांना, जे अमर्याद उत्पादन व संपत्ती प्राप्त करणार अशाना दिले होते. कायद्यानुसार उत्पादक व कामगार यांच्यातील संबंध, उत्पादनाची प्रक्रिया, दर्जा व वस्तूची हमी, उद्योगाचे स्थान उत्पादनातून मिळकत यासारख्या अनेक बिंदूंचे उल्लेख केले गेले होते.

**पर्शिया :** फ्रेडरीक विल्लीयम यांच्या निर्देशनांनुसार देशाच्या विकासात भर टाकण्यासाठी उद्योग व उत्पादक संस्थांचे कार्य चालू होते.

**इंग्लंड :** इंग्लंडमध्ये संतूलित व्यापारवादी कार्यक्रम लागू केले होते, जे टूडर किंगस् च्या नियंत्रणात होते. युद्ध व क्रांतीमुळे (१६८८) सत्ता ही अस्थिर होती. परंतु खरी शक्ती श्रीमंत जमीनदार व व्यापाऱ्यांकडेच होती. इंग्रजी व्यापारवाद्यांच्या दूसऱ्या भागामध्ये अंतर्गत उत्पादनाचे नियंत्रण व बाह्य आढावा यांचा प्रकोप दिसत होता.

अशाप्रकारे विशिष्ट व्यापारवादी कालखंडात अनेक देशांत वेगवेगळे नियम व विचार प्रचलित होते, जे एकाच केंद्राभोवती फिरणारे होते आणि ते केंद्र व्यापारी लाभाचे होते.

**व्यापारवादी विचाराचे मूल्यमापन :**

व्यापारवादी विचारसरणीचा कालखंड हा भांडवलशाहीच्या उदयाचा कालखंड मानला जातो, त्यामुळे आता जरी ते विचार योग्य वाटत नसले, तरी त्या-त्या काळात, त्या-त्या परिस्थितीत योग्य होते. व्यापारवादी हे अर्थशास्त्रामध्ये निपुण होते असे नाही, परंतु प्रत्यक्ष व प्रायोगिक आधारे प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासक व राज्यसत्तांना त्यांनी सल्ले व दिशा दिली. अशा भिन्न-भिन्न विचारांमुळे पुढे अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांनी विचारांतील समान सूत्र शोधून व्यापारवाद्यांवर व त्यांच्या धोरणांवर प्रखर टिका केली.

**१) पैसा हीच संपत्ती :** व्यापारवाद्यांच्या दृष्टीने पैसा हीच संपत्ती होती. स्मिथ यांच्या मते, वस्तू व सेवा म्हणजे संपत्ती होय. पैसा केवळ विनिमयाचे माध्यम आहे, साधन आहे, साध्य नव्हे.

**२) धातूचा संबंध कल्याणाशी :** व्यापारवाद्यांनी सोने व चांदीला अधिक महत्त्व देत, राष्ट्राच्या व लोकांच्या कल्याणाशी त्यांचा संबंध जोडला. हे कोणत्याही प्रकारे तर्कशुद्ध वाटत नाही.

**३) विदेशी व्यापारास अतिरेकी महत्त्व :** कोणत्याही देशाचा विकास करायचा असेल, तर सुरुवातीला अंतर्गत उत्पादनवाढीस महत्त्व द्यायला हवे. परंतु अनुकुल विदेशी व्यापाराला उच्च स्थान देण्यासाठी शेती क्षेत्राला न्याय दिला नाही.

**४) व्याज :** व्यापारवाद्यांचे विचार व्याजासंदर्भात स्पष्ट नव्हते. त्यांच्या मते, व्याज केवळ शासनाच्या अखत्यारीमध्ये येणारा घटक आहे.

**५) संरक्षण धोरण :** व्यापारवाद्यांनी निर्यात वाढीसाठी व आयात कमी करण्यासाठी अनुदान व जकातींचा आधार घेतला. मात्र ॲडम स्मिथ यांनी खुल्या व्यापारी धोरणाचा पुरस्कार केला. खुला व्यापार सर्व देशांसाठी फायदेशीर असतो, असे मत स्मिथ यांनी व्यक्त केले.

**६) अनुकूल व्यापारतोल :** व्यापारवाद्यांची याबाबत भूमिका स्पष्ट नव्हती. अनुकूल विदेशी व्यापारशेष म्हणजे देशाचा दीर्घकालीन फायदा हे तत्त्व आज लागू होत नाही. विकसनशील राष्ट्रसंदर्भात हे विधान अव्यवहार्य आहे.

**७) अनियंत्रित राजेशाही :** व्यापारवाद्यांनी राष्ट्र विकसित व बलशाली करण्यासाठी सरकारी हस्तक्षेप अत्यंत महत्त्वाचा मानला. मात्र एवढे अधिक नियंत्रण व अधिकार राजसत्तेस व शासनास देणे लोकांच्या व समाजाच्या कल्याणासाठी अयोग्य आहे.

व्यापारवाद ही मध्ययुगीन व्यवस्थेविरुद्धची प्रतिक्रिया होती. सरंजामशाही व्यवस्थेला व्यापारी / भांडवलशाही रूप देण्याचा व देशास शक्तीशाली बनविण्याचा हा प्रयत्न होता. अर्थशास्त्रीय विचारांच्या इतिहासात व्यापारवाद्यांचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे.

munotes.in

## १.४ निसर्गवाद

"Physiocratie" (फिजीओक्रेट) हा शब्द फ्रेंच भाषेचा असला तरी त्याची मुळे ग्रीक भाषेतील आहेत. याचा अर्थ निसर्गाचे नियम (Rule of Nature) असा होतो. प्रभावशाली फ्रेंच विचारवंताचा वर्ग शतक अठरामध्ये क्वेने (Quesnay), तरगो (Turgot) यांच्या निसर्ग नियमांवरील विश्वासाचारीत होता. यांनाच निसर्गवादी असे म्हणतात. अर्थव्यवस्थेसाठी कृषी क्षेत्र महत्त्वाचे आहे, असे मानणाऱ्या विचारास ॲडम स्मिथ यांनी 'कृषीवादी वर्ग' असे संबोधले आहे.

**निसर्गवादी आर्थिक तत्वे :**




**आकृती क्र.१.१**

**अ) निसर्ग व्यवस्था :**

दूपो नेमुर (Dupont De Nemours) यांच्या मते, 'निसर्गवाद म्हणजे नैसर्गिक व्यवस्थेचे किंवा नैसर्गिक पद्धतीचे शास्त्र होय." (The Science of Natural order)

Physiocratie शब्दाचा अर्थच 'निसर्गाचे नियम' असा होतो. मानवी जीवन सुखी करण्यासाठी निसर्गसत्ता काम करत असते. त्यामुळे निसर्गव्यवस्था सर्वव्यापी व अपरिवर्तनीय असते. निसर्गवादी असा विचार करतात की, समाजातील वाईट घटना ह्या चुकीची समाज व्यवस्था व निसर्ग नियमांचे पालन न केल्यामुळे घडत आहेत. त्यामुळे सर्व मनुष्यजनांनी निसर्ग शक्तीस सर्वोच्च मानायला हवे. निसर्ग नियमानुसार समाज रचना / व्यवस्था दुरुस्त करायला हवी. निसर्गवादी निसर्ग व्यवस्थेची स्पष्टोक्ती करत नाहीत. कारण निसर्ग व्यवस्था ही न समजणारी व किचकट संकल्पना आहे.

निसर्गवाद्यांनी व्यक्ती स्वातंत्र्यावर भर दिला आहे. मात्र व्यक्तिस्वातंत्र्याचा गैरवापर होत असेल तर शासनाने हस्तक्षेप करावा; ही बाब निसर्गवाद्यांना मान्य होती. नैसर्गिक व्यवस्थेतून निसर्गवाद्यांचे व्यावहारिक धोरणही स्पष्ट होते. त्यांच्या मते, 'शेतकरी दरिद्री असल्यामुळे राज्य गरीब राहिल व राज्य गरीब असेल तर राजासुद्धा गरीब राहील." यासाठी नैसर्गिक व्यवस्थेचे / नियमांचे पालन करावे. त्यांच्या मते, नैसर्गिक व्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे, तिची माहिती करून घेणे मानवाचे पहिले कर्तव्य होय आणि पालन करणे हे दूसरे कर्तव्य होय.

**ब) निव्वळ उत्पादन :**

निसर्गवादामध्ये संपत्तीचे उत्पादक क्षेत्र म्हणून कृषीस महत्त्व दिले होते, ज्यामध्ये लोक सहकार्य करुन निसर्गाशी एकरूप होत होते, शेती हा असा व्यवसाय आहे की जो अधिक्य निर्माण करतो. शेती म्हणजे केवळ लागवड नसून यात पशुपालन, मासेमारी व खाण उद्योगाचा समावेश होतो. शेतीमधून शेतकऱ्यांच्या गरजेपेक्षा जास्त उत्पादन होते, म्हणूनच व्यापार व उद्योगाची वाढ होते.

नवीन संपत्ती निर्माण होत असताना किंवा उत्पादन होत असताना अस्तित्वात असलेल्या संपत्तीचा काही भाग नष्ट होत असतो. एकूण उत्पादनामधून नष्ट झालेली संपत्ती वजा केल्यास जी संपत्ती / उत्पादन राहते, त्यास निव्वळ उत्पादन / उत्पन्न असे म्हणतात.

हे निव्वळ उत्पन्न / उत्पादन शेतीतूनच प्राप्त होते, असे निसर्गवाद्यांनी शेतीचे श्रेष्ठत्व वाढवले आणि इतर सर्व व्यवसायास अनुत्पादक व्यवसाय मानले. व्यापारात अथवा कारखानदारीत (उद्योगात) मुळ मालाच्या किंमतीत वाढ होते. मात्र ती श्रमाच्या व भांडवलाच्या मोबदल्या इतकीच असते. निसर्गवाद्यांच्या मते, उद्योग व व्यापार हे व्यवसाय मूल्यांची बेरीज करतात, मुल्यांची निर्मिती करत नाहीत.




**आकृती क्र. १.२**

वरील आकृतीमध्ये OX ह्या अक्षावर उत्पादन दर्शविले आहे. OY अक्षावर उत्पन्न व खर्च दाखवले आहे. शेतीचे एकूण उत्पादन ONM ते सी.उ.व. (सीमांत उत्पादकता वक्र) ने रेखाटला आहे. एकूण खर्च OBCM एवढा आहे. त्यामुळे निव्वळ उत्पादन पुढीलप्रमाणे.

munotes.in

निव्वळ उत्पादन = एकूण उत्पादन - उत्पादन खर्च

$$x = ONM - OBCM$$
$$x = ONM - OBCM$$
$$x = NBC$$

निव्वळ उत्पादन = NBC (रेखांकित केलेला भाग)

शेतीमध्ये जास्तीत-जास्त भांडवल गुंतवणूक करुन अधिकाधिक अधिक्य निर्माण करावे, असे निसर्गवाद्यांचे मत होते. सरकारचे धोरण ही यास अनुसरुन असावे. शेती व्यवसायात निर्माण होणारी संपत्ती इतर व्यवसायात खेचण्याचे काम व्यापारी व उद्योजक करतात. उद्योगात कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालात केले जाते, त्यामुळे उत्पन्न मिळते पण वाढावा नाही. म्हणून हा व्यवसाय अनुत्पादक असतो आणि यात गुंतलेले श्रमही अनुत्पादक गणले जाते.

**क) संपत्तीचे वितरण :**

निसर्गवाद्यांचे मते, संपत्ती म्हणजेच निव्वळ उत्पन्नाचे / उत्पादनाचे वितरण काही वर्गांमध्ये होत असते, ज्यास आर्थिक तक्त्याद्वारे (Tableau Economique) विश्लेषित केले. प्रसिद्ध निसर्गवादी अर्थतज्ञ डॉ. क्वेने (Quesney) यांनी हा तक्ता समाजातील तीन वर्गांना विचारात घेऊन तयार केला, जो १७५८ मध्ये फ्रान्सचा राजा लुई १५ वा यासमोर सादर केला.

**तीन वर्गात विभागणी :**

१) उत्पादक वर्ग (The Productive Class) - शेतकरी

२) जमीनदार वर्ग (The Land Proprietors) - जमीनदार

३) अनुत्पादक वर्ग (The Unproductive Class) - व्यापारी, उद्योगपती, मजूर इ.

**आर्थिक तक्ता / संपत्ती वितरण :**

डॉ. क्वेने यांच्यानुसार शेतातील उत्पादन मुख्यत: जमीनदार वर्गामुळे होते. कारण जमीनीस उत्पादक करण्यासाठी जमीनदार कष्ट घेतात. समजा, शेतकऱ्यांनी (उत्पादक वर्गानी) १० कोटी रुपयांची संपत्ती निर्माण केली. यापैकी ०४ कोटी रुपये शेतकरी स्वत:च्या व पाळीव पशुंच्या उपजीविकेसाठी किंवा बी-बियाणांसाठी बचत करतो. म्हणून ही रक्कम त्याच्या स्वत:साठी स्वत:जवळ राहते. उर्वरीत ०६ कोटी संपत्तीचे वितरण करण्यासाठी उरतात.

उत्पादक वर्ग उर्वरित ०६ कोटी पैकी, ०४ कोटी खंड म्हणून जमीनदारास देईल व ०२ कोटी अनुत्पादक वर्गाकडून शेतीस लागणारे साधन, वस्तू खरेदी करेल.

०४ कोटी + ०४ कोटी + ०४ कोटी
(उत्पादक वर्ग) (जमीनदार वर्ग) (अनुत्पादक वर्ग) } दूसरा टप्पा

| टप्पा | उत्पादक वर्ग | जमीनदार वर्ग | अनुत्पादक वर्ग |
|---|---|---|---|
| I | १० कोटी | ०० कोटी | ०० कोटी |
| II | ०४ कोटी (स्वतः) | ०४ कोटी (खंड) | ०४ कोटी (वस्तू) |
| | ०२ कोटी | | ०२ कोटी |
| III | ०६ कोटी | ०० कोटी | ०४ कोटी |
| | ०४ कोटी | | |
| IV | १० कोटी | ०० कोटी | ०० कोटी |

संपत्ती वितरणाच्या तिसऱ्या टप्प्यात जमीनदार वर्ग स्वत:कडे खंड स्वरूपात प्राप्त असलेले ०४ कोटी पैकी ०२-०२ कोटी रुपयाचे शेतकऱ्याकडून अन्नधान्य व अनुत्पादक वर्गाकडून उत्पादन माल, वस्तू खरेदी करेल म्हणजे स्वत:कडे शुन्य शिल्लक राहील.

०६ कोटी + ०० कोटी + ०४ कोटी
(उत्पादक वर्ग) (जमीनदार वर्ग) (अनुत्पादक वर्ग) } तिसरा टप्पा

चौथ्या टप्प्यात, अनुत्पादक वर्गाकडे असलेले ०४ कोटी यापैकी ०२ कोटी शेतकरी (उत्पादक वर्ग) कडून अन्नधान्य व ०२ कोटी रुपयांचा कच्चा माल खरेदी करेल. त्यामुळे अनुत्पादक वर्गाकडे ०० कोटी रुपये उरतील.

१० कोटी + ०० कोटी + ०० कोटी
(उत्पादक वर्ग) (जमीनदार वर्ग) (अनुत्पादक वर्ग) } चौथा टप्पा




**आकृती क्र १.३**

munotes.in

**मूल्यमापन :**

डॉ. क्वेने यांनी मांडलेली संपत्तीच्या वितरणाची संकल्पना माहिती योग्य असली तरी सोपी नाही.

**अ) काल्पनिक तक्ता :** या तक्त्यात प्रत्येक वर्गाचा फक्त हिस्सा दर्शवला आहे. प्रत्येकाचा वाटा कसा ठरतो व संपत्ती कशी निर्माण होते याची वास्तवता कमी आहे. यामुळे हा तक्ता काल्पनिक वाटतो.

**ब) चूकीची वर्गवारी :** निसर्गवाद्यांनी समाजाची वर्गवारी तीन वर्गात केली आहे. ज्यात जमीनदारांनाही महत्त्वाचे स्थान दिले आहे. वास्तविक तो उत्पादनात जास्त भर घालत नाही. याउलट कामगार व कारखानदार जे जास्त भर देतात, त्यांनाच अनुत्पादक वर्गात समाविष्ट केले आहे.

**क) श्रमास महत्त्व नाही :** निसर्गवाद्यांनी श्रमास महत्व न देता सर्व श्रेय निसर्गास देऊन श्रमीकांस कमी लेखले आहे.

१८ व्या शतकाच्या मध्यापासून व्यापारवादी विचारांविरुद्ध फ्रान्समध्ये जी विचारसरणी प्रचलित होती त्यास निसर्गवादी विचारसरणी असे ओळखतात. यात निसर्ग व्यवस्थेस प्राधान्य दिले आहे. यामुळे राज्यसंस्थेने हस्तक्षेप करु नये, समाजाचे नियमन निसर्गव्यवस्था आपोआप करते, असे निसर्गवाद्यांचे मत आहे.

## १.५ ॲडम स्मिथ

**जीवन परिचय :**

ॲडम स्मिथचा जन्म ५ जून, १७२३ रोजी स्कॉटलॅंडच्या करकॅल्दीमध्ये झाला. तो जन्मण्यापूर्वी काही दिवस अगोदर त्याच्या वडिलांचे निधन झाले त्यामुळे त्याच्या आईनेच पुढे त्याचा सांभाळ केला. सन १७३७ ते १७४० या काळात त्याने ग्लासगो विद्यापीठात अभ्यास केला. १७४० ते १७४६ मध्ये त्याने ऑक्सफर्ड विद्यापीठात शिक्षण घेतले. पुढे १७४८ मध्ये एडिंबर्ग विद्यापीठात गेला. १८४८ ते १८४९ मध्ये तत्वज्ञानावर व्याख्याने दिली. सन १७५९ मध्ये त्याने 'द थिअरी ऑफ मोरल सेन्टीमेन्टस्' हे पुस्तक प्रसिद्ध केले. यामध्ये ग्लासगो विद्यापीठातील नीतिशास्त्रावरील व्याख्याने होती. या पुस्तकामध्ये सहानूभूती ही सामान्य संवेदनातून उद्भवते आणि व्यक्तींमध्ये संक्रमीत होते, असे प्रतिपादन केले आहे. हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यामुळे व या पुस्तकाने प्रभावित झाल्यामुळे चार्लस् टाऊनशेन्ड यांनी स्मिथला ड्यूकचा टूटर म्हणून नेमले. १७६४ ते १७६६ त्याने ड्यूकबरोबर यूरोप खंडाची सफर केली. या प्रवासामध्ये व्होल्टेअर, क्वेस्ने, तर्गो, आन्द्रे मॉर्ले इ. अर्थतज्ञांची भेट झाली. या काळात त्यांनी एक ग्रंथ लिहावयास घेतला, जे १७७६ मध्ये प्रसिद्ध होऊन, अर्थशास्त्राची वेगळी ओळख झाली. त्या पुस्तकाचे नाव 'राष्ट्राची संपत्ती' (An Inquiry into the nature and auses of wealth of nations) असे आहे. या पुस्तकामूळेच त्यांना 'अर्थशास्त्राचा जनक' म्हणून ओळखले जाते.

**स्मिथचा उदारमतवाद (Liberalism) :**

ॲडम स्मिथ हा उदारता (स्वातंत्र्य) सिद्धांताचा पुरस्कर्ता होता. राष्ट्रास समृद्ध करण्यासाठी निर्हस्तक्षेप (laissez faire) म्हणजेच आर्थिक क्रियांमध्ये शासनाचा शुन्य हस्तक्षेप महत्त्वाचा असतो, असे प्रतिपादन स्मिथ यांनी केले होते.

**निर्हस्तक्षेपाचे धोरण :**

ॲडम स्मिथ यांच्या मते, मनुष्य मुळातच स्वार्थी आहे. त्यामुळे त्याला स्वत:चे हित कशात आहे हे समजते म्हणून सरकारने निर्हस्तक्षेपाचे धोरण स्विकारावे. जर सरकारने हस्तक्षेप केला तर मानवाचे कल्याण होण्याऐवजी नुकसानच अधिक होईल. त्यामुळे सरकारने ठराविक व अत्यंत महत्त्वाची कार्ये स्वत:कडे ठेवून अन्य कार्यासाठी बाजारयंत्रणेला पूर्ण स्वातंत्र्य द्यावे. यालाच स्मिथचे निर्हस्तक्षेपाचे धोरण म्हणतात. स्मिथ यांनी आर्थिक विकास सिद्धांत मांडत असताना निर्हस्तक्षेप प्रभावीपणे मांडला, कारण त्यांच्या मनावर नैसर्गिक नियमांच्या तत्वांचा प्रभाव पडला होता. निसर्गाच्या नियमांवर त्यांचा विश्वास होता.

स्मिथ यांना व्यवहारातील व्यापारात हस्तक्षेप मान्य नव्हता. सरकारने संरक्षण, कायदा व सुव्यवस्था, रस्तेबांधणी इत्यादी कार्य करावीत, बाकीच्या सर्वच क्षेत्रामध्ये व्यक्तीला स्वातंत्र्य द्यावे. ज्यावेळी व्यक्तीगत स्वार्थापोटी मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न व्यक्तीकडून होईल, तेव्हा ती मक्तेदारी दूर करण्यासाठी मक्तेदारीविरुद्ध कायदे करणे, बँक निर्मित चलन, बाजाराचे नियंत्रण व सक्तीचे प्राथमिक शिक्षण इत्यादी बाबतीत स्मिथने सरकारच्या हस्तक्षेपाचे समर्थन केले, तर देशाचा व्यापार हा मुक्त स्वरूपाचा असावा, त्यावर कसल्याच प्रकारचे बंधन नसावे. स्मिथ यांनी सरकारच्या हस्तक्षेपावर काही प्रश्न उपस्थित केले ज्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

अ) सरकारला लोकांच्या कल्याणासाठी पैसा कसा, कुठे व किती खर्च करायचा याची प्रेरणा नसते. खाजगी उद्यम हे व्यवस्थित हाताळतात, कारण खर्च करण्यासाठी ते स्वत:चा पैसा वापरत असतात. सरकार लोकांकडून गोळा केलेल्या कराचा पैसा, खर्चासाठी वापरत असतो, त्यामुळे त्यास लोकहिताचे भान राहत नाही.

ब) शासनाला लोकांपर्यंत पोहचून त्यांच्या कृषी व उद्योग समस्यांना समजून घेणे कठीण असते. त्यामुळे महत्त्वाचे आर्थिक प्रश्न बाजूला राहून, शासनाची दिशाहीन वाटचाल होऊ शकते.

क) लोक कल्याणासाठी लोकांचा पैसा वेळेत व अयोग्य पद्धतीने वापरण्यासाठी शासकीय यंत्रणेला सध्या जमत नाही. त्यांना त्यात वैयक्तिक रस वाटत नाही. यापुढे जाऊन स्मिथ सांगतो की, सरकारी कर्मचारी जसे - न्यायाधिश, प्राध्यापक, वकील यांना कायम पगार दिला जाऊ नये. ज्या पद्धतीने ते काम करतील त्याच्या मोबदल्याच्या स्वरूपात मानधन दिले जावे.

स्मिथ खाजगी उद्यमांच्या बाजूने आपले विचार मांडताना दोन अटी ठेवतात. एक, खाजगाr उद्यम व्यक्तिगत स्वार्थ (रस) ठेवत असावा व दोन, त्याच्याद्वारे स्पर्धेस उत्तेजन मिळत

असावे, काही वेळा खूप मोठ्या भांडवलाच्या उद्यमांबाबत तो अपवाद ठेवतो, जसे, बँका, विमा कंपन्या व पाणी पुरवठा विकास अशाप्रकारे स्मिथ निर्हस्तक्षेपाचे धोरण स्पष्ट करतो.

**श्रमविभागणी (Division of Labour) :**

ॲडम स्मिथ यांनी 'राष्ट्राची संपत्ती' (An Enquiry into the Nature and causes of the wealth of nations) या ग्रंथात उत्पादन सिद्धांताची चर्चा करताना, राष्ट्राच्या संपत्तीचा खरा स्त्रोत हा श्रम मानला आहे. जर राष्ट्राची संपत्ती वाढवायची असेल, तर श्रमविभागणी करणे आवश्यक आहे. स्मिथ यांच्या मते, श्रम हे संपत्तीचे मालक आहेत. जो काम करणारा श्रमीक आहे तो देशासाठी योगदान देत असतो. आळशी माणसा व्यतिरिक्त एवढी छोटे काम निरर्थक नसते. संपत्तीचा मूख्य स्त्रोत म्हणून श्रमास महत्त्व देताना, स्मिथ उत्पादन घटकांच्या इतर कोणत्याही साधनाचे महत्व कमी करत नाही. त्याने भांडवलाचेही महत्त्व मोठ्या प्रभावीपणे मांडले आहे.

समाजामध्ये सरकाराच्या स्वरूपात एकत्र येऊन उत्पादन प्रक्रिया घडविणे महत्त्वाचे असते. प्रत्येक व्यक्ति सगळी कामे करु शकत नाही. त्यामुळे एका कामात सर्वांनी सहकार्याने विशेषतापूर्ण योगदान दिल्यास देशाच्या संपत्तीत वाढ होते. श्रमाची विभागणी सामाजिक विकास व मानवी कल्याणाचा खरा स्त्रोत आहे.

**श्रमविभागणीचे फायदे :**

ॲडम स्मिथ श्रमविभागणीच्या बाजूने समर्थनीय मुद्दे खूप स्पष्टपणे मांडतो. त्याने टाचणी निर्मिती कारखान्याचे उदाहरण दिले आहे. ज्यामध्ये तो सांगतो की, टाचणी निर्मिती कारखान्यामध्ये अठरा वेगवेगळी कार्ये असतात. जर श्रमाची विभागणी या विविध कार्यक्षेत्रात केली, तर तो कारखाना २४० (दोनशे चाळीस) पट अधिक उत्पादन घेऊ शकेल.

स्मिथने श्रमविभागणीचे काही फायदे पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

अ) उत्पादनवाढ शक्य आहे.

ब) कार्यामध्ये विशिष्टपणा आणल्यास कौशल्यात वाढ होते.

क) वेळेची बचत होते, कामात वेग येतो.

ड) कार्यकुशलतेमुळे नाविण्यता निर्माण होऊ शकते.

इ) कारखान्यांमध्ये सुधार घडून येतो.

**श्रमविभागणीचे तोटे :**

श्रमविभागणीच्या फायद्यासोबतच त्याचे तोटेही स्मिथने ठळकपणे लिहिले आहेत.

अ) एकाच कामात सातत्यपूर्ण गुंतल्याने श्रमीकांच्या मानसिकतेत ढिल्लेपणा येतो व कंटाळा (आळस) चालू होतो.

ब) श्रमाचे स्थलांतरीकरण बंद होते.

जर एखाद्या राष्ट्रात व्यापार वाढला, तर उत्पादन वाढ करणे आवश्यक होते. यामुळे अधिक उत्पादन घेताना श्रमविभागणी करावी लागते. त्यामुळे स्मिथ मोठ्या उत्पादनाच्या कारखान्यांमध्ये श्रमविभागणीची पाठराखण करतो, जी देशाच्या विकासात महत्त्वाचा वाटा देत असते.

**टीका :**

श्रमविभागणीची कल्पना ही सर्वात प्रथम ॲडम स्मिथ यांनी मांडली नसून अगोदरच्या काही विचारवंतांनी ह्यावर भाष्य केले होते. परंतु त्यांना श्रमविभागणी निसर्ग व्यवस्थेने व्हावी असे वाटायचे. स्मिथची खरी कल्पना ही त्याच्या आर्थिक क्रियांमध्ये श्रमविभागणी राष्ट्राच्या संपत्तीत वाढ करण्यासाठी करावी यात आहे.

दरखेम् (Durkheim), प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञाने स्मिथच्या श्रमविभागणीचे स्वागत केले, त्याच्या मते, 'नवनैतिकतेचा आधार' नवीन नैतिक व्यवस्थेला आधार बनणारी श्रमविभागणी आहे.

["The basis of a new ethics", the fundamental of a new moral order]

स्मिथने दिलेल्या श्रमविभागणी सिद्धांताचे प्रायोगिक / व्यावहारिक महत्व खूप आहे. प्रत्येक व्यक्ती हा उत्पादक असतो. कर हा समतेच्या कसोटीवर लावला गेला पाहिजे. कोणताही वर्ग हा अति, मध्यम, कमी उत्पादक किंवा महत्त्वाचा नसून, जो काम करतो तो समान उत्पादक आहे.

**स्मिथचा मुल्यसिद्धांत (Theory of value) :**

पैशाच्या बाबतीत उगम, स्वरूप आणि फायदे स्मिथने स्पष्टपणे मांडले आहेत. त्याच्या मते, पैसा हा विनिमयाचा माध्यम आहे, परंतु त्याचे स्वत:चे मूल्य अनुत्पादक असते. पैशाचा संख्यात्मक सिद्धांताचा, स्मिथ यांनी पैशाची संख्या आणि प्रवाहातील बँक नोट्स याच्याशी संबंधित समायोजन करुन अभ्यास केला आहे. स्मिथने मूल्याचा अभ्यास दोन अर्थाने केला आहे. एक, उपयोगिता मूल्य आणि दूसरा, विनिमय मूल्य, याच्यापुढे जाऊन, स्मिथ यांनी बाजार मूल्याचे विश्लेषण केले आहे. बाजार किंमत, जी रोज चढ-उतार पावत असते. मागणी व पुरवठ्यामधील अस्थिरतेमुळे हे घडताना आपल्याला दैनंदिन जीवनात दिसते. बाजार मूल्य बदलताना वास्तव व मूळ किंमतीमुळे बदलणारी बाजार किंमतसुद्धा बदलते.

अ) उपयोगिता मूल्य : वस्तूच्या वापरावरुन जे मूल्य ठरते.

उदा. हवा, पाणी, प्रकाश इ.

ब) विनिमय मूल्य : एखाद्या वस्तूच्या मोबदल्यात इतर वस्तूचे किती नग भेटतात यावरुन विनिमय मूल्य ठरते.

उदा. एक लीटर पेट्रोलच्या बदल्यात किती किलो धान्य येऊ शकते.

स्मिथच्या मते, वस्तूचे मूल्य वस्तूच्या उपयोगितेवरुन ठरत नाही. कारण ज्या वस्तूंना मोठे उपयोगिता मूल्य असते, त्यास विनिमय मूल्य असतेच असे नाही व ज्यांना मोठे विनिमय मूल्य आहे, त्यास उपयोगिता मूल्य असेलच असे नाही. उदा. पाणी व हिरा याची तुलना केल्यास, पाण्याचे उपयोगिता मूल्य अधिक आहे, परंतू विनिमय मूल्य कमी, तर हिऱ्याचे विनिमय मूल्य हे अधिक आहे, परंतु निरोपयोगी हिरा कमी उपयोगितेचा आहे.

**श्रम मुल्य सिद्धांत (Labour value) :**

स्मिथच्या मते, श्रम हेच उत्पादनातील महत्त्वाचे स्रोत आहे. श्रम हेच संपत्तीचे उगमस्थान आहे. ज्या श्रमातून मूर्त वस्तू निर्माण होतात ते उत्पादक श्रम होय. उदा. टेबल, खूर्ची इ. ज्या श्रमातून भौतिक वस्तूची निर्मिती होत नाही ते अनुत्पादक श्रम होय. उदा. डॉक्टर, वकील, गायक इ. स्मिथच्या सिद्धांतानुसार, वस्तूच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या श्रमावरुनच वस्तूचे विनिमय मूल्य ठरते. श्रम हेच विनिमय मूल्य मोजण्याचे साधन आहे याचा अर्थ वस्तू तयार करण्यासाठी जेवढे श्रम खर्ची पडतात त्यावरुन त्याची किंमत ठरवावी.

उदा. जर, सुतारास एक खूर्ची तयार करण्यासाठी सहा तास लागतात व एक टेबल तयार करण्यासाठी बारा तास लागतात म्हणजे एका टेबलची किंमत दोन खूर्च्या होय. कारण टेबल तयार करण्यासाठी दूप्पट वेळ लागतो.

**मुल्य सिद्धांताचे परीक्षण :**

**अ) उपयोगितेकडे दुर्लक्ष :** स्मिथने उपयोगिता मूल्यापेक्षा विनिमय मूल्यास अधिक महत्त्व दिले आहे. यामुळे उपयोगिता व सीमांत उपयोगिता याकडे दुर्लक्ष झाले आहे.

**ब) चक्रीय युक्तीवाद :** वस्तूचे मूल्य श्रमावरुन मोजतात परंतु श्रमावरुन ठरलेल्या मूल्याचे मोजमाप कसे करायचे? हे व्यवस्थित विस्तृतपणे मांडले नाही. वस्तूची किंमत जास्त म्हणून ती तयार करण्यासाठी श्रम जास्त लागतात असे एकीकडे प्रतिपादन करुन, दूसरीकडे स्मिथ म्हणतो की श्रम जास्त म्हणून वस्तूची किंमत जास्त द्यावी लागते.

**क) पूर्ण स्पर्धा :** स्मिथने मूल्य सिमांतासाठी पूर्ण स्पर्धा हे गृहीतक मानले आहे. याचा अर्थ असा होतो की, हा सिद्धांत मक्तेदारी बाजारास लागू पडत नाही. यामुळे तो स्वत: म्हणतो की, मक्तेदारीसाठी स्वतंत्र सिद्धांत मांडायला हवा.

अशाप्रकारे ॲडम स्मिथ यांनी अर्थशास्त्राचा जनक म्हणून नावारूपास येताना अर्थशास्त्रात महान योगदान दिले आहे. अर्थशास्त्र विषय म्हणून प्रथमच त्यांनी तर्कशुद्ध विचार मांडले होते.

munotes.in

## १.६ सारांश

व्यापारवाद ही मध्ययुगीन व्यवस्थेविरुद्धची प्रतिक्रिया होती. व्यापारवादी विचारवंत राष्ट्राच्या सामर्थ्याचा व सुबत्तेचा विचार करीत होते. सामर्थ्य मिळविण्यासाठी मौल्यवान धातू (सोने व चांदी) संचयाला अत्याधिक महत्त्व दिले होते. तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात तसेच काही अंशी आजही व्यापारवादी धोरणांचे समर्थन उचित ठरते.

१८ व्या शतकाच्या मध्यापासून व्यापारवादी विचारांना विरोध होऊन नवी विचारसरणी उदयास आली. निसर्गवादी विचारात ईश्वरी प्रेरणेने स्थापन केलेल्या निसर्गव्यवस्थेला प्राधान्य दिले व त्या नियमांचे पालन करणे लोकांच्या कल्याणासाठी आहे, असे सांगितले. यास निसर्गव्यवस्था असे संबोधले आहे. निसर्गवाद्यांनी शेतीचे महत्त्व अत्याधिक उच्च स्थानी नेले. शेती हाच घटक उत्पादक व्यवसाय मानला.

आधुनिक काळातील व्यापारवाद व निसर्गवाद्यानंतरचा कालखंड (१७७६ ते १८४८) हा सनातनवादी आर्थिक विचारांचा कालखंड होय. ॲडम स्मिथच्या आर्थिक विचारापासून या कालखंडाची सुरुवात होते. १७७६ साली स्मिथ यांनी राष्ट्राची संपत्ती ग्रंथामधून मूल्य सिद्धांत, श्रमविभागणी, निर्हस्तक्षेपी धोरण इ. विचारांचे प्रकटीकरण केले. त्यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळे त्यांना अर्थशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते.

## १.७ प्रश्नाभ्यास

१) व्यापारवाद म्हणजे काय? व्यापारवादाची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२) निसर्गवाद्यांची शेतीचे श्रेष्ठत्व कल्पना स्पष्ट करा.

३) डॉ. क्वेने यांचा संपत्ती संचलनाचा आराखडा विस्तृतपणे लिहा.

४) ॲडम स्मिथच्या मूल्यविषयक सिद्धांताचे परीक्षण करा.

५) ॲडम स्मिथची श्रमविभागणीची संकल्पना विस्तारीतपणे लिहून तिचे फायदे व तोटे लिहा.

❖❖❖❖

munotes.in

# २

# सनातनपंथी आर्थिक विचारवंत

**घटक रचना :**


२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ डेव्हिड रिकार्डोचे आर्थिक विचार

२.३.१ खंड सिद्धांत

२.३.२ वेतन सिद्धांत

२.३.३ मूल्य सिद्धांत

२.४ कार्ल मार्क्सचे आर्थिक विचार

२.४.१ अतिरिक्त मूल्य सिद्धांत

२.४.२ इतिहासाची भौतिकवादी मीमांसा

२.४.३ शास्त्रीय समाजवाद

२.५ सारांश

२.६ प्रश्नाभ्यास


## २.१ उद्दिष्टे

- रिकार्डोचे मूल्य सिद्धांत विषयक विचार स्पष्ट करता येतील.
- रिकार्डोचे विभाजन विषयक विचार विशद करता येतील.
- कार्ल मार्क्स यांचा जीवनपट संक्षिप्तपणे समजून घेता येईल.
- शास्त्रीय समाजवाद स्पष्ट करता येईल.
- कार्ल मार्क्स यांचा अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत स्पष्ट करता येईल.

## २.२ प्रास्ताविक

सनातनवादी पंथ/ वर्ग व्यापारवाद व निसर्गवाद यानंतर म्हणजे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपात जे अनेक बदल घडून आले. इंग्लंडच्या शेतीमध्ये बदल घडून आला. नवे शोध, नवी उत्पादन पद्धती इत्यादींमुळे औद्योगिक उत्पादनात वाढ झाली. या सर्वांचा परिणाम आर्थिक विचारांवरही झाला. जुने आर्थिक विचार मागे पडून नवीन उदयास आलेल्या अर्थतज्ज्ञांच्या गटाला एकत्रितपणे सनातनवादी संप्रदाय सनातनवादी पंथ असे म्हणतात.

munotes.in

ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, थॉमस माल्थस, प्रा. पिगु, जे.बी.से, जे.एस. मिल इत्यादी अर्थतज्ज्ञ यामध्ये आहेत. डॉ. मार्शल व केन्स यांचेही सुरुवातीचे विचार सनातनवाद्यांशी जवळीकतेचे होते.

## २.३ डेव्हिड रिकार्डोचे आर्थिक विचार

**जीवन परिचय :**

सनातनवादी परंपरेतील थोर अर्थशास्त्रज्ञ हॉलंडमध्ये स्थायिक झालेल्या एका ज्यू कुटूंबात त्याचा १७७ मध्ये जन्म झाला. इंग्लंडमध्ये जन्मलेल्या रिकार्डोचे वडील हुंड्या आणि सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री करणारे दलाल होते. वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी तो वडिलांच्या व्यवसायात शिरला आणि प्रचंड संपत्ती मिळवली. शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. त्यानंतर तो ब्रिटिश संसदेचा सभासद झाला. धार्मिक अडचणीमुळे त्याला आपला पंथ सोडावा लागला. परिणामी त्याच्या वडिलांनी त्याला जातिबहिष्कृत केले. अर्थशास्त्रात त्याला स्वारस्य वाटू लागले. बँक व्यवसायात निर्माण होणाऱ्या समस्यामुळे अर्थशास्त्र सोडून हळुहळु त्याने गणित, रसायनशास्त्र आणि भूविज्ञान या विषयांचा अभ्यास केला. १७९९ मध्ये ॲडम स्मिथ यांचा ग्रंथ वाचनात आला. या ग्रंथाचा प्रभावामुळे अखेरपर्यंत अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यात काळ घालवला. साक्षेपी विचार, आकडेमोड करण्यातील प्रावीण्य दीर्घ परिश्रम करण्याची तयारी यामुळे आर्थिक समस्यांचा वेध घेण्यात यश मिळाले.

सन १८२१ मध्ये त्याने पोलिटिकल इकॉनॉमी क्लब स्थापन केला. प्रमुख ग्रंथ प्रिन्सिपल्स ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी हा होय. सर्वाधिक महत्त्वाचा ग्रंथ प्रिन्सिपल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी अँड टॅक्सेशन १८१७ साली प्रकाशित झाला. १८२२ प्रोटेक्शन टू ऑग्रेक्चर ही पुस्तिका प्रकाशित केली. प्लॅन फॉर द इस्टॅब्लिशमेंट ऑफ अ नॅशनल बँक अखेरचे पुस्तक मृत्यूनंतर १८२३ प्रसिद्ध झाले.

ॲडम स्मिथ प्रस्थापित केलेल्या सनातनवादी परंपरा रिकार्डेने हिरिरीने पुढे चालविली. आंतरराष्ट्रीय पातळीवर मुक्त व्यापाराचा पुरस्कार केला. पण काही बाबतीत व्यावहारिक तडजोड त्याला मान्य होती. शासनाने अर्थव्यवहारात हस्तक्षेप करु नये या धोरणाचा होता.

### २.३.१ खंड सिद्धांत (Rent Theory) :

जेम्स ॲन्डरसन (१८०१), माल्थस (सिद्धांताचे दूसरे संस्करण) आणि सर एडवर्ड वेस्ट यांनी खंडासंबंधी चर्चा केली होती. रिकार्डोने त्याच्या वितरणाच्या सिद्धांताचा आधार म्हणून खंड सिद्धांताचे विवेचन शास्त्रशुद्ध पद्धतीने केले आहे. निसर्गवादी अर्थतज्ञ व ॲडम स्मिथ यांनी खंड हा निसर्गाकडून भेटलेले वरदान आहे असे मत मांडले. परंतू रिकार्डोने खंड हा जमीनदारांना द्यावयाचा भाग आहे असे स्पष्ट केले.

रिकार्डोच्या मते, “That portion of the produce of the earth which is paid to the landlord for the use of the original and indestructible powers of the soil ---- It invariably proceeds from the employment of an additional quantity of labour with a proportionately less return.”

(जमीनीच्या एकूण उत्पादनापैकी जो भाग जमिनीच्या उपजत व अविनाशी गुणांबद्दल जमीन मालकाला दिला जातो त्यास खंड म्हणतात, रिकार्डोच्या खंडाचा उद्भव जमीनीच्या गुणभिन्नतेमुळे होतो. काही जमीन सुपीक, मध्यम सुपीक व कमी सुपीक अशाप्रकारे असते. उत्पादनाच्या सुरुवातीच्या काळात कोणतीही जमीन सुपीक असते. या जमीनीवर १०० क्विंटल गव्हाचे उत्पादन झाले व त्यासाठी उत्पादन खर्च ५००० रु. आला तर १ क्विंटल गव्हाचा उत्पादन खर्च ५० रु. येईल व बाजारात हा गहू ५० रु. क्विंटल विकला जाईल.

काही कालावधीनंतर सुपीक जमीनीवर पिकवलेला गहू कमी पडू लागला, तर आता मध्यम प्रतीची जमीनही लागवडीखाली आणावी लागेल. या जमीनीवर ५००० रु. इतकाच खर्च करुन ५० क्विंटल गहू पिकवला, तर १ क्विंटल गहूचा उत्पादन खर्च १०० रु. इतका येईल व हा गहू बाजारात १०० रु. हे प्रमाणे विकला जाईल. बाजारात पूर्ण स्पर्धा असल्याने गव्हाची किंमत सर्वत्र समान असेल, त्यामुळे सुपीक व मध्यम सुपीक जमीनीवरील गहू १०० प्रमाणे विकला जाईल, त्यामुळे जमिनीच्या मालकाला प्रत्येक क्विंटल पाठीमागे ५० रु. जास्त मिळतील, यास खंड असे म्हणतात.

अजून काही कालावधीनंतर लोकसंख्या वाढल्यास सुपीक व मध्यम सुपीक जमीनीवरील उत्पादीत गहू पुरणार नाही, म्हणून पुरेशा गरजा भागवण्यासाठी कमी प्रतीची जमीनही लागवडीखाली आणावी लागेल. या जमीनीवर ५००० रु. खर्च करुन २५ क्विंटल गहू उत्पादित होतो. एका क्विंटल गव्हाचा खर्च २०० रु. येईल व बाजारात याची विक्री २०० रु. प्रमाणे होईल. बाजारात पूर्ण स्पर्धा असल्याने २०० रु. क्विंटल ही एकच किंमत असेल.

या सीमांत (शेवटच्या) जमीन मालकास खंड मिळणार नाही. सुपीक जमीनीच्या मालकास (२०० रु - ५० रु) १५० रु खंड मिळेल. तसेच मध्यम प्रतीच्या जमीन मालकास (२०० रु - १०० रु) १०० रु खंड प्राप्त होईल.

**वरील उदाहरणाचा तक्ता :**

**तक्ता क्र.२.१**

| जमीनीची प्रत | एकूण उत्पादन (**Q**) व मूल्य (रु) | खर्च (रु) | खंड (रु) | स्थिती |
|---|---|---|---|---|
| सुपीक (A) | १०० Q x २०० रु = २०,००० रु | ५,००० रु | १५,००० रु | सीमांत जमीनीपेक्षा जास्त खंड |
| मध्यम (B) | ५० Q x २०० रु = १०,००० रु | ५,००० रु | ५,००० रु | सीमांत जमीनीपेक्षा जास्त खंड |
| कमी (निम्न) (C) | २५ Q × x २०० रु = ५,००० रु | ५,००० रु | ०० रु | शुन्य खंड |




**आकृती क्र. २.१**

वरील आकृती व तक्त्यामध्ये दर्शवल्याप्रमाणे सुपीक (A), मध्यम (B) व (निम्न) (C) जमीनी क्रमश: लागवडीखाली आणल्या जातात.

अशाप्रकारे खंडाचा उद्भव कसा होतो ते आपण वरीलप्रमाणे पाहिले आहे.

**टीका :**

रिकार्डोच्या मते खंड म्हणजे जमीनीच्या उपजत व अविनाशी गुणधर्माचा मोबदला होय. परंतु, सिद्धांताचे स्पष्टीकरण करताना म्हणतो की, सीमांत जमीनीस खंड मिळत नाही. काहीवेळा सीमांत जमीनीचे किंवा कोणत्याही भूमीचे गुण / प्रत वाढविण्यासाठी सेंद्रीय व रासायनिक खते वापरुन कार्य करावे लागते. याचा अर्थ असा होतो की, जमीनीची सुपीकता ही निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. रिकार्डोने सिद्धांतात प्रथम सुपीक, नंतर मध्यम व शेवटी निम्न सुपीक अशा क्रमाने जमीन लागवडीखाली येते असे सांगितले आहे. परंतु टीकाकार म्हणतात की, यास कसलाही ऐतिहासिक पुरावा नाही. अमेरिकेमध्ये वसाहतीतले लोक असे लागल्याचे दिसून येत नाही.

टीकाकारांच्या मते, जमीनीस उपजत गुणामुळे खंड मिळत नसून, जमीनीचा पुरवठा अलवचिक असल्याने खंड उत्पन्न होतो. याचप्रमाणे रिकार्डोने पूर्ण स्पर्धेचा आधार घेऊन खंड सिद्धांत विश्लेषित केला आहे. टीकाकार म्हणतात बाजारात पूर्ण स्पर्धा नसते, अपूर्ण स्पर्धा असते. तसेच खतांचा वापर करुन उत्पादनात वाढ करता येते. जमीनीचा वापर केवळ अन्नधान्य निर्मितीसाठीच होत नसून आज आपण पाहतो की, उद्योगासाठी पायाभूत सुविधांसाठी जमिनीचा वापर केला जातो.

munotes.in

### २.३.२ वेतन सिद्धांत (Wage Theory) :

Wages, "The natural prices of labour is that price which is necessary to enable the labourers to subsist and to perpetuate their race without either increase or dimunition."

रिकार्डोच्या मते, श्रम हा एक उत्पादनाचा घटक असून त्याला मिळणारा मोबदला म्हणजे वेतन होय. तसेच इतर कोणत्याही वस्तूप्रमाणे श्रम ही एक वस्तू आहे व तिचा पुरवठा कमी जास्त केला जाऊ शकतो. श्रमाचे मूल्य म्हणजेच वेतन होय. साधारण वेतन म्हणजे श्रमास जीवन व्यतीत करण्याइतपत दिला जाणारा मोबदला होय. अल्प कालावधीमध्ये, श्रमाच्या अभावामुळे वेतन हे साधारण दरापेक्षा अधिक असू शकते. परंतू ह्या अधिकच्या वेतनामुळे अधिक श्रमीक (कामगार) आकर्षित होतात आणि पुन्हा वेतन दर ढासळून निर्वाह पातळीवर (subsistence level) येतो.

समाजाच्या विकासामध्ये लोकसंख्येच्या मागणीमुळे (जी लोकसंख्या अन्नधान्य उत्पादनाच्या वेगापेक्षा अधिक वेगाने वाढत असते) वस्तूच्या, अन्नधान्याच्या किंमती वाढत असतात. या वेगाप्रमाणेच वेतनदरामध्येही सुधारणा व्हायला हवी, परंतु त्याचे वास्तविक वेतन पुढेही तसेच राहत असते. म्हणून इतर वस्तूप्रमाणे श्रमालाही दोन मुल्ये असतात.

**१) नैसर्गिक मूल्य :** उदरनिर्वाहासाठी आणि कामगारांच्या संख्येत वाढ अथवा घट होणार नाही, अशाप्रकारे वृद्धी होण्याकरिता कामगारांना जो मोबदला दिला जातो. त्यास नैसर्गिक मूल्य असे म्हणतात.

**२) बाजार मूल्य :** इतर वस्तुंप्रमाणे मागणी व पुरवठ्यावरुन श्रमाची ठरणारी किंमत म्हणजे श्रमाचे बाजार मूल्य किंवा वेतन होय. हे नैसर्गिक वेतनापेक्षा कमी किंवा जास्त असू शकते.

**निर्वाह वेतन सिद्धांत :**

रिकार्डोने माल्थसच्या लोकसंख्या सिद्धांतास आधार मानून हा सिद्धांत मांडलेला आहे. नैसर्गिक किंवा दीर्घकालीन वेतन निर्धारणाचे विस्तृत लेखन या सिद्धांतात केले आहे. यामध्ये कामगारांना त्यांच्या उदरनिर्वाहापुरतेच वेतन मिळते. हे स्पष्ट करण्यासाठी तो म्हणतो, बाजार वेतन हे नैसर्गिक वेतनापेक्षा जास्त झाले की तो आवश्यक व सुखसोयीच्या अधिक वस्तू खरेदी करु शकतो, राहणीमान उंचावले जाते. त्यामुळे परिस्थितीमध्ये सुधार होतो. अगोदरपेक्षा जास्त वस्तू व दर्जामध्ये वाढ होते. यामुळे हे चित्र पाहून अनेक लोकांना आशा निर्माण होते आणि ते त्या कामासाठी तयार होतात यामुळे पुरवठा वाढतो. याचा परिणाम बाजार वेतन घटून ते नैसर्गिक वेतनाइतके म्हणजेच निर्वाह पातळीवर येऊन थांबते.

रिकार्डोच्या मते, निर्वाह वेतन म्हणजे सामाजिक चालीरिती, रुढी-सवयी यानुसार लागणाऱ्या वस्तू व सेवांचा पुरवठा करण्याइतपत वेतन होय. प्रगत देशात आर्थिक प्रगतीबरोबरच भांडवल संचय, गुंतवणूक वाढून उद्योगाची प्रगती होते व कामगारांची मागणी वाढते, वेतन वाढते, कामगारांचा पुरवठा वाढतो. परंतु बाजार वेतन कमी होत नाही. भांडवल व गुंतवणूक इतकी वाढते की, श्रमाची मागणीही त्याच पटीमध्ये वाढते. अशाप्रकारे

प्रगत देशांत दीर्घ कालावधीमध्येही बाजार मूल्य अथवा वेतन निर्वाह पातळी इतक्या कमी होण्याची भीती नसते. अशाप्रकारे सिद्धांतामध्ये थोडी दुरुस्ती करण्यात आली होती.

**टीका :**

१) रिकर्डोचा निर्वाह वेतन सिद्धांत हा माल्थसच्या लोकसंख्या सिद्धांतावर आधारित आहे. लोकसंख्या सिद्धांतही आज थोडासा मागे पडून चुकीचा ठरत आहे. त्यामुळे निर्वाह वेतन सिद्धांतही चूकीचा होत आहे.

२) मजूर सघटित झाले तर प्रबळ संघटनेच्या जोरावर वेतनात व इतर भत्त्यांमध्ये वाढ घडवून आणू शकतात याचा विचार रिकर्डोने केला नाही.

३) टीकाकारांच्या मते, रिकार्डोने या सिद्धांतात श्रमीकाला उदर निर्वाहापुरते वेतन मिळावे असा मानवतावादी विचार मांडला आहे. श्रमीक उत्पादक काम करतो. स्वत:ची मजूरी मिळवतो, याचा विचार केला नाही.

४) रिकार्डोच्या मते, मजूरांचे वेतन वाढले की त्यांची पोषणक्षमता सुधारुन अधिक मूले होऊ लागतात. टीकार म्हणतात की, वेतन वाढल्यास कामगार मुले वाढत नाहीत तर राहणीमान वाढते.

### २.३.३ मूल्य सिद्धांत (Value Theory) :

ॲडम स्मिथ यांच्यानंतर रिकार्डोने मूल्य हे उपयोगिता व विनिमय अशाप्रकारे वर्गीकृत केले आहे. विनिमय मूल्य हे अल्प कालावधीतील बाजार मूल्य आहे, जे बाजारातील मागणी व पुरवठ्यामुळे बदलत असते. रिकार्डोने श्रम मूल्य सिद्धांताचीच मांडणी केली आहे. पूर्ण स्पर्धेमध्ये समान वेतन व फायदे असल्याने वस्तूच्या विनिमय मूल्यामध्ये श्रमाची संख्याच महत्त्वाचा भाग ठरते. श्रमामध्ये कौशल्य, गुणवत्ता व तीव्रता यांत फरक असू शकतो, ज्यामुळे मूल्यातही बदल होऊ शकतो. परंतू यास रिकार्डोने सिद्धांतात महत्त्व दिले नाही, कारण तो सम श्रमास महत्त्व देतो. रिकार्डोने समाजाच्या प्राथमिक आणि प्रगत अवस्थेमध्ये वस्तूचे मूल्य श्रमावरुन ठरते असे सांगितले.

**श्रममूल्य सिद्धांत :**

ज्या वस्तूंच्या पुरवठ्यात वाढ करता येते त्या वस्तूंचे मूल्य श्रमावरुन ठरते. रिकार्डोच्या मते, समाज प्रगत होतो तेव्हा वस्तू उत्पादनासाठी श्रमासोबत भूमी-भांडवल यांचाही वापर करतो. उत्पादनासाठी श्रम, भूमी व भांडवल अशा तीन घटकांची गरज असते. भूमीचा मोबदला खंड याचा किंमतीत समावेश होत नाही. कारण रिकार्डो खंड सिद्धांतात सांगतो की, खंडामुळे किंमत ठरत नसून, किंमतीमुळे खंड निश्चित होतो. म्हणून वस्तू उत्पादकात भांडवल व श्रम हे दोन घटक महत्त्वाचे आहेत. भांडवल म्हणजे यंत्र-अवजारे इ. होय. रिकार्डोच्या मते, भांडवल हे संग्रहीत श्रम असते.

रिकार्डोने वस्तूचे मूल्य चालू काळातील श्रम व भूतकाळातील संग्रहीत श्रम यावरुन ठरत असते असे सांगितले, संचित श्रमावर (भांडवलदार) भांडवलदाराची मालकी असल्याने भांडवलदारास वस्तूचे जे मूल्य मिळेल त्यातील काही भाग कामगारास वेतन व उर्वरित भाग नफा म्हणून घेतो. वस्तूचे मूल्य श्रमावरुनच ठरते याच्याशी तो ठाम होता. या विचारात पुढे त्याने दुरुस्त्या सुचविल्या ज्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) श्रमगुण भिन्नता :** वस्तूचे मूल्य श्रमावरुन ठरत असले तरी विविध श्रम हे गुणात्मकदृष्ट्या वेगवेगळे असते. यावर रिकार्डो म्हणतो, गुणभिन्नता असणाऱ्या श्रमाचे परस्पर मूल्यमापन बाजारात व्यावहारिकदृष्ट्या केले जाते आणि बहुतेक वेळा ते अचूक असते. याविषयी उदाहरण देताना रिकार्डो लिहितो की, जवाहिऱ्याचे एका तासाचे श्रम हे सामान्य कामगाराच्या पाच तासाच्या श्रमाइतके असते हे बाजारात अचूक ठरते.

**२) नफा :** वस्तूच्या मूल्यात नफ्याचा समावेश होत नाही, सुरुवातीला रिकर्डोचे हेच मत होते, माल्थसने या भूमीकेस विरोध केला. पुढे रिकार्डोने अशी दुरुस्ती केली की, वस्तूच्या मूल्यात वेतन व नफा दोन्हींचा समावेश होतो.

**३) भांडवल गुणभिन्नता :** ज्या पद्धतीने श्रम गुणभिन्नता आहे त्याच पद्धतीने भांडवल (यंत्रे-अवजारे) यांतही गुणभिन्नता आढळते. वेगवेगळ्या उद्योगात वापरण्यात येणारी यंत्रे ही वेगवेगळ्या उत्पादनक्षमतेची व कार्यक्षमतेची असतात. याचा परिणाम मूल्यावर होत असतो. रिकार्डोच्या मते, ज्या दोन वस्तूच्या उत्पादनाकरिता लागणाऱ्या भांडवलाची उत्पादनक्षमता वेगवेगळी असते, त्या दोन वस्तुंचे मूल्य समान असू शकते.

अशाप्रकारे मूल्य सिद्धांतात रिकार्डोने बदल केले तरीही काही दोष काळाच्या बदलण्यामुळे आढळतात. दोषाबद्दल रिकार्डोने मान्य करुन त्याने मूल्याविवेचनातून माघार घेतल्याचे दिसते.

## २.४ कार्ल मार्क्सचे आर्थिक विचार

### जीवन परिचय : कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्स यांचा जन्म पर्शियाच्या हाईन प्रांतातील टायर या शहरात ५ मे १८७८ रोजी झाला. त्यांचे वडील वकील होते. १८३० ते १८३५ पर्यंत मार्क्स ट्रायर निम्ना पर्शियामध्ये शिकत होते. आपल्या शहरात शालांत परिक्षेसाठी त्यांनी व्यवसाय निवडीबाबत एका तरुणाचे विचार हा निबंध लिहिला होता. मानवजातीशी नि:स्वार्थ सेवा हाच आपल्या जीवनाचा हेतू आणि नंतर बर्लिन विद्यापीठात कायद्याचा अभ्यास केला. न्यायशास्त्र विषय निवडला.

मार्क्सनी डॉक्टरेट पदवीसाठी डेमोकिटसचे प्रकृतीवादी तत्वज्ञान आणि एपिक्युरसचे प्रकृतीवादी तत्वज्ञान यामधील फरक यासंबंधी प्रबंध सादर केला. १८४१ मध्ये वयाच्या २३ व्या वर्षी मार्क्सला तत्वज्ञानातील डॉक्टरेट पदवी मिळाली. एप्रिल १८४२ 'Rheinsche Zeitung' या वृत्तपत्रात दाखल झाले आणि ऑक्टोबरमध्ये संपादक झाले. प्रधा यांचा त्यांच्या 'Philosophy of Poverty' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला याला प्रत्युत्तर देण्यास 'Poverty of Philosophy' हा ग्रंथ १८४७ मध्ये प्रसिद्ध झाला. १८४५ मार्क्स



munotes.in

यांना धोकेबाज क्रांतीकारक म्हणून पॅरिसमधून हद्दपार केले. मार्क्स व एंगल्सची मार्क्सशी कम्युनिस्ट लीग मध्ये या संघात प्रवेश केला. कॉंग्रेसच्या विनंतीवरुन सुप्रसिद्ध कम्युनिस्ट जाहीरनामा तयार केला. तो फेब्रुवारी १८४८ मध्ये प्रसिद्ध झाला. फेब्रुवारी १८४८ मध्ये क्रांतीला तोंड फुटताच बेल्जीयममधून मार्क्सची हकालपट्टी करण्यात आली. मार्क्सच्या संपादकत्वाखाली 'New Rheinische Zeitung' वर्तमानपत्र १ जुन १८४८ ते १९ मे १८४९ पर्यत प्रसिद्ध झाले.

राजकीय हद्दपारीचे मार्क्स यांचे जीवन अतिशय खडतर होते. यांचे कुटुंब दारिद्र्याने ग्रासले होते. फ्रेडरिक एंजल्सने मार्क्सला सतत निस्वार्थीपणे आर्थिक सहाय्य केले. मार्क्सने राजकीय अर्थशास्त्राला स्वत:ला वाहुन घेण्यासाठी राजकीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाच्या मीमांसेविषयी (१८५९) भांडवल या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित केला. उर्वरित एंगल्सने मार्क्सच्या मृत्युनंतर प्रकाशित केले. १८६४ मध्ये पहिल्या इंटरनॅशनलची स्थापना केली. विविध देशातील मजुर चळवळीत ऐक्य घडवण्यास, बिगर कामगारवर्गीय मार्क्सवादपुर्व समाजवादाच्या विविध प्रकारांना मार्गस्थ आणण्यास एकसंघ डावपेच आखला.

दास कॅपिटल (भाग १) हा त्याचा उत्कृष्ट म्हणून प्रसिद्ध असलेला ग्रंथ होय. इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोशिएशन या संघटनेत कामगारांचा प्रसिद्ध ग्रंथ म्हणून वर्णन भांडवलशाही अर्थव्यवस्था ही प्रत्येक समाजरचनेसारखी जिवंत शरीरासारखी रचना आहे. तिचा विकास तिच्या अंतर्गत स्वभावनियमानेच होतो. नफा मिळविण्याची वृत्ती अपयशी होऊ लागली, नफा कमी होऊ लागला म्हणजे संबंध समाजरचना डळमळते. भांडवलशाहीचा नाश होतो आणि तिच्या ठिकाणी उच्च दर्जाच्या समाजसंस्थेची स्थापना होते. ब्रिटिश कामगार वर्गाचे दैन्य व दुर्दशा मार्क्सने पाहिली व मोजली आणि यावरुन भविष्यवाद काढला. या भांडवलशाहीच्या खाजगी संपत्तीवर खिळा ठोकळा जात आहे. ज्यांनी लुटले ते लुटले जाणार आहेत. पीडीत जनतेला आशावादी दृष्टीकोन देण्यात मार्क्स यशस्वी झाला.

### २.४.१ अतिरिक्त मूल्य सिद्धांत (Theory of Surplus Value) :

भांडवलशाहीने उत्पादनासाठी कामगारांचा वापर करुन त्यांचे शोषण केले होते. कामगारांना त्यांनी एका वस्तूप्रमाणे ठराविक कालावधीसाठी विकत घेतल्याप्रमाणे वर्तणूक केली जात होती. अशाप्रकारे केले जाणारे शोषण शास्त्रीय पद्धतीने कोणीही मांडले नव्हते. कार्ल मार्क्स यांनी अतिरिक्त मूल्य सिद्धांत मांडून शोषण कशाप्रकारे होते, याचे विवेचन केले. भांडवलशाहीत कामगारांच्या श्रमातून जे मूल्य निर्माण होते. त्याचा अल्प भाग कामगारांस वेतन म्हणून द्यावयाचा असतो. कामगाराने श्रमातून निर्माण केलेले मूल्य हे खूप अधिक परंतू, त्या तुलनेत त्याला फिरणारे वेतन हे खूप कमी असणे यास अतिरिक्त मूल्य (Surplus Value) म्हणतात. मार्क्सने मूल्य, उपभोग मूल्य, मूर्त व अमूर्त श्रम यासारख्या मुलभूत संकल्पना मांडून निष्कर्ष काढले आहेत.

**अतिरिक्त मुल्याची निर्मिती :**

अतिरिक्त मुल्याची निर्मिती समजून घेण्यापूर्वी श्रमप्रक्रिया समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. श्रमप्रक्रियेमध्ये कच्च्या मालासारख्या वस्तूमधून इतर अंतीम उपभोगयोग्य वस्तू निर्माण केल्या जातात. समाजाचे कल्याण व प्रगतीसाठी श्रमप्रक्रिया आवश्यक असते. ती

पूर्ण करण्यासाठी काही नियम व अटी पार पाडाव्याच लागतात. भांडवली उत्पादनासाठी त्याच अटी पार पाडाव्या लागतात. सुरुवातीच्या भांडवलाच्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजेच अतिरिक्त मूल्यनिर्मिती होय. याप्रक्रियेमध्ये तीन घटक एकत्र येऊन कार्य करत असतात.

१) **श्रमविषय किंवा कच्चा माल :** अनेक उपयोगी वस्तूंचा वापर करुन एक अंतीम उपभोगयोग्य वस्तू बनवणे. उदा. टेबल बनविण्यासाठी लाकूड, खिळे, पॉलीश व रंग इ. चा वापर होतो.

२) **श्रमसाधने :** कच्च्या मालास विशेष रूप प्रदान करण्यासाठी अनुरूप अशी साधने होय. उदा. करवत, पटाशी, हातोडा, पालीश व रंग देण्यासाठी ब्रश इ. चा वापर होतो.

३) **श्रमशक्ती :** उपयोगी वस्तू बनविण्यासाठी कार्य करणारा श्रम हा घटक सजीव असतो. त्यामुळे वस्तूस शारीरिक व मानसिक दोन्ही आधारे बनविणे हे श्रमशक्तीच्या कुवतीचा भाग असतो.

वरील तीनही घटकांच्या एकत्र येऊन उत्पादन प्रक्रियेस श्रमप्रक्रिया असे संबोधले जाते.

उद्योगसंस्थेमधून उत्पादन व्हावयाचे असेल तर भांडवलदाराकडे श्रमप्रक्रियेचे तिन्ही घटक उपलब्ध असावे लागतात. कामगार हे श्रमशक्तीचे मालक असतात. भांडवलदार कामगाराकडून श्रमशक्ती विकत घेतात, परंतु कामगारांना श्रमशक्तीसोबत काम करण्यास भाग पडतात कारण श्रमशक्ती कामगारापासून वेगळी काढता येत नाही.

कार्ल मार्क्स कॅपीटल या ग्रंथात श्रमशक्ती व श्रम यांच्यातला भेद स्पष्ट, सातत्याने व काटेकोरपणे पाळतो. मार्क्सच्या मते, कामगार भांडवलदारांना श्रमशक्ती विकतात आणि श्रमशक्तीतील संचित कामाचा मोबदला देणे जरुरीचे असते. म्हणून कामगारांना लागणाऱ्या उपजीविकेचे साधनांचे मूल्य द्यावे लागते. कामगारात श्रमशक्तीचे मूल्य दिल्यास त्याचे श्रम भांडवलदारास प्राप्त होते. हे सर्व क्रय वस्तूंच्या नियमांतर्गतच होते. म्हणून कोणत्याही शोषणावर आधारित व्यवस्थेतील शोषण हे नियमांना धरुनच होते. मार्क्सच्या मते कामगार शोषणाला क्रयवस्तूंचे नियमच जबाबदार असतात. यातून कामगारांचे शोषण नष्ट करण्याचा मार्ग क्रयवस्तूंच्या नियमांचे उच्चाटन करणे हा आहे.

**उदाहरण :**

१) एक टेबल तयार करणारी उद्योगसंस्था, ज्यामध्ये टेबल तयार करण्यासाठी लाकूड, खिळे, सरस इ. चे (श्रमविषय) मूल्य ६ श्रम तास आहे. एका कामगाराला टेबल बनविण्यासाठी लागणाऱ्या श्रमसाधनांचे मूल्य ५००० श्रम तास आहे व अप्रत्यक्ष श्रमसाधनाचे मूल्य १०,००० श्रम तास आहे. एका दिवसाच्या श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतास असल्यास श्रमप्रक्रिया सुरु होते. कामगारांनी दिलेल्या मूर्त श्रमामुळे श्रमविषयाला टेबलचा आकार येतो. लाकूड, खिळ्याचे उपयोग मूल्य शून्य होते. दर दोन तासांना एक याप्रमाणे एक कामगार दिवसभराच्या आठ तासामध्ये चार टेबल तयार केले. चार टेबलासाठी लागणारे श्रमविषय मूल्य ४ x ६ = २४ श्रमतास होय. या श्रमविषयाचे मूल्य कमी-जास्त न होता, उत्पादित मालामध्ये साठते. त्यामुळे अतिरिक्त मूल्य श्रमविषयांतून निर्माण होत नाही.

२) समजा श्रमसाधनांचे आयुष्य ५००० टेबल बनविण्याइतके आहे व अप्रत्यक्ष १०,००० टेबल बनविण्याइतके आहे. त्यांचे ५००० श्रमतास व १०,००० श्रमतास मूल्य हे अनुक्रमे ५००० टेबले व १०,००० टेबलांवर विखूरतात प्रत्येक टेबलमागे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष श्रमसाधनांचे खर्ची पडणारे एकेक श्रमतास मूल्य टेबलमध्ये जाईल. म्हणून यंत्रे कितीही उत्पादक असली तरी मंत्रातूनही अतिरिक्त मूल्य निर्माण होत नाही.

३) कामगार दिवसभरात ८ तासामध्ये श्रमविषयातून श्रमसाधनांच्या सोबत ४ टेबल तयार करतो. प्रत्येक टेबलमध्ये २ श्रममूल्य तास साठेल. श्रमशक्तीचे मूल्य म्हणजे केवळ क्रयवस्तुंच्या नियमानुसार ठरणारे मूल्य. याचा अर्थ असा होतो की, क्रयवस्तूचे ४ श्रमतास हे रास्त / वैध मूल्य देऊन ती वस्तू खरेदी करणाऱ्या भांडवलदाराने ८ श्रमतास मिळवले आहेत. यातून ४ श्रमतास अतिरिक्त मूल्य निर्माण होते.

अशाप्रकारे भांडवलदाराने ३६ श्रमतास खर्ची पडलेल्या भांडवलातून, क्रयवस्तूच्या नियमांचे व्यवस्थित पालन करुन त्याहून जास्त ४० श्रमतासाचे मूल्य प्राप्त केले. याच अतिरिक्त मूल्याची निर्मिती म्हणजेच कामगारांचे शोषण होय.

**<u>अतिरिक्त मूल्याचा दर (Rate of Surplus Value) :</u>**

$$\text{अतिरिक्त मूल्य दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{बदलते भांडवल किंवा श्रमशक्तीचे मूल्य}} \times १००$$

$$\text{Rate of surplus value} = \frac{\text{Surplus value}}{\text{Variable Capital}} \times १००$$

एकूण मूल्य = C + V + S

C = Constant Capital स्थिर भांडवल
V = Variable Capital बदलते भांडवल
S = Surplus Value अतिरिक्त भांडवल

नफ्याचा दर (Rate of Profit) :

$$\text{Rate of Profit} = \frac{S}{C+V} = \frac{S}{V}\left(1-\frac{C}{C+V}\right)$$
$$= \frac{S}{V}\left(\frac{C+V-C}{C+V}\right)$$
$$= \frac{S}{V}, \frac{V}{C+V}$$

नफ्याचा दर $\boxed{= \frac{S}{C+V}}$

**उदाहरण :**

१) अतिरिक्त मूल्य ८ श्रमतास व श्रमशक्तीचे मूल्य ८ श्रमतास असल्यास -

$$\text{अतिरिक्त मूल्याचा दर} = \frac{\text{८ श्रम तास}}{\text{८ श्रम तास}} \times \text{१००}$$
$$= \text{१००\%}$$

याचा अर्थ भांडवलदार कामगाराचे १००% शोषण करतो.

२) समजा एकूण भांडवल ३०० कोटी रु. आहे, त्यापैकी २०० कोटी रु. स्थिर भांडवल आणि १०० कोटी रु. बदलते. भांडवल आणि अतिरिक्त मूल्य १०० कोटी रु. आता भांडवलाची रचना पुढीलप्रमाणे येईल.

$$\text{भांडवल घटनात्मक रचना} = \frac{\text{स्थिर भांडवल}}{\text{बदलते भांडवल}}$$
$$= \frac{\text{२०० कोटी}}{\text{१०० कोटी}} = \text{२ : १}$$

$$\text{नफ्याचा दर} = \frac{S}{C+V} \times 100$$
$$= \frac{100}{200+100} \times 100$$
$$= \frac{100}{300} \times 100$$
$$= \frac{1}{3} \times 100$$
$$\boxed{= 33.33\%}$$

अशारीतीने नफ्याचा दर कमी-जास्त होऊ शकतो. सामाजिक पातळीवर हा निष्कर्ष नफ्याच्या दरासंदर्भात लागू होतो.

३) भांडवलशाहीचा सर्वसाधारण नफा पसरला तर भांडवलशाहीमध्ये आर्थिक अरिष्ट निर्माण होते. हे भांडवलदारास समजताच, उपायांची जुळणी व्हायला लागते. कामगारांना धाक देणे, कामाचे तास वाढविणे, ओवरटाईम चालू करणे, वेतन कपात करणे, थोडक्यात कामगारांकडून निव्वळ अतिरिक्त मूल्य काढले जाते यात कामगारांचे हाल होतात. यातच क्रांतीकारक लढ्याला व शिक्षणाला अनुकूल परिस्थिती तयार होते.

अशाप्रकारे भांडवलशाही अर्थव्यवस्था अशा अरिष्टातूनच लयाला जाईल, असे मार्क्सने म्हटले आहे.

munotes.in

### २.४.२ इतिहासाची भौतिकवादी मीमांसा (Materialistic Interpretalian of History) :

मानवी समाजाच्या विकासाचा मोठा इतिहास आहे. एका अवस्थेमधून दुसऱ्या अवस्थेत विकासाची मीमांसा मार्क्सअगोदरही केली होती. त्यांनी विकासाच्या बदलणाऱ्या अवस्थांची कारणे दिली होती, जी खालीलप्रमाणे आहेत.

१) राज्यपद्धतीमधील बदल

२) धार्मिक बदल

३) निसर्गनियमांतील बदल

४) श्रेष्ठ व्यक्तींच्या कार्याचा प्रभाव

वरील कारणे मार्क्सने नाकारली व विरोधविकासाधिष्ठीत भौतिकवादाच्या आधारे मानवी समाजाच्या विकासाच्या अवस्थांचे विश्लेषण केले आहे. यालाच इतिहासाची भौतिकवादी मीमांसा म्हणतात. समाज गतीशील व परिवर्तनशील आहे. समाजाचे अस्तित्व उत्पादनावर अवलंबून असते, म्हणून उत्पादन साधने व ती साधने वापरणारी माणसे समाजाच्या उत्पादक शक्ती आहेत.

मानवी समाजात जेव्हा उत्पादन पद्धतीमध्ये वर्ग निर्माण होतात तेव्हा वर्गसंघर्ष निर्माण होतो. वर्ग म्हणजे उत्पादन साधनांच्या स्वामीत्व किंवा मालकी हक्कासाठी संबंधित मानव. ज्याच्याकडे उत्पादन साधनांच्या मालकी हक्काचे अस्तित्व आहे तो आहे हे वर्ग आणि ज्याच्याकडे उत्पादन साधनांची मालकी हक्के नाहीत तो नाही रे वर्ग होय. यालाच आपण भांडवलदार वर्ग व कामगार वर्ग असे म्हणतो. मार्क्सच्या मते, या वर्गामध्ये एकमेकांच्या विरोधी हितसंबंधामुळे जो संघर्ष होतो त्यातून क्रांती घडते व याचा परिणाम मानवी समाज परिवर्तन होते.

मार्क्स असे म्हणतो की, 'आजपर्यंत अस्तित्वात आलेल्या समाजांचा समग्र इतिहास म्हणजे वर्ग लढ्याचाच इतिहास होय.' मानवी समाजाच्या विकासाच्या अवस्था मार्क्सने पुढीलप्रमाणे लिहिल्या आहेत.

१) आदिम साम्यवाद

२) गुलामगिरी अवस्था

३) सरंजामशाही

४) भांडवलशाही

**१) आदिम साम्यवाद :** या अवस्थेमध्ये समाजाचे उदरनिर्वाहाचे साधन किंवा भरणपोषण निसर्गाने निर्माण केलेल्या अन्नाने होत असते. शिकार, मासे पकडणे, कंदमुळे-फळे गोळा करणे, रानटी धान्य, मध जमवणे अशी उपजिविकेची साधने होती. अन्नाचा पुरवठा निसर्गावर अवलंबून होता. प्रत्येकाने श्रम करुन स्वत:चा उदरनिर्वाह करणे या अवस्थेत

munotes.in

अत्यावश्यक होते. यामुळे या समाजात वर्गभेद नव्हता, मालकी व्यवस्था नव्हती आणि उच्च नीच भेद ही नव्हता.

राजा, शासन, कायदा, न्यायव्यवस्था, सैन्य अशा संस्थांचे अस्तित्व नव्हते. प्रत्येक व्यक्तीच्या संरक्षणाची व पोषणाची जबाबदारी सर्व समाजावर होती. अशी अवस्था नसली तर काही महत्त्वाच्या किंवा अडचणीच्या प्रसंगी नेत्याची गरज असे. नेता हा ज्ञान व कौशल्याधारीत होता. ही निवड गणसभा करीत असे. उत्पादनाची साधने व प्रत्यक्ष उत्पादन यांवर सर्वांचा अधिकार म्हणजेच सामुदायिक अधिकार होता. म्हणूनच मार्क्स या अवस्थेस साम्यवाद असे संबोधतो.

### २) गुलामगिरी अवस्था :

शेती, पशुपालनामुळे परिवर्तन आरंभ झाला. मानवाने उत्पादनशक्ती वाढवली. माणूस अगोदरप्रमाणे फळे गोळा करणे, शिकार करणे यासाठी वणवण करत नव्हता. पाळीव प्राणी हे दूध, मांस व वस्त्राचीही गरज भागवत होते. शेतीमुळे पोटाची गरज भागून अन्न शिल्लक राहत होते. काहीच माणसांनी अन्नउत्पादन घेतले की ते इतरांनीही उपभोगण्याची शाश्वती निर्माण झाली. त्यामुळे सर्वांना एकाच कामात गुंतून राहण्याची आवश्यकता उरली नाही. यातून व्यवसाय व व्यापाराची निर्मिती होऊ लागली. हळूहळू यातून इतरांना कामे लावणे व इतरांच्या श्रमावर जगणाऱ्या वर्गाची निर्मिती झाली. सार्वजनिक शिल्लकीवर गणनायकांचा / नेत्यांचा ताबा येऊ लागला. यामध्ये काही निसर्गातील घटना उदा. पाऊस, विजांचा कटकडाट, महापूर इ. अज्ञात होत्या. मंत्र, प्रार्थना, बळी इ. साहाय्याने यातून समाजास निभावून नेण्याचे आश्वासन देणारे यांत्रिक यांचे महत्त्व प्रस्थापित झाले. प्रत्यक्ष उत्पन्न कार्यात साठा न घेता सवलत घेणारा पहिला व्यावसायिक मांत्रिक वर्ग होता. यामुळे उच्चवर्गात्वाची सुरुवात, खाजगी मालकी, वारसा हक्क, नेतृत्वाची मक्तेदारी इ. सुरु झाले.

एखाद्या परकीय माणसाला पकडून आणून त्याच्याकडून कामे करुन घेतली जाऊ लागली, या कैद्यांना गुलामासारखी वागणूक देऊन, आणखी गुलाम वाढविण्यासाठी टोळ्या तयार करणे, सैनिकव्यवस्था तयार झाली. पूर्वीचे समानतेचे वर्ग नष्ट हायला सुरुवात झाली. समाजात गुलाम, गुलामांचे मालक असे वर्ग निर्माण होऊन भेद वाढू लागला. आता समस्यांना प्रारंभ झाला. काही ठराविक उच्चभ्रु श्रीमंत, श्रमीक व गुलामांची वाढती संख्या अशी विभागणी झाली. वरिष्ठांतही लढाई करणारा योद्धावर्ग, पूरोहित वर्ग, व्यापारी असे भेद होते. यामुळे समाजाची व्यवस्था राखण्याचे काम कायदा व न्यायव्यवस्थेकडे म्हणजेच राज्यसंस्थेअंतर्गत आले. अशाप्रकारे बहूसंख्य जनतेच्या कष्टात वाढ होऊन वर्गसंघर्ष सुरु झाला.

**३) सरंजामशाही :** गुलामी व्यवस्थेचा अंत हा एका तीव्रतेनंतर झाला आणि काही कालावधीनंतर सरंजामशाही उदयास आली. श्रमिकाकडे स्वत:चा जमीनीचा तुकडा, स्वत:ची उत्पादनाची साधने आणि उत्पादनाचा ठराविक वाटा स्वत:कडे राहण्याची शाश्वती यामुळे गुलामापेक्षा यात अधिक स्वारस्य वाटू लागले. उत्पादनाची वेगवेगळी तंत्रे वापरुन तो उत्पादनात वाढ घडवून आणत होता. नांगर, हातमाग, शेती, फळ बागायत, दूध व्यवसाय यांत सुधारणा झाली सरंजामदार श्रमीकांनी केलेल्या श्रमाचा वाटा घेत असत परंतू पूर्ण मालकी नव्हती. सरंजामशाहीतील उत्पादन बहुतांशी स्थानिक गरजा पूर्ण करण्याकरिता

होत असे. व्यापाराच्या सुरुवातीमुळे कुशल कामगारांची निर्मिती होऊ लागली. प्रत्येक प्रांतात सरंजामशाही सत्ताधीश बनू लागली. या सत्तेस वसूली, फौज, द्रव्य पुरविणे अशी जबाबदारी होती. सरंजाम सत्ता जनतेसाठी ठराविक कामेच पार पाडत असे, पाटबंधारे कालवे आणि रस्ते यांची व्यवस्था ठेवणे.

सरंजाम व शेतकरी श्रमीक यांच्यात हळूहळू वाद निर्माण होऊ लागला, सरंजामशाहीतील उत्पादनाच्या विकासाबरोबर त्यांच्यातील वर्गसंघर्ष तीव्र होत गेला, अशी गुलामगिरीची व्यवस्था नाहीशी झाली व सरंजामशाही आली. तशाच पद्धतीने सरंजामशाहीची व्यवस्था उलटून भांडवलशाहीने आपली जागा पटकावली.

**४) भांडवलशाही :** नव्या वाढत्या व्यापाराची गरज भागविण्याची क्षमता सरंजाम पद्धतीमध्ये नव्हती. कारण तेथे फक्त स्थानिक गरजा पुरविण्याचे उत्पादन घेतले जात होते. भांडवलदारांनी कारखाने स्थापन केले आणि यामध्ये त्यांनी श्रमीकांस कामावर लावले. येथेच श्रमविभागणीची संकल्पना पुढे आली. उत्पादन वाढविण्यासाठी निरनिराळी यंत्रे शोधण्यात आली. अशा विकासासाठी भांडवल आणि कामगारच महत्त्वाचे घटक होते. व्यापारातून नफा मिळत होता, अशा नफ्याच्या द्रव्यातून भांडवलाची गरज पुरविली जात होती. उत्पादन व उदरनिर्वाह यांतून श्रमिकास तोडल्याशिवाय कामगार व्यवस्था स्थापित करणे शक्य नव्हते. यासाठी सरजामशाही संपवणे अनिवार्य होते. भांडवलदारांनी शेतकरी-श्रमीकांच्या मदतीने सरजामशाही नष्ट केली आणि येथेच भांडवलशाही प्रस्थापित झाली.

युरोपमध्ये भांडवलशाहीच्या विकासामध्ये स्वस्त माल आणि तोफा दारुगोळा, फौजा घेऊन युरोपीय भांडवलशाही आशिया खंडात उतरली. जिंकलेले देश हुकमी बाजारपेठ व स्वस्त कच्चा माल हस्तगत करण्यासाठी उपयोगी पडू लागले. भांडवलशाही समाज सरंजामशाही समाजापेक्षा प्रगत होता. यात श्रमीक उत्पादन व संपत्तीचा डोंगर निर्माण करतात परंतू बहुसंख्य श्रमीक स्वत:च कमी उत्पन्नात जगतात. ह्या प्रचंड उत्पन्नाचा भाग भांडवलदाराकडे जातो. यातूनच भांडवलदारी केंद्रीकरण व मक्तेदारी सुरु होते. कामगारांचे शोषण अधिकाधिक होऊ लागते. यातून आर्थिक अरिष्टे, विषमता, पिळवणूक, युद्धे व साम्रज्यवाद असे प्रश्न उत्पन्न होऊ लागले. म्हणून मार्क्सने सांगितले की, कामगारवर्गच भांडवलशाही उलथून लावेल आणि समाजवादी व्यवस्था स्थापन होईल.

### २.४.३ शास्त्रीय समाजवाद :

स्वातंत्र्य व समता आधारित समाज अस्तित्वात येण्यासाठी संगतवार मांडणी कार्ल मार्क्स यांनी शास्त्रीय समाजवाद सिद्धांतामध्ये मांडली आहे. आर्थिक विषमतेचे व कामगार शोषणाचे खरे कारण शोधण्यासाठी धर्म, तत्वज्ञान, इतिहास व भौतिकशास्त्रांचा अभ्यास मार्क्सने केला. १८४८ मध्ये मार्क्स व एंगल्स यांनी कम्युनिस्ट मॅनिफॅस्टो जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये भांडवलशाही उलथवून लावून समाजवादाची सुरुवात करण्याचे विशेष प्रयत्न केले आहेत. अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या मार्क्सने पाच अवस्था सांगितल्या, चार आपण पाठीमागील मुद्यांमध्ये पाहिल्या, आदीम साम्यवाद, गुलामगिरी, सरंजामशाही व भांडवलशाही आणि पाचवी अवस्था समाजवाद होय. शेवटच्या समाजवादाच्या अवस्थेत कामगारवर्ग संघटितपणे उठाव करुन शासनसंस्था ताब्यात घेतो. उत्पादनाची साधने

समाजाच्या मालकीची होतात, वर्गविहीन, शोषणविरहित समाजामध्ये सर्व लोक कल्याणकारी, सुखाने जगतील. मार्क्सनी मांडलेला शास्त्रशुद्ध समाजवाद जगातील सर्व देशातील कामगारवर्गीय चळवळीची विचारप्रणाली व कार्यक्रम बनला आहे.

मानवी समाजामध्ये परिवर्तन कसे घडून येते, त्यामागे कोणते घटक व शक्ती असते याचा अभ्यास करण्यामध्ये मार्क्स यांना खास रस होता. समाज एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत (प्रगत अवस्थेत) कसा जातो, याचे शास्त्रीय विश्लेषण मार्क्स यांना करायचे होते. जग हे दोन प्रकारचे आहे. एक हे जग सर्वशक्तीमान ईश्वराने निर्माण केले आहे आणि दोन, सारे जग हे सत्य, आद्य आणि ज्ञेय आहे. मार्क्सने दुसरा भौतिकवादी दृष्टिकोन स्विकारला आहे. यातूनच समाज बदलाचे गतीशास्त्र मांडले. त्यासाठी मार्क्सने या भौतिकवादाला विरोध विकासाचे तत्व जोडून द्वंद्वात्मक भौतिकवाद मांडला.

मार्क्सच्या या विचारांचा स्वीकार सर्वात प्रथम रशियाने केला. २० व्या शतकाच्या सुरुवातीस संपूर्ण जगभर मार्क्सचे वादळ होते. परंतु याची सुरुवात १८४४ च्या द होली फॅमेली नावाच्या कार्ल मार्क्स व फ्रेडरीक एंजेल च्या पुस्तकातून झाली. त्यांनी भांडवलशाहीच्या चूकांवर कडाडून टीका केल्या. त्यांनी शास्त्रीय दृष्टीने समाजाच्या विकासासाठी समाजातील सर्वच वर्गाचे आर्थिक, भौतिक योगदान कशा पद्धतीने महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट केले.

## २.५ सारांश

डेव्हिड रिकार्डो हा दूसरा सनातनवादी अर्थतज्ञ असून त्याचा खंडविषयक सिद्धांत विचारात प्रसिद्ध आहे. रिकार्डोच्या मते, अन्नधान्याच्या किंमती ह्या खंडावरुन ठरत नाहीत, तर किंमतीवरुन खंड ठरत असतो. याचा अर्थ, खंडाचा समावेश किंमतीत होत नाही. रिकार्डोचा या व्यतिरिक्त वेतन व मूल्य सिद्धांतही आर्थिक विचारांत महत्त्वाचा आहे.

मार्क्सचे विचार शास्त्रशुद्ध समाजसत्तावादी देशातील कामगारवर्गाचा आदर्श म्हणून आजही प्रखर आहेत. जग कसं आहे हे सांगण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. परंतू जग बदलण्याचाच मुद्दा मोठा आहे. त्यामुळे त्यांनी समाज बदलाचे गतीशास्त्र मांडण्यासाठी आयुष्य खर्ची घातले. त्यामुळे मार्क्स यांनी समाज बदलाचे शास्त्रीय विचार मांडले आहेत.

## २.६ प्रश्नाभ्यास

१) रिकार्डोच्या खंडविषयक सिद्धांताचे मूल्यमापन करा.

२) रिकार्डोच्या मूल्यविषयक सिद्धांताचे परीक्षण करा.

३) मार्क्सचा अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत स्पष्ट करा.

४) नफ्याचा दर पसरण्याचा प्रवृत्तीचे मार्क्सने केलेले विवेचन लिहा.

५) मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद विस्तृतपणे लिहा.

❖❖❖❖

# ३

# नव-सनातनपंथी अर्थशास्त्र : अल्फ्रेड मार्शल

**घटक रचना :**

३.१ उद्दिष्टे

३.२ अल्फ्रेड मार्शलचे आर्थिक विचार

३.२.० जीवन परिचय

३.२.१ मुल्यविषयक विचार

३.२.२ प्रातिनिधीक उद्योगसंस्थेविषयक विचार

३.२.३ उपभोक्ता आधिक्य विषयक विचार

३.२.४ आभास खंड

३.३ सारांश

३.४ प्रश्नाभ्यास

## ३.१ उद्दिष्टे

- अल्फ्रेड मार्शलचे विचार स्पष्टपणे समजून घेणे.
- अल्फ्रेड मार्शलचे उपभोक्त्याविषयीचे सिद्धांत विशद करणे.
- आभास खंडाविषयीची अधिक माहिती प्राप्त करणे.
- अल्फ्रेड मार्शलचे अर्थशास्त्रातील योगदान करून घेणे.
- अल्फ्रेड मार्शलच्या विचारांची व जीवनातील आर्थिक घडामोडींची सांगड घालणे.

## ३.२ अल्फ्रेड मार्शलचे आर्थिक विचार

### ३.२.० जीवन परिचय :

मार्शल हे जगप्रसिद्ध ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ होते ते अर्थशास्त्रामधील नवसनातनवादाचा महत्त्वाचा पुरस्कर्ता होत. त्याचा जन्म लंडनच्या क्लॅपम नगरात झाला. त्याचे वडील बँक ऑफ इंग्लंडमध्ये रोखपाल म्हणून काम करत होते. त्यांना गणित विषयात आवड होती. यासाठी केंब्रिजच्या सेंट नॉन्स महाविद्यालयात प्रवेश मिळाला. ट्रायपॉस परिक्षेत तो दुसऱ्या रँकवर होता. क्लिपॉटन व केंब्रिजमध्ये गणित विषयाचे अध्यापन करु लागला. स्पेन्सर, गिल, टॉयन्बी, कुर्नी, बेथॅम यांच्या ग्रंथाच्या वाचनाचा व त्यांच्या विचारसरणीचा मार्शलवर

munotes.in

खोल परिणाम झाला. गतितज्ञ असूनही अर्थशास्त्राने झपाटून टाकले. मात्र अर्थशास्त्राची ओळख त्याला तत्वज्ञान आणि नितिशास्त्र या विषयाद्वारे झाल्यामुळे त्या विषयांचा प्रभाव होता.

केंब्रिजमध्ये अधिछात्रवृत्ती मिळत असताना १८७७ साली त्याने आपली विद्यार्थिनी मेरी पॅले हिच्याशी विवाह झाला. त्यानंतर ब्रिस्टल येथील युनिव्हर्सिटी कॉलेजचा पहिला प्राचार्य म्हणून १८८१ पर्यंत काम पाहिले. प्रकृतीवर परिणाम म्हणून पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर इटलीत वर्षभर विश्रांती घेतली. त्यानंतर ऑक्सफर्डच्या बॅल्यल महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाचा प्राध्यापक म्हणून काम केले. १९०८ मध्ये निवृत्त होईपर्यंत तो त्या जागेवर होता. मार्शलने अर्थशास्त्रातील केंब्रिज संप्रदायाची स्थापना केली. १९०२ पासून रॉयल इकॉनॉमिक्स सोसायटी ही संस्था आणि इकॉनॉमिक जर्नल मासिक या दोहोंची स्थापना त्यांच्या पुढाकारानेच झाली. अर्थशास्त्राची व्याख्या करताना एका बाजुला अर्थशास्त्र संपत्तीचा अभ्यास करते. तर दुसऱ्या बाजुला मानव आणि त्याचे कल्याण अर्थशास्त्राला जास्त महत्त्वाचे वाटते. तेव्हा त्याच्या व्यक्तिमत्वामधील मानवहितवाद प्रकर्षाने ध्यानात येतो. इकॉनॉमिक्स ग्रंथात हा शब्द प्रथमच योजिला. ज्या मानवी व्यवहाराचे पैशाच्या फूटपट्टीने मोजमाप करता येते त्याच व्यवहारात अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना स्वारस्य असते, असे मार्शल म्हणतो. अर्थशास्त्र हे प्रत्यक्षानुसारी, तसेच आदर्शनुसारी शास्त्र आहे, असे मार्शलचे मत होते.

मार्शलचे महत्त्वाचे ग्रंथ म्हणजे, इकॉनॉमिक्स ऑफ इंडस्ट्री (१८९९), प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स (१८९०), इंडस्ट्री अँड ट्रेड (१९१९) आणि मनी क्रेडिट अँड कॉमर्स (१९२४) हे होत. उपभोगाला अर्थशास्त्रामध्ये जास्त महत्त्व दिले. मानवी गरजा या सर्व आर्थिक व्यवहारांशी मुळाशी आहेत. उपभोग हा आर्थिक व्यवहाराचा प्रारंभ तसाच अंतही आहे. हे प्रथमच ठामपणे सांगितले. लवचिकतेची संकल्पना अर्थशास्त्रात महत्त्वाची आहे. उत्पादन कार्यात निसर्ग महत्त्वाची कामगिरी बजावतो, श्रमिकांची शारीरिक बौद्धिक वाढ सुद्धा भोवतालच्या परिस्थितीनुसार अवलंबून असते. अर्थशास्त्रात प्रातिनिधिक उत्पादनसंस्था ही कल्पना सर्वप्रथम मार्शलने उपयोगात आणली.

मार्शलने वस्तुचे मुल्य निश्चित करताना वस्तुची सीमान्त उपयोगिता व उत्पादन परिव्यय यांची सांगड घातली. मागणी पुरवठा ही कात्रीच्या दोन पात्यांप्रमाणे असतात. दोन्हीचा वापर केला तरच कापड किंवा कागद कापता येईल. मुल्यनिर्धारणात मार्शलने कालावधीला महत्त्वाचे स्थान येईल. अतिअल्पकाळात निर्धारित होणाऱ्या मुल्यास मार्शल विपणन किंमत (Market Price) म्हणतो. दीर्घकाळातील किंमतीस सामान्य किंमत (Normal Price) असे नाव देतो. मार्शलचे मत मानवनिर्मित उत्पादन घटकांचा पुरवठा अल्प काळात मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पादनाचे स्वरूप खंडासारखे असते. मार्शलचे आभासी वा प्रतिरूप खंड म्हणतो. दीर्घकाळात या घटकाचा पुरवठा वाढविणे शक्य असते तसे झाले म्हणजे अतिरिक्त उत्पन्न नाहीसे होते. उत्पादन घटकांना त्यांचे सर्वसामान्य उत्पन्न मिळू लागते. भुमीचा पुरवठा नेहमीच स्थिर असल्यामुळे तिला अल्पकाळात व दीर्घकाळात खंडात मिळत राहतो. मार्शलची प्रतिरूप खंडाची कल्पना मानवनिर्मित उत्पादन घटकाशी निगडीत आहे.

munotes.in

मार्शलने संपत्तीची अर्थशास्त्रावरील पकड कमी करुन ते मानवी कल्याणाभिमुख बनविले. मार्शलमधील हा मानवतावाद त्याने कामगाराची कार्यक्षमता आणि सवड यांची सांगड घातली आहे. कामगारांना विश्रांती मिळाली म्हणजे शिक्षण, क्रीडा व अन्य क्षेत्रांत प्रावीण्य मिळविणे शक्य होईल. यासाठी कामाचे तास कमी करावेत. परिणामी राष्ट्रीय उत्पन्नाचा आकार कमी झाला तरी प्रत्ययच नाही. असे ठामपणे मार्शलने म्हटले आहे. अर्थशास्त्राच्या सुबद्ध मांडणीचे श्रेय मार्शलकडे जाते. सीमान्त उपयोगितेची कल्पना तपशीलवार मांडली. पैशाचे मुल्य अन्य वस्तुंप्रमाणे मागणी पुरवठा यावर ठरते आणि पैशाची मुल्य अन्य वस्तुंप्रमाणे मागणी व पुरवठा यावर ठरते आणि पैशाचे मुल्य अन्य वस्तुप्रमाणे पैशाची मागणी प्रामुख्याने मुल्यसंचयासाठी केली जाते. या द्रव्यराशी सिद्धांचा या शेकडा शिल्लक दृष्टिकोन मार्शलने व अन्य केंब्रिज अर्थशास्त्रानी मांडला.

### ३.२.१ मुल्यविषयक विचार :

मार्शलने मुल्यसंदर्भातील विचार हे सनातनवादी विचारसरणी आणि उपयोगितावादी विचारसरणी यांच्या आधारे समन्वय साधून मांडले आहेत. विचारांना वस्तूनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनाची जोड दिली आहे. सनातनवादी विचारवंतांच्या मते, वस्तूचे मूल्य पुरवठा व उत्पादन खर्चाच्या समन्वयाने होते, तर ऑस्ट्रीयन (उपयोगितावादी) विचारवंतांनी मागणी व उपयोगिता यास महत्व दिले होते. मार्शलच्या मते, मागणी व पुरवठा या दोहोंच्या समन्वयाने मूल्य ठरत असते.

**दृष्टिकोन (मुल्यविषयक) :**

| विचारवंत | समन्वय |
|---|---|
| सनातनवादी | पुरवठा उत्पादन खर्च |
| ऑस्ट्रीयन | मागणी उपयोगिता |
| मार्शल | मागणी पुरवठा |

मुल्यनिश्चितीसाठी मागणी व पुरवठा यांना महत्त्व देऊन, मार्शलने मूल्य विवेचनामध्ये कालखंडाचा (Time) विचार केला आहे. मार्शलच्या मते, मूल्य हे आर्थिक समस्यांचे केंद्र आहे. मार्शलने, मागणीची बाजू स्पष्ट करताना खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या वर्तुणूकीचा अभ्यास केला आहे. ग्राहक हा उपभोक्ता बनून वस्तूपासून मिळणाऱ्या उपयोगितेचा विचार करत असतो. उपयोगिता सिद्धांत स्पष्ट करताना, उपभोक्ता जसे जसे एखाद्या वस्तुचा उपभोग अधिक संख्येने घेऊ लागतो. तसे-तसे उपयोगिता कमी होत जाते. हे विश्लेषण तो तक्त्याद्वारे करतो. पुरवठ्याच्या बाजूने विक्रेत्याच्या वर्तणूकीचे विश्लेषण केले आहे. वस्तूची विक्री किंमत निश्चित करताना, विक्रेत्यास वस्तूची सीमांत उपयोगिता व पैशाची सीमांत उपयोगिता यांच्यात संतुलन असणे गरजेचे असते यामुळे मार्शल वस्तूची मागणी व पुरवठा यांच्या संतुलनाने मूल्य ठरते असे ठामपणे सांगतो.

वस्तूची बाजार किंमत अशा बिंदूस निश्चित होते, त्या ठिकाणी मागणी वक्र व पुरवठा वक्र एकमेकांस छेदतात. अशा बिंदूवर सीमांत मागणी किंमत व सीमांत पुरवठा किंमत, वस्तूच्या विनिमयासाठी समान असतात. यासाठी मार्शल कात्रीचे उदाहरण देतो. एखादे कापड

munotes.in

कापायचे असल्यास कात्रीच्या दोन्ही पात्यांवर बोटांनी समान जोर लावतो, त्या पद्धतीने मागणी व पुरवठ्याच्या संतूलनासाठी बाजार कार्य करत असते.

कालखंडविषयकचे विश्लेषण व मूल्यनिश्चितीतील स्थान आजही महत्त्वाचे मानले जाते. मूल्यनिश्चितीमध्ये कालखंडाच्या अल्पकाळ व दीर्घकाळ अशा संकल्पना मांडल्या. अल्पकालावधीमध्ये, बाजार मूल्य हे तात्पुरत्या संतुलनाने निश्चित होते, ज्यामध्ये मागणी अत्यंत प्रभावी असते. दीर्घकालावधीत स्थिर / शाश्वत संतुलन प्राप्त झालेले असते, ज्यामध्ये सामान्य किंमत ही उत्पादन खर्चाएवढी असते. मार्शल उत्पादन खर्चासंदर्भात वास्तव खर्चाची संकल्पना मान्य करतो, ज्यामध्ये श्रमीकाच्या परिश्रम, हाल अपेष्ठा, त्रास आणि पैशातील खर्च याचा समावेश करतो.

अशाप्रकारे मार्शल मुल्य संकल्पना स्पष्ट करताना मागणी-पुरवठा या अंतर्गत कालखंडाचा विचार करतो. तसेच त्याने सनातनी व उपयोगितावादी मूल्यविषयक विचारांत समन्वय साधले आहे.

### ३.२.२ मार्शलचे प्रातिनिधीक उद्योगसंस्थेविषयक विचार :

मार्शलने उत्पादनाविषयी जे.एस. मिल यांच्या विचारांना अवलंबल्याचे दिसते. ज्यामध्ये वस्तूच्या उत्पादनाचे तीन घटक - श्रम, भूमी आणि भांडवल असे मानले गेले आहेत. मार्शलला संस्था व उदयमाचे (उपक्रम) महत्त्व माहित होते. संस्थेशी संबंधित अंतर्गत व बाह्य बचतीवर तो विवेचन करत होता. मार्शलला, माल्थसच्या लोकसंख्याविषयक सिद्धांतावर कायम त्रुटी दिसत होती. त्याच्या मते, आधुनिक समाजात लोकसंख्येपेक्षा संपत्ती ही अधिक वेगाने वाढत असते.

मार्शलने उत्पादनाच्या अनुषंगाने प्रातिनिधिक उद्योगसंस्थेच्या संकल्पनेला चालना दिली.

मार्शलच्या मते, “One which has a fairly long life, and fair success, which is managed with normal ability, and which has normal access to the aggregate of production, account being taken of the class of goods produced, the conditions of marketing them and the economic environment generally.”

संक्षिप्तपणे याचा अर्थ असा की, प्रातिनिधिक उद्योगसंस्था ही उद्योगधंद्याची सरासरी उद्योगसंस्था असते. या प्रातिनिधिक उद्योगसंस्थेच्या उत्पादन खर्चाचा विचार मार्शलने मुल्य सिद्धांतामध्ये केला आहे.

प्रातिनिधिक उद्योगसंस्थेमध्ये प्रचलित उत्पादन तंत्र व व्यवस्थापकीय कौशल्य, पूर्ण स्पर्धेच्या स्थितीमध्ये, प्रातिनिधिक उद्योगसंस्थेचा सरासरी खर्च किमान असतो. त्यामुळेच अशी संस्था दीर्घकाळात टिकून राहू शकते. अशा उद्योगसंस्थेचा दीर्घकाळातील सरासरी खर्च किमा पातळीवर असल्याने ती इतर उद्योगसंस्थांचे प्रतिनिधित्व करत असते.

munotes.in

**तक्ता क्र. ३.१**

| अंतर्गत लाभ | | बाह्य लाभ | |
|---|---|---|---|
| A) | तांत्रिक लाभ | अ) | विशेषीकरण |
| B) | व्यवस्थापकीय लाभ | ब) | स्थानीकीकरण |
| C) | भांडवलविषयक लाभ | क) | संशोधन लाभ |
| D) | खरेदी विक्री विषयक लाभ | ड) | उपफल निर्मिती |
| E) | मागणी लाभ | | |

मार्शलच्या प्रातिनिधिक उद्योगसंस्थेच्या सिद्धांतावर प्रा. श्राफा, प्रा. रॉबीन्स आणि प्रा. पिगू यांनी टीका केल्या आहेत. बदलत्या काळात मार्शलच्या प्रातिनिधिक उद्योगसंस्थेच्या विचाराला तडा जाऊन पर्याप्त उद्योगसंस्था प्रचलित झाली आहे.

### ३.२.३ मार्शलचे उपभोक्ता आधिक्य विषयक विचार :

मार्शलचा उपभोगविषयक सिद्धांतावर सनातनवादी अर्थतज्ज्ञांच्या विचारांना विरोध करत होता. त्याच्या मते, आधुनिक समाजात, मनुष्य हा अमर्यादित इच्छांनी प्रोत्साहित होत असतो. इच्छा ज्या पूर्ण होतात त्या पूर्ण झाल्या की, माणूस दूसऱ्या इच्छा निर्माण करुन त्यापाठीमागे धावत असतो अशा न संपणाऱ्या साखळ्याच मानवाला उपभोगाची चेतना देतात. यामुळे कोणत्याही आर्थिक क्रियेचे मुळ हे उपभोगामध्ये आहे आणि याचाच अभ्यास आपण सर्वात प्रथमत: करायला हवा.

मार्शलने इच्छांची काही वैशिष्ट्ये आणि विश्रांती व आरामाची चर्चा केली आहे. त्याने दैनंदिन जीवनातील उदाहरणांच्या / अनुभवाच्या आधारे अत्यावश्यक गरजा, सोई-सुविधात्मक गरजा व चैनीच्या / प्रतिष्ठेच्या गरजा (Necessities, Comforts and Luxuries) विश्लेषित केल्या आहेत.

मार्शलने उपभोक्त्याचे आधिक्य (संतोषाधिक्य) हे मनुष्याच्या समाधानाचे मोजमाप, जे एखादी वस्तू उपभोगल्यानंतर प्राप्त होते, हे अभ्यासले. एखादी वस्तू खरेदी करताना त्याला द्यावी लागणारी किंमत ही वस्तू उपभोगल्यानंतर मिळणाऱ्या आनंदापेक्षा कमी असल्यास संतोषाधिक्य प्राप्त होते.

munotes.in




**आकृती क्र.३.१**

**तक्ता क्र.३.२**

| Units | Marginal Utility | Price of the unit | C.S. |
|---|---|---|---|
| 1 | 50 | 10 | 40 |
| 2 | 40 | 10 | 30 |
| 3 | 30 | 10 | 20 |
| 4 | 20 | 10 | 10 |
| 5 | 10 | 10 | 00 |
| | 150 | 50 | 100 |

वरील आकृती व तक्त्यावरुन समजते की, जोपर्यंत वस्तूच्या तिसऱ्या नगसंख्येपर्यंत उपभोग घेत आहोत, तोपर्यंत वस्तूच्या किंमतीपेक्षा अधिक सीमांत उपयोगिता प्राप्त होते. त्यामुळे उपभोक्त्याचे संतोषाधिक्य हे दिसून येते. त्यानंतर हळूहळू कमी होऊन उपभोक्ता संतोषाधिक्य नगसंख्या पाचपट शून्य होते. अशाप्रकारे रेखांकित भागामध्ये उपभोक्ता संतोषाधिक्य जे किंमतीपेक्षा अधिक आहे, दर्शविले आहे.

### ३.२.४ आभास खंड (Quasi Rent) :

आभासी खंडाला तात्पुरता खंड असेही म्हणतात. आभास खंड याचा अर्थ खंडासारख्या / खंडसदृश्य / असे उत्पन्न की जे खंडासारखे आहे, असा होतो, डॉ. मार्शल यांनी आभास खंडाची संकल्पना सर्वप्रथम मांडली, अतिअल्पकाळात बाजारात एखाद्या वस्तूची मागणी खूपच वाढली तर अल्प कालावधी असल्यामुळे लगेच पुरवठा वाढविता येत नाही, त्यामुळे त्या वस्तूची किंमत खूप वाढते. उत्पादन वाढविण्यासाठी लागणाऱ्या कालावधीत त्या वस्तूच्या मालकांस तात्पुरते अधिकचे किंवा ज्यादा उत्पन्न मिळते, यास आभास खंड असे संबोधले आहे.




**आकृती क्र.३.२**

munotes.in

**तक्ता क्र.३.३**

| किमंत (Price) | उत्पादन रेषा (Product Line) | उत्पादन (Output) | संतुलन (Equilibrium) | एकूण प्राप्ती (TR) | एकूण बदलता खर्च TVC | आभास खंड Quasi Rent |
|---|---|---|---|---|---|---|
| OP | PL | OM | Q | OMQP | OMEF | FEQP |
| $OP_1$ | $P_1L_1$ | $OM_1$ | R | $OM_1RP_1$ | $OM_1GH$ | $HGRP_1$ |
| $OP_2$ | $P_2L_2$ | $OM_2$ | S | $OM_2SP_2$ | $OM_2SP_2$ | (0) |

वरील आकृती व सारणीमध्ये रेखाटल्याप्रमाणे, जेव्हा एका उत्पादन संस्थेमार्फत मशीन (स्थिर घटक) व श्रम (बदलता घटक) वापरुन उत्पादन घेतले जाते, तेव्हा मशीनीस करार पद्धतीने प्रति महिना मोबदला दिला जातो, तर श्रमाचा मोबदला वेतन हा बदलता खर्च ठरतो. अशा परिस्थितीत मागणी व खर्च रचना खालीलप्रमाणे विश्लेषित केले जाईल.

१) जेव्हा किंमत OP असेल, तेव्हा उत्पादन रेषा PL इतकी दर्शविली आहे. यातून मिळणारे उत्पादन हे OM इतके असून समतोल बिंदू Q हा आहे. या सर्वामधून TVC आणि TR यांचा फरक काढल्यास आपणास आभास खंड मिळतो.

$$\therefore TR - TVC = Q.R.$$
$$OMQP - OMEF = Q.R.$$
$$OMQP = OMEF = QPEF$$

२) जेव्हा किंमत $OP_1$ असेल, त्या ठिकाणी उत्पादन रेषा $P_1L_1$ आहे. यातून मिळणारे उत्पादन $OM_1$ इतके असल्यास संतुलन अवस्था R वर प्राप्त होत आहे, म्हणून आपणास आभास खंड काढण्यासाठी TVC व TR चा विचार करावा लागेल.

$$\therefore TR - TVC = Q.R.$$
$$OM_1SP_1 - OM_1GH = Q.R.$$
$$OM_1RP_1 = OM_1GH = RP_1HG$$

३) जेव्हा किंमत $OP_2$ इतकी कमी असल्यास त्याची उत्पादन रेषा ही $P_2L_2$ असेल, यातून $OM_2$ इतके उत्पादन प्राप्त होते, जेथे S ही संतुलन अवस्था दर्शविली आहे. या दिलेल्या सर्व बिंदूच्या आधारे आपण आभास खंड मोजूया.

$$\therefore TR - TVC = Q.R.$$
$$OM_2SP_2 - OM_2SP_2 = Q.R.$$
$$OM_2SP_2 = OM_2SP_2 = 00.(zero)$$

थोडक्यात, मागणीतील वाढीच्या प्रमाणात पुरवठा वाढविता येणे शक्य नसल्यामुळे स्थिर उत्पादन घटकांना मिळणारा अतिरिक्त मोबदला हा आभास खंड असतो. आभास खंडाचे दैनंदिन अवस्थेतील एक उदाहरण देता येऊ शकते. काही कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ (MSRTC) च्या म्हणजेच एस.टी. कर्मचार्यांच्या संपामुळे लोकांनी प्रवासासाठी खाजगी बस व ऑटोरिक्षांचा वापर केला. या अल्पकाळात बसेस व रिक्षा मालकांनी अतिरिक्त उत्पन्न कमवले. हे अतिरिक्त उत्पन्न त्यांचा पुरवठा मागणीच्या प्रमाणात वाढविता येणे शक्य नसल्यामुळे प्राप्त झाले. या अधिकच्या उत्पन्नास आभास खंड म्हणणे उचित (योग्य) राहील.

## ३.३ सारांश

मार्शल हा नवसनातनवादी अर्थतज्ञ ज्याने उपभोग, लवचिकता, उपयोगिता, वस्तूचे मूल्य, मागणी, पुरवठा, खंड या सर्व घटकांबरोबरच मानवतावादी दृष्टीने आर्थिक-विचार विस्तृत केले आहेत. मार्शलने मूल्यनिश्चितीसाठी जुन्या दोन विचारांच्या समुच्चयाने मागणी व पुरवठ्यास महत्त्व देऊन नवा विचार प्रस्थापित केला आहे. त्याने उपभोक्ता संतोषाधिक्यामध्ये उपयोगिता व वस्तूची किंमत यांची तुलना केली आहे. आभासी खंड हा तात्पुरता खंड असतो असे प्रतिपादन सर्वप्रथम करणारेही मार्शलच होते. अशाप्रकारे मार्शल

यांना सनातनवाद्यांपेक्षा पुढे एक पाऊल टाकून आर्थिक विचारांना दिशा देण्याचे काम केले आहे.

## ३.४ प्रश्नाभ्यास

१) मार्शलचे मूल्यविषयक विचार विस्तृतपणे लिहा.

२) मार्शलच्या प्रातिनिधिक उद्योगसंस्थेच्या लाभांविषयी टीप लिहा.

३) मार्शलचा उपभोक्ता संतोषाधिक्य स्पष्ट करा.

४) आभास खंड म्हणजे काय? विस्तृतपणे लिहा.

❖❖❖❖

munotes.in

# ४

## नव-सनातनपंथी अर्थशास्त्र : शुंपीटर व पिगु

**घटक रचना :**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ शुंपिटरचे आर्थिक विचार

४.३ पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्र

४.४ सारांश

४.५ प्रश्नाभ्यास

## ४.० उद्दिष्टे

- शुंपीटरचा जीवन परिचय माहिती करुन घेणे.
- शुंपीटरचे आर्थिक विकासाचे विश्लेषण समजून घेणे.
- नवप्रवर्तनाचा सिद्धांत संक्षिप्तपणे समजून घेणे.
- पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्र समजून घेणे.
- कल्याणकारी अर्थशास्त्राचे महत्त्व अभ्यासणे.

## ४.१ प्रास्ताविक

पाठीमागील प्रकरणामध्ये आपण अल्फ्रेड मार्शलचे नवसनातनवादी विचार अभ्यासले. अल्फ्रेड मार्शलच्या प्रमुख आर्थिक विचारात सुक्ष्मलक्षी अर्थशास्त्राचे विवेचन पहावयास मिळते. त्याने मुल्याविषयी, प्रतिनिधीक उद्योगसंस्थेविषयी, उपभोक्त्याच्या आधिक्याविषयी आणि आभासी खंडाविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. मुख्यत: या सर्व विचारांत व्यक्ती केवळ मागणी-पुरवठा, उत्पादन व त्याचे घटक याच बाबींशी जास्त निगडीत असलेला अभ्यासायला मिळतो.

या प्रकरणामध्ये आपण शुंपीटर व पिगू यांचे आर्थिक विचार अभ्यासणार आहोत. शुंपीटरच्या आर्थिक विचारांमध्ये आर्थिक विकास व नवप्रवर्तनाचा सिद्धांत हे दोन घटक महत्त्वाचे आहेत. भांडवली अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करुन देशाचा आर्थिक विकास साधणे.

munotes.in

यासाठी नवप्रवर्तनास दिलेले महत्त्वही गती प्राप्त करुन देते. यामुळे बर्नर सोम्बार्टने संकल्पना तयार करुन शुंपीटरच्या सर्जनशील विकास शब्दास प्रचिती मिळवून दिली.

यासोबतच कल्याणकारी अर्थशास्त्राच्या अनुषंगाने आपण मुख्यत: प्रा. पिगुच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करायचा आहे. पिगुने व्यक्तीगत कल्याणापासून ते सामाजिक कल्याण, राष्ट्रीय संपत्तीत वाढ, उत्पन्नाचे योग्य वितरण अशा संकल्पनांचा वापर करुन कल्याणाचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन समोर मांडला आहे. मिल, रॉबीन्स, मार्शल तसेच केन्स यांनीही कल्याणासाठी आर्थिक विचार व मार्गदर्शना संदर्भात अनेक मते मांडली आहेत, ज्यामध्ये केन्ससारख्या अर्थतज्ञाने मंदीच्या काळात अर्थव्यवस्थेला वर काढण्यासाठी किंवा देशाच्या कल्याणासाठी शासकीय हस्तक्षेप व ध्येय धोरणांची अंमलबजावणीचे तत्व समोर आणले. अशाच प्रकारे या प्रकरणामध्ये आपण पिगूचे आर्थिक विचार व पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्रीय विचार अभ्यासणार आहोत.

## ४.२ शुंपिटरचे आर्थिक विचार

**जीवन परिचय : जोसेफ शुंपीटर**

मोशेव्हियातील विएश येथे जन्मलेला अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण व्हिएन्ना येथे पुढे बॉन विद्यापीठात सार्वजनिक वित्तव्यवहाराच्या अध्यायनावर त्यांनी प्राध्यापक संशोधन म्हणून काम केले (१९२५-३२). त्याच वर्षी त्यांनी अमेरिकेत स्थलांतर केले. १९३२ पासून शेवटपर्यंत ते हार्वर्ड अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. १९१९ मध्ये सहा महिने ते ऑस्ट्रिलियामध्ये रेने यांच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होते. भांडवल-आयामच्या मुद्यावरुन मतभेद झाले व ते बाहेर पडले. गणिती तंत्राचा अर्थशास्त्रात वापर करण्यासंबंधी अनुकूल होते.

शुंपिटर यांनी अनेक पुस्तके लिहिली त्यापैकी द थिअरी ऑफ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट १९३४; बिझनेस सायकल्स; ए थिऑरेटिकल्स, हिस्टारिका अँड स्टॅटिस्टिकल ॲनॅलिसिस ऑफ द कॅपिटॅलिस्ट प्रासेस ही महत्त्वाची आहेत. शुंपिटर यांच्या आर्थिक विचारांचा इतिहासाचा परिघ विशाल आहे. त्यात व्यापारचक्रे, आर्थिक विकास आणि अभिवृद्धी, भांडवलशाहीची उत्क्रांती, विकासातील नवप्रर्वतनाची भूमिका इ. विषय येतात. त्यातही नवप्रर्वतन संकल्पना लेखनात केंद्रस्थानी येते. करपद्धती व करधोरण यांवर त्यांनी १९१८ मध्ये एक पुस्तक लिहिले. पहिल्या महायुद्धानंतर ऑस्ट्रियातील समस्यांचे त्यात विवेचन आहे. आर्थिक धोरणाचा आराखडा कसा असावा. याचा वस्तुपाठच त्या पुस्तकातून जाणवतो. त्या काळात करपद्धती, आर्थिक मंदी, न्यू डील यावर विपुल लिखाण केले. कार्ल मार्क्सचा १८८३ मध्ये मृत्यु झाला. त्याच वर्षी केन्स तसेच शुंपिटर यांचा जन्म झाला. एक अर्थपूर्ण योगायोग म्हणता येईल. भांडवलशाही समाजवाद व लोकशाही या विषयीच्या पुस्तकात शुंपिटर यांचे भांडवलशाहीच्या वाटचालीचे मौलिक चिंतन आढळते.

उद्योजक, मक्तेदाऱ्या, तांत्रिक सुधारणा, आर्थिक चढउतार टप्पे पार करीत भांडवलशाहीची प्रगती सुरुच राहील. असा त्यांचा दावा आहे. परंतु उद्योजकांच्या स्वतंत्र निर्णय घेण्याच्या क्षमतेवर आक्रमणे होतील. नोकरशाहीची पकड वाढल्यावर उद्योजकांची सर्जनशीलता कमी होईल. भांडवलशाही वाढ हळूहळू खुंटेल आणि समाजवाद अवतरेल असे भाकित होते.

हिस्टरी ऑफ स्कॉनॉमिका अनॉलिसिस (१९५४) या मरणोत्तर प्रकाशित ग्रंथात यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

**१) आर्थिक विकासाचे विश्लेषण :**

शुंपीटरने आर्थिक विकासाचे विश्लेषण 'Theory of Economic Development' (आर्थिक विकासाचे सिद्धांत) या पुस्तकात केले आहे. हे पुस्तक १९११ मध्ये जर्मन भाषेत प्रकाशित झाले आणि त्याची इंग्रजी आवृत्ती १९३४ मध्ये आली. यानंतर विकासास व्यापक रुप व्यापारी चक्रे (Business Cycles) १९३९ व भांडवलशाही, समाजवादी आणि लोकशाही (Capitalism, Socialism and Democracy) १९४२ यांमधून पुस्तकरूपात दिसून येते. शुंपीटर भांडवली व्यवस्थेचा पुरस्कर्ता होता. आर्थिक विकासाचे चक्रीय प्रवाह पद्धतीने विश्लेषण करताना शुंपीटर म्हणतो की, चक्रीय प्रवाह हा स्थिर संतूलनाचा आधार आहे.

पूर्ण स्पर्धेमध्ये स्थिर संतुलन अवस्था मानली आहे. यामध्ये अतिरिक्त लाभ नसतो, व्याज नसते, बचत नसते किंवा यामध्ये बेरोजगारी सुद्धा आढळून येत नाही, म्हणून अशा संतुलनाला शुंपीटर चक्रीय प्रवाह म्हणतो. चक्रीय प्रवाहात प्रत्येक वर्षी त्याच तंत्राचा वापर करुन एका समान संख्येत वस्तूचे उत्पादन घेतले जाते, जेवढी त्या वस्तूची मागणी आहे, वस्तुच्या मागणी व पुरवठ्याचे समायोजन करुन संतुलन अवस्था प्राप्त केली जाते. यामुळे संसाधनाचा अपव्यय होत नाही. उत्पादन घटकांना त्यांचा मोबदला सीमांत उत्पादनाच्या आधारे दिला जातो. अशा स्थिर अवस्थेमध्ये लोकसंख्या वृद्धी ही स्थिर आणि पूर्ण रोजगार स्थिती असते.

शुंपीटरच्या मते, स्थिर संतुलन अवस्थेतील विकासासाठी परिवर्तनाची आवश्यकता असते. त्यामुळे द्वितीय अवस्थेत नवप्रवर्तनाला महत्त्व प्राप्त झाले. विकास प्रक्रियेत संयोजकास नवप्रवर्तनाची चालना मिळते. धोका आणि अनिश्चिततेला सामोरे जाण्याची इच्छाशक्ती किंवा कार्ययोग्यता व कुशलता ज्या उद्योजकाकडे असते, तोच नवप्रवर्तन किंवा नावीण्यतेची सुरुवात करतो. अशी सुरुवात केवळ लाभाच्या दृष्टीने होत नसून व्यवसायामध्ये सृजनशीलता व विशिष्ट ओळख निर्माण व्हावी. अशा ध्येयाने होत असते. संयोजकास यासाठी लाभ दरासोबतच अनुकूल वातावरण ही प्रेरणा देते. संयोजक अशा समाजात आपली क्षमता विकसित व सिद्ध करतो, ज्या ठिकाणी त्याच्या कार्याची प्रशंसा होईल, प्रसिद्धी मिळेल किंवा सम्मान प्राप्त होईल. अशाप्रकारे संयोजक / नवप्रवर्तक विकासाचा एजंट असतो. त्याची कल्पना, विचार व दृष्टी, कार्यात बदलतात. हे कार्यच त्याचे प्रयोग ठरुन, त्यातून शोध लागतो.

नवप्रवर्ताची क्रिया खालील काही मुद्यांद्वारे अभ्यासता येईल.

अ) नवीन वस्तू बाजारामध्ये ग्राहकांसाठी उपलब्ध करणे, जी ग्राहकांना पूर्णपणे नवीन असेल. त्यास कसल्याही प्रकारची माहिती नसेल.

ब) उत्पादनाचे नवीन तंत्र

क) नव्या बाजाराची उपलब्धता.

ड) कच्च्या मालाच्या उत्पादनाचा नवीन स्त्रोत

इ) नवीन उद्योगसंस्थेचा परिचय

अशा वरील काही घटकांमुळे आर्थिक क्रियांमध्ये गती येते. वस्तूच्या किंमती व उत्पन्नात वाढ होते. विकासाची ही अवस्था नवप्रवर्तनात गुंतवणूकीची आहे.

आर्थिक विकास विश्लेषणात शुंपीटरने पत (credit) च्या महत्त्वाचे सुद्धा वर्णन केले आहे. उत्पादनाचे घटक खरेदीसाठी किंवा वापरासाठी पैसा महत्त्वाचा असतो. पत म्हणजे चालू उत्पन्न नव्हे किंवा बचत नव्हे, तर बँकाद्वारे उपलब्ध पैसा जो गुतवणूक हेतूने दिला जातो. व्यवसायाच्या विस्तारासाठी बँकाकडून मिळणारा पैसा महत्त्वाचा असतो. काही अर्थतज्ञ आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला क्रमिक व नियमित मानतात, परंतु शुंपीटर काही धोक्याच्या बाजू लक्षात घेऊन वृद्धीस अनियमित व असंगतीपूर्ण मानतो. व्यवसाय किंवा बाजार हा स्थिर नसून, तो बदलणारा (Dynamic) असतो. स्थिर अवस्थेमध्ये आर्थिक चलांचे अनुमान योग्य असू शकतात पण बदलत्या बाजार प्रक्रियांत धोके व अनिश्चितता असते आणि यामुळेच नवप्रवर्तकास / संयोजकास अधिक गुंतवणूक अधिक लाभाची संधी उपलब्ध होते.

सनातनवादी अर्थतज्ञ ऱ्हासमान प्रतिफलाच्या नियमामुळे व लोकसंख्या वृद्धीमुळे चिंतीत होते, परंतु शुंपीटर याबाबतीत निर्धास्त होता. शुंपीटरला भांडवलशाही व्यवस्थेच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास होता, जी व्यवस्था राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्यास मदत करते. या प्रक्रियेत काही धोके व अनिश्चितांना त्याने स्विकार केले. शुंपीटरला भांडवलशाहीवर प्रचंड विश्वास होता, परंतु मार्क्सच्या भांडवलशाहीची समाप्ती व समाजवादाचा उदय या विचाराने तो प्रभावितही झाला होता. अशावेळी शुंपीटर म्हणतो, 'ही भांडवलशाहीची असफलता नाही, फक्त अशी अवस्था आहे जिथे सोन्याची अंडी देणारी कोंबडी मारली जाते."

कमी विकसित किंवा विकासनशील देशांत सामाजिक आर्थिक संस्था ह्या पारंपारिक शैलीच्या असतात. यांत कमी बचतीच्या शक्यता व पत पुरवठा संस्था कार्यकुशल नसतात. अशावेळी भांडवली तंत्र व कौशल्याची आयात करावी लागते. वास्तविक रित्या कमी विकसित देशांत लोकसंख्या दबावामुळे कृषी उत्पादन वाढीसाठी तंत्रांत बदल करणे आवश्यक आहे, त्यामुळे स्वायत्त गुंतवणूकच प्रेरित होत असते. कमी विकसित किंवा विकासशील देशांत नवप्रवर्तकाची / संयोजकाची कमी असते. अशा ठिकाणी समाजाची निष्क्रियता व नाविण्यतेस प्रोत्साहन देणारे सामाजिक वातावरण आढळत नाही. अशावेळी देशातील सरकारने नियोजन करणे महत्त्वाचे असते.

कल्याणकारी राज्याची स्थापना व जीवनस्तरात वृद्धीशी संबंधित उपभोग व मागणी, विकास प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका निभावतात. उत्पन्नातील असमानतेची कमी, सामाजिक सुरक्षा व कल्याण प्राथमिक महत्त्वाचे असतात. शुंपीटरच्या मते, लाभ वृद्धी व व्यावसायिक असफलतेपेक्षा याचा विचार करणे गरजेचे आहे.

## २) नवप्रवर्तनाचा सिद्धांत :

इतर अर्थशास्त्रज्ञांच्या कल्पनांशी शुंपीटरचे नाते गुंतागुंतीचे होते. आर्थिक विश्लेषणातील व्यवसाय चक्र व विकासाचा सिद्धात यांमध्ये काही मतभेद होते. शुंपीटरने वॉलरस किंवा केन्स या दोघांच्याही विचाराचे पालन न करता Theory of Economic Development (आर्थिक विकासाचे सिद्धांत) यामध्ये आपली मते मांडली. यांत प्रामुख्याने कोणत्याही नवकल्पना वगळून स्थिर स्थितीचे विश्लेषण आहे. त्यांनी नवकल्पना, चक्र आणि विकास यांना जोडणारा सिद्धांत मांडताना रशियन निकोलाई कोंट्राटिएव्हच्या पन्नास (५०) वर्षाच्या चक्र लहरीच्या कल्पना जीवंत ठेवल्या असल्या तरीही कोंट्रटिएव्हच्या विभाजनाबाबत त्याने कधीही निश्चित मॉडेल प्रस्तावित केले नाही. शुंपीटर उद्योजकतेबद्दल सिद्धांत मांडताना, त्यांना मार्क-१ व मार्क-२ नावानेही संबोधले जाते. मार्क-१ मध्ये त्याने असा युक्तीवाद केला की, राष्ट्रातील नवकल्पना आणि तांत्रिक बदल हे उद्योजक / संयोजक/ नवप्रवर्तकाकडून येतात. माक-२ नुसार, मोठ्या व्यवसायांचा सामान्य लोकांच्या जीवनावर नकारात्मक परिणाम होतो, ह्या प्रचलित मताच्या विरोधामध्ये शुंपीटरने असा युक्तीवाद केला की, नवकल्पना आणि अर्थव्यवस्थेला चालना देणारे संयोजक ज्यांच्याकडे नवीन उत्पादने आणि सेवांच्या संशोधन आणि विकासामध्ये गुंतवणूक करण्यासाठी भांडवल असते. वस्तू व सेवा अधिकाधिक स्वस्त करुन कमीतकमी किंमतीमध्ये ग्राहकांपर्यंत पोहचल्या की, लोकांचे जीवनमान उंचावते असे शुंपीटरचे मत होते.

चक्रीय अस्थिरता आणि आर्थिक वाढ या दोन्हीसाठी नवप्रवर्तन महत्त्वाचे ठरते. नवप्रवर्तने किंवा नवोपक्रमातील चढउतारांमुळे गुंतवणूकीत चढ उतार होतात आणि त्यामुळे आर्थिक वाढीचे चक्र सुरु होते, म्हणून दीर्घकाळातील चक्रे नवनिर्मितीमुळे होतात. नवप्रवर्तनाचे दर बदल नवीन गुंतवणूक दर बदल करतात, नियंत्रण ठेवतात आणि त्याचा एकत्रित परिणाम म्हणून एकूण उत्पादन किंवा रोजगारामध्ये चढ उतार होतात. या प्रक्रियेत काही चलांचा समावेश होतो. उदा. शोध, नवकल्पना, प्रसार मार्ग आणि गुंतवणूक प्रक्रिया इत्यादी नवीन शोध सामान्यता आदिम असतात. त्यांची कामगिरी विद्यमान तंत्रज्ञानापेक्षा कमी असते आणि त्यांच्या उत्पादनाची किंमत जास्त असते.

शुंपीटरच्या मते, आर्थिक विकासाचे प्रमुख कारण नवप्रवर्तन आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये हे चित्र समर्थक ठरते. स्थिर संतुलन अवस्थेमुळे उद्योजक आर्थिक विकासाची प्रक्रिया नवप्रवर्तनाद्वारे सुरु करतात. नवनवीन शोध, नाविण्यपूर्ण उत्पादन आणून व्यवसायाची जोखीम उचलत असतात.

**नवप्रवर्तनाचे (नाविण्यतेचे) प्रकार :**

i. नवीन वस्तू (Innovation of new goods)
ii. नवीन तंत्राचा वापर (The use of new method or technique of production)
iii. नवीन बाजाराचा विकास (The opening of new market)
iv. कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठी नवीन स्रोत (Finding of new source of raw materials)
v. अयोग्य संस्थेचे पुनर्गठन (The organization of Industry)

नवप्रवर्तक किंवा उद्योजक किंवा संयोजकास अशा नवीन कल्पना तंत्रज्ञानाची माहिती असायला हवी त्याद्वारे तो नवीन वस्तूंचे उत्पादन करणे किंवा उत्पादनाच्या नवीन तंत्राचा वापर करु शकेल. संयोजकास दूसरी आवश्यक बाब म्हणजे भांडवल हवे असते. बँकाकडून मोठ्या प्रमाणात पत उपलब्ध होणे आवश्यक असते. यामुळे उत्पादन प्रक्रियेस वेग प्राप्त होतो. अर्थव्यवस्थेमध्ये आशावादी वातावरणाची निर्मिती होते.

शुंपीटरच्या सिद्धांतातील दोन धोरणात्मक घटक :

i. नाविण्यता (नवप्रवर्तन) Innovations

ii. संयोजक (नवप्रवर्तक) Entrepreneurs

स्थिर संतुलनाच्या वर्तुळाकार अर्थव्यवस्थेला तडा देण्याचे काम हे नाविण्यतेमुळे होत असते. विकास ही प्रक्रिया गतिशील (बदलती) असते. आर्थिक विकासाच्या वर्तुळाकार प्रक्रियेमध्ये संयोजकाचे कार्य थव्याप्रमाणे असते. ज्यावेळेस तो नाविण्यतेमध्ये गुंतवणूक करतो तेव्हा विकास वरच्या बिंदूस (दिशेस) जातो.

(Schumpeter attributes the swarm - like appearance of entrepreneurs to the cyclical nature of economic progress. The cyclical upswing starts when entrepreneurs start investing in the commercial applications of their innovative ideas.)

- काही ठराविक संयोजक ह्या नाविण्यपूर्ण उपक्रमांवर क्रियाशील राहतात. त्यांना यामध्ये यश येऊन लाभ झाल्यास, इतर अनेक उद्योजक त्यांचे अनुकरण करतात. अशावेळी बँकांकडून, अधिक पत (Credit) प्राप्त होऊन उत्पादन, रोजगार, उत्पन्न इ. आर्थिक प्रक्रिया वरच्या बिंदूवर पोहचतात. याच स्थितीस तेजीची अवस्था (Prosperity Stage) असे म्हणतात.

- काही कालावधीनंतर जास्तीत जास्त गुंतवणूक केलेल्या उद्योगसंस्था उच्च उत्पादन पातळीवर पोहचतात आणि बाजारामध्ये त्या वस्तूंच्या किंमती ढासळतात, बँकाकडून पत देणे थांबते आणि उत्पादन साधनांच्या किंमती वाढतात, यामुळे उत्पादनाचा खर्चही वाढतो. या स्थितीत नवप्रवर्तन थांबते किंवा खुंटते. इथेच तेजी संपून घसरण चालू होते. बँकांकडून घेतलेली कर्जे परत करण्याची वेळ सुरु होते. यांत जुन्या उद्योगसंस्थांना सुरुवातीच्या बिंदूस प्राप्त करणे अवघड जाते. सुरुवातीची प्राप्ती ही मिळत नाही. ही अवस्था मंदीकडे वाटचाल करु लागते. यास शुंपीटर 'स्वयं चलन संकोच' (Auto Deflation) असे म्हणतो.

- अर्थव्यवस्थेमध्ये मंदीची स्थिती ही नवप्रवर्तने / नवप्रकल्प बंद केल्यामुळे येते. अर्थव्यवस्थेमध्ये संयोजकाची कार्ये थांबल्याने, कार्यकुशलता न दाखवल्यामुळे मंदी येऊ लागते. शुंपीटर हे स्पष्टपणे मांडतो की, नवप्रवर्तने थांबल्यामुळे मंदी येत नाही, परंतु नवप्रवर्तनासाठीचे आर्थिक वातावरण नकारात्मक किंवा प्रतिकूल झाल्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये मंदीची स्थिती उद्भवते.




**आकृती क्र. ४.१**

आकृती ४.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, चक्रीय प्रवाहाचा कल प्रस्तुत केला आहे. त्यामध्ये प्रत्येक चक्रास चार टप्पे आहेत. कालावधी व धन-ऋण प्रवाहातील वृद्धी ही समान व स्थिर दाखवली आहे. अशा पद्धतीने दीर्घकालीन चक्रीय चढ-उतार (व्यापारी चक्रे) शुंपीटरने आपल्या Business Cycles पुस्तकात रेखाटले आहेत.




**आकृती क्र. ४.२**

अशाप्रकारे शुंपीटरने आर्थिक विकासासाठी नवप्रवर्तन व संयोजक यांच्या भूमिकेची चर्चा केली आहे. आर्थिक बदलाचे महत्त्वपूर्ण परिमाण म्हणून नवप्रवर्तनास शुंपीटरने महत्त्व दिले आहे. त्याने नवप्रर्तनास बाजार शक्ती, अदृश्य हात आणि किंमत स्पर्धेपेक्षा चांगला परिणाम देऊ शकते, असा युक्तीवादही केला आहे.

## ४.३ पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्र

### जीवन परिचय : पिगू, आर्थर सेसील

प्रख्यात ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ व कल्याणकारी अर्थशास्त्राचा प्रवर्तक आइल ऑफ वाइटमधील बीचलँडस् येथे जन्म. त्यांचे वडील सेनाधिकारी होते. हॅरो या प्रसिद्ध विद्यानिकेतन आणि किंग्ज महाविद्यालयामधून विशेष नैपुण्यासह अनेक पारितोषिके मिळवून शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण. १९०२ मध्ये याच महाविद्यालयात

अधिछात्र म्हणून नियुक्ती, १९०८ मध्ये अल्फ्रेड मार्शल या सुविख्यात अर्थशास्त्राच्या निवृत्तीनंतर पिगुला वयाच्या ३१ व्या वर्षी अर्थशास्त्राचे अध्यापन मिळाले, ते त्यांनी ३५ वर्षे उत्कृष्ट रितीने सांभाळले (१९०८-४३). 'कनालिफ चलन समिती' (१९१८), शाही प्राप्तिकर आयोग (१९१९), चेंबरलेन चलन समिती (१९२४) यांचा पिगु सदस्य होता. चेंबरलेन समितीच्या अहवालान्वये सुवर्णपरिमाणाचे पुनरुज्जीवन करण्यात आले होते.

मानवसमान सुधारण्याचे तळ साधन म्हणूनच अर्थशास्त्राकडे पाहिले पहिले मार्शलप्रमाणे पिगूचे मत होते. पिगूच्याच प्रयत्नांमुळे मार्शलचे आर्थिक सिद्धांत प्रसार पावू शकले आणि पुढे विख्यात झालेल्या केंब्रिज अर्थशास्त्र संप्रदाय वैचारिक अधिष्ठान बनले. पिगूचा पहिला वैचारिक ग्रंथ प्रिसिंपल्स अँड मेथड्स ऑफ इंडस्ट्रियल पीस - ॲडम स्मिथ पारितोषिकला पात्र, निबंधाचा विस्तार - १९०५ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यामध्ये गणितीय व सांख्यिकीय पद्धतींचा थोडा वावर असून अर्थशास्त्रीय विवेचनाला तात्विक प्रतिपादनाची झालर लावण्यात आली आहे. १९१२ मध्ये वेल्थ अँड वेल्फेअर हा पिगूचा सर्वात महत्त्वाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. पुढील तीस वर्षाच्या काळात त्याचा विस्तार द इकॉनॉमिक्स ऑफ वेल्फेअर असा करण्यात आला.

राष्ट्रीय उत्पन्नाची चलनशीलता, त्याची वितरण पद्धती व त्याचे पद्धती व प्रमाण या सर्वांवर आर्थिक कल्याण अवलंबून असते. या विधानाने समाधानाच्या अवस्था विषद केल्या आहेत. मध्यवर्ती संकल्पना म्हणजे खाजगी निव्वळ उत्पाद व सामाजिक निव्वळ उत्पाद यामधील फरक स्पष्ट करणे ही होय. कल्याणकारी अर्थशास्त्राच्या फल सिद्धांतावर अधिक भर दिलेला आढळतो.

पिगूने मोठी ग्रंथसंपदा निर्माण केली. त्याच्या नावावर ३० ग्रंथ आणि प्रसिद्ध लेख पण लोकप्रिय आहेत. १९२०-२१ मध्ये युद्धकालीन अर्थकारणाचे विवेचन करणारी दोन पुस्तके प्रसिद्ध झाली. १९२७ मध्ये इंडस्ट्रियल फलक्चुएशन, १९२८ मध्ये ए स्टडी इन पब्लिक फायनान्स, १९३३ मध्ये द थिअरी ऑफ अनएम्लॉयमेंट, १९३५ मध्ये द इकॉनॉमिक्स ऑफ स्टेशनरी स्टेटस, १९४९ मध्ये द व्हेल ऑफ मनी असे ग्रंथ प्रसिद्ध होत होते. वास्तव-शेष परिणाम मांडला : वाढणाऱ्या किंमतीची जादा मागणीचे प्रमाण कमी करण्याकडे प्रवृत्ती असते. त्याजोगे समतोल निर्माण होऊ शकतो. हा पिगु परिणाम म्हणून प्रसिद्ध आहे. विश्लेषण व रचनात्मक सामर्थ्य यांचा प्रभावी वापर करुन जकात धोरण, औद्योगिक आंदोलने, बेकारी, सरकारी अर्थशास्त्रातील समस्या कुशलतेने सोडविण्याचा प्रयत्न केला.

**पार्श्वभूमी :**

कल्याणकारी अर्थशास्त्र मुख्यत: आर्थिक धोरणांच्या तत्वाशी संबंधित असलेली अर्थशास्त्राची शाखा आहे. आर्थिक घटना व शासकीय धोरणे यांचा समाजाच्या कल्याणावर काय परिणाम होतो, याचा अभ्यास ही शाखा करते. म्हणून यास आर्थिक धोरणाची तत्वप्रणाली असे म्हणतात. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी असे गृहीत धरले होते की, अर्थशास्त्र हे धोरणविषयक मार्गदर्शन करते. अर्थशास्त्र ही राज्यव्यवहाराचीच शाखा आहे असे ते मानत. मिलप्रभूती उपयुक्तवादी विचारवंत असे मानीत की, सुख अथवा दु:ख यांचे मापन करता येणे शक्य आहे. मानवाच्या सुखात वाढ करणारे अथवा दु:ख कमी करणारे

धोरण, मग ते प्रंसगी हस्तक्षेपाचे असले तरी चालेल, असे प्रतिपादन ते करीत. मार्शल सारख्यांनी या विचारास फारसे महत्त्व दिले नाही. उलट, मार्शल स्पष्टपणे सांगतो की, एका शिलींगापासून एका इंग्रजास जेवढे समाधान प्राप्त होते तेवढेच दुसऱ्या कोणत्याही इंग्रजास प्राप्त होते, असे गृहीत धरण्यास काही हरकत नाही. ह्याच विचारसरणीस पिगूने पुढे १९२० मधील द इकॉनॉमिक्स ऑफ वेल्फेअर (कल्याणाचे अर्थशास्त्र) ग्रंथामध्ये स्थान दिल्याचे आढळून येते. यामध्ये त्यांनी पैसा हे मोजमापाचे साधन मानले. कल्याणाच्या अर्थशास्त्रात दोन कसोट्या मानल्या. एक अर्थव्यवस्था कार्यक्षम बनवणे आणि अर्थव्यवस्थेतील विषमता कमी करणे. रॉबीन्स या संकल्पनेस अशास्त्रीय समजतो. रॉबीन्सने १९३२ साली प्रकाशित 'ॲन एसे ऑन द नेचर अँन्ड सिग्नीफिकन्स ऑफ इकोनॉमिक सायन्स' (An Essay on the nature and significance of Economic Science) झालेल्या ग्रंथात, निरनिराळ्या व्यक्तींना उपभोगापासून प्राप्त होणाऱ्या समाधानाची तूलना करणे अयोग्य व अशास्त्रीय आहे असे सांगितले. याचा परिणाम असा झाला की, बऱ्याच अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक धोरणाविषयी मार्गदर्शन करणे टाळले व आर्थिक घटनांचे केवळ परीक्षण, वर्णन, वर्गीकरण व संकलन एवढीच जबाबदारी आहे, असे ते मानू लागले. काही कालावधीनंतर केन्स याच्या द जनरल 'थेअरी ऑफ एम्प्लॉएमेंट, इंटरेस्ट ॲन्ड मनी' (The General Theory of Employment, Interest and Money) ग्रंथात मंदीमुळे उत्पन्न समस्यांवर उपाय सुचविण्यासाठी मार्गदर्शनाने नवीन विचारसरणी प्रस्तूत केली. पुन्हा आर्थिक धोरणाविषयी मार्गदर्शक सूचना देण्यासाठी अर्थशास्त्रात धजू लागले. निरनिराळ्या व्यक्तींच्या समाधानांची तुलना करता येणे अशक्य आहे, असे काटेकोरपणे पाळल्यास अर्थशास्त्रात कुचकामी व समाजाच्या दृष्टीने निरुपयोगी ठरतील, असे मत १९३८ मध्ये हेरॉड या अर्थशास्त्रज्ञाने मांडले.

नवे कल्याणकारी अर्थशास्त्र, शास्त्रीय आधाराच्या पुनर्विचारातून उदयास आले. कोणत्याही आर्थिक धोरणांचे दोन परिणाम होतात. एक अर्थव्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर आणि दूसरा त्यामुळे होणाऱ्या कल्याणाच्या विभाजनावर. याचाच आधार घेऊन कॅल्डॉरने, कार्यक्षमतेवरील परिणाम हीच कल्याणाची कसोटी मानावी असे मत व्यक्त केले. कॅल्डॉरच्या या भूमिकेस लिटल याचा विरोध होता. अर्थशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्रात जीवनमूल्यांचा विचार टाळता येत नाही म्हणून कोणत्याही अर्थशास्त्रज्ञाने आर्थिक धोरणांचे विवेचन करताना आपण कोणती जीवनमूल्ये मानतो हे स्पष्ट करणे, असे प्रतिपादन लिटलने केले. यापुढे जाऊन बर्गसन यांनी सामाजिक कल्याण ही कल्पना आणली. सामाजिक प्राधान्यश्रेणी गृहीत धरुन जास्तीत जास्त सामाजिक कल्याणाची जबाबदारी कोणत्या मार्गाने पूर्ण करता येईल, याविषयी अर्थशास्त्रज्ञांनी मार्गदर्शन करावे, असे यामध्ये मत होते. कल्याणकारी अर्थशास्त्रातील सिद्धांत मांडताना वास्तविक अर्थशास्त्रातील प्रतिपादन पद्धतीचाच वापर झालेला दिसून येतो. परंतु यात काही दोष आढळून येऊ शकतात म्हणूनच कल्याणकारी अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेतील अन्यायांवर प्रकाश टाकू शकते. यामुळेच अर्थशास्त्राची ही शाखा धोरणविषयक मार्गदर्शन करण्यास उपयुक्त आहे.

**पिगूचे कल्याणकारी अर्थशास्त्र :**

पिगूने कल्याण संज्ञेचे स्पष्टपणे विस्तृत विवेचन केले आहे. त्याच्या मते, व्यक्तिगत कल्याण हे एखाद्या व्यक्तीने एकूण वस्तू व सेवांच्या उपभोगातून प्राप्त केलेले समाधान होय.

सामाजिक कल्याण म्हणजे सर्व व्यक्तींच्या समाधानांची एकूण गणना होय. सामान्य कल्याण स्पष्ट करणे खूप क्लिष्ट आहे म्हणून पिगूने आर्थिक कल्याण अभ्यासला आहे. त्यांनी आर्थिक कल्याणाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

आर्थिक कल्याण हे समाज कल्याणाचा भाग आहे 'जे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पैशाच्या मापनाशी निगडीत आहे."

(Economic Welfare is that part of social welfare "that can be brought directly or indirectly into relation with the measuring rod of money.)

**कल्याण महत्तमीकरणाच्या दोन अटी :**

१) चव आणि उत्पन्नाचे वितरण पाहता, राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही कल्याणातील वाढ दर्शविते.

२) कल्याण वाढ होण्यासाठी, राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण महत्त्वाचे आहे.

जर राष्ट्रीय उत्पन्न समान असेल तर उत्पन्नाचे वितरण (श्रीमंताकडून गरीबांकडे) कल्याण वाढ घडवून आणेल. उत्पन्नाच्या अनुषंगाने, घटत्या सीमांत उपयोगिता नियमानुसार, श्रीमंतांकडून गरीबांकडे हस्तांतरीत होणारे उत्पन्न, गरीबांच्या अनेक गरजा भागविण्यासाठी सक्षम असतात. यामुळे सामाजिक कल्याणामध्ये वाढ होते. हीच आर्थिक समता कल्याण वाढीची महत्त्वाची बाब आहे.

सामाजिक कल्याणातील वाढ शोधण्यासाठी प्रा. पिगू यांचा दुहेरी निकष आहे.

१) समाजाचे आर्थिक कल्याण पैशात मोजले व संसाधनाचा पुरवठा लक्षात घेता, राष्ट्रीय लाभांशात वाढ होणे म्हणजेच सामाजिक कल्याणात वाढ.

२) पिगूने उत्पन्नाच्या समानीकरणाला अनुकूलता दर्शविली आणि म्हणूनच, अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करणे ज्यान्वये गरीबांचा वाटा प्रतिकूलपणे न वाढवता 'उत्पादक उद्योग आणि भांडवली उपकरणांचा विकास हे सामाजिक कल्याण म्हणून घेणे होय."

पिगूने खाजगी व सार्वजनिक खर्चामध्ये फरक केला आहे. एखाद्या वस्तूची खाजगी किंमत (सीमांत) ही अतिरिक्त घटकाच्या उत्पादनाची किंमत असते. सार्वजनिक सीमांत खर्च हा त्या वस्तूच्या उत्पादनाच्या परिणामी समाजाला होणारा खर्च किंवा नुकसान होय. खाजगी किरकोळ लाभ, वस्तूच्या विक्री किंमतीद्वारे मोजला जाऊ शकतो. सार्वजनिक सीमांत लाभ म्हणजे अतिरिक्त घटकाच्या उत्पादनातून समाजाला मिळणारा एकूण लाभ होय.

प्रा. पिगूने सामाजिक इष्टतम स्थिती मांडण्याचा प्रयत्न सर्वप्रथम केला. त्यांनी संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी 'आदर्श उत्पादन' (Ideal Output) संज्ञा वापरली. त्यांच्या मते, जेव्हा सर्व उद्योगांमध्ये किरकोळ सामाजिक उत्पादने समान असतात आणि अशाप्रकारे वास्तविक संपत्तीचे उत्पादन जास्तीत जास्त होते, तेव्हा सामाजिक इष्टतम उच्च होत असे. सर्व उत्पादक संसाधने कार्यरत आहेत असे गृहीत धरुन व विविध व्यवसाय आणि स्थानांमध्ये बदली खर्च नसतो. अशावेळी असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की, सर्व

उद्योगात सीमांत सामाजिक निव्वळ उत्पादनांची मूल्ये समान असल्यास राष्ट्रीय लाभांश अधिक असतो. हीच व्यवस्था कायम राहिल्यास 'आदर्श उत्पादन' प्राप्त होते.

## ४.४ सारांश

स्थिर संतुलन अवस्थेत विकासासाठी परिवर्तनाची आवश्यकता असते. यामुळे नवप्रवर्तनास महत्त्व असते. विकास प्रक्रियेमध्ये संयोजक आणि त्यास नवप्रवर्तनाची मिळालेली प्रेरणाच खऱ्या अर्थाने चालक असते. अशावेळी चक्रीय वेग प्राप्त होऊन बाजारात लाभ, उत्पादन, मागणी-पुरवठा रचना यांत परिवर्तन होत असते. अशा अनेक चलांचा वापर करुन राष्ट्रात भांडवलशाहीच्या सहाय्याने समृद्ध किंवा विकसित करता येऊ शकते, असे प्रतिपादन शुंपीटरने आपल्या विचारातून केले आहे.

पिगूचे सामाजिक कल्याण हे पैशाच्या मापनाशी निगडीत आहे. कल्याण वाढ होण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ व राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वितरण होणे, या अटींचा उल्लेख केला आहे. सामाजिक इष्टतम स्थिती स्पष्ट करण्यासाठी आदर्श उत्पादनांची संज्ञा महत्त्वाची ठरते. संपूर्ण संसाधने जेव्हा उत्पादनासाठी वापरात असतात, तेव्हा खर्च कमी येऊन, राष्ट्रीय लाभांश वाढ होऊन कल्याणाचे महत्तमीकरण होते. अशाप्रकारे सामाजिक कल्याण वाढीसाठी पिगूच्या निकषांची व अटींची उपयोगिता योग्य ठरते.

## ४.५ प्रश्नाभ्यास

१) शूंपीटरच्या आर्थिक विकासासंदर्भातील विचारांचे विश्लेषण करा.

२) शूंपीटरचा नवप्रवर्तनाचा सिद्धांत स्पष्ट करा.

३) कल्याणकारी अर्थशास्त्राची पार्श्वभूमी विस्तृतपणे लिहा.

४) पिगूच्या कल्याणासंदर्भातील संकल्पना सविस्तर मांडा.

❖❖❖❖

munotes.in

५

# केन्सची कल्पना - १

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ रोजगाराचा केन्सचा सिद्धांत

५.३ पैसे-वेतन परिदृढता प्रारूप

५.४ गुणक आणि प्रवेग क्रिया परस्पर संबंध

५.५ प्रश्न

## ५.० उद्दिष्टे

- रोजगाराच्या केन्सच्या सिद्धांताचा अभ्यास करणे.
- पैसे-वेतन परिदृढता प्रारूपाचे विश्लेषण करणे.
- गुणक आणि प्रवेगक आणि त्यांच्या परस्परसंवादाच्या संकल्पना समजून घेणे.

## ५.१ प्रस्तावना

केन्स हे कदाचित विसाव्या शतकातील सर्वात महान अर्थतज्ञ आहेत आणि अर्थशास्त्राच्या इतिहासात ते सर्वोत्कृष्ट राहतील. केन्सने अर्थशास्त्राच्या विश्लेषणात एक नवीन नमुना मांडला. केन्स हे मुळात सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ होते. सनातनवादी परंपरेत केन्सचे योगदान हा त्याचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. केन्स हे प्रामुख्याने सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी आर्थिक समस्यांचे समग्र दृष्टिकोनातून विश्लेषण केले. केन्सला असे आढळून आले की चलनविषयक धोरणाची सनातनवादी उपाययोजना ही बेरोजगारी आणि तीसच्या दशकातील प्रचंड मंदी दूर करु शकत नाही. मग त्यांनी बेरोजगारी आणि मंदीशी निगडीत समस्यांचा बारकाईने अभ्यास केला. १९३६ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या, रोजगार, व्याज आणि पैशाच्या सामान्य सिद्धांत या ग्रंथामध्ये याचा विचार केला. म्हणून केन्सच्या अर्थशास्त्राला कधीकधी मंदीचे अर्थशास्त्र म्हटले जाते. असो, केन्सने आर्थिक धोरणाच्या अकार्यक्षमतेकडे लक्ष वेधले आणि बेरोजगारी आणि मंदी दूर करण्यासाठी राजकोषीय धोरणाचा वापर निर्धारित केला. केन्स यांनी भारतीय चलन आणि वित्त (१९१३), चलन सुधारणा (१९२३) आणि युद्धासाठी पैसे कसे द्यावे? (१९४०) यासह अनेक पुस्तके लिहिली आहेत. तथापि, 'जनरल थिअरी' ही त्यांची महान रचना आहे.

## ५.२ केन्स यांचा रोजगार सिद्धांत

केन्स यांच्या सामान्य सिद्धांतामध्ये, केन्सने रोजगाराच्या शास्त्रीय सिद्धांतावर हल्ला केला आणि रोजगार, उत्पादन आणि उत्पन्नाचा स्वत:चा सिद्धांत पद्धतशीरपणे विकसित केला. केन्सच्या मते, अर्थव्यवस्थेचे एकूण उत्पन्न हे एकूण रोजगाराचे कार्य आहे. रोजगाराचे प्रमाण प्रभावी मागणीवर अवलंबून असते. प्रभावी मागणी एकूण मागणी किंमत आणि एकूण पुरवठा किंमतीवर अवलंबून असते. एकूण मागणी (AD) कार्य आणि एकूण पुरवठा (AS) कार्य यांच्यातील समतोल बिंदू प्रभावी मागणी निर्धारित करतो. केन्सच्या प्रारूपात, एकूण पुरवठ्याचे कार्य दिले आहे असे गृहीत धरले जाते आणि संपूर्ण विश्लेषण केंद्र एकूण मागणीचे कार्य निर्धारित आणि प्रभावित करणार्या घटकांभोवती अवलंबून असतात. प्रभावी मागणी ही उपभोग मागणी आणि गुंतवणूकीच्या मागणीवर अवलंबून असते. उपभोग हा उत्पन्नाची पातळी आणि उपभोग करण्याच्या प्रवृत्तीवर अवलंबून असते. उपभोग घेण्याची प्रवृत्ती उत्पन्नाच्या वाढीच्या प्रमाणात वाढत नाही. केन्सचे निरीक्षण केले आहे की अल्प कालावधीत, उपभोग कार्य कमी-अधिक प्रमाणात स्थिर असते. त्यामुळे अल्प कालावधीत रोजगार वाढवण्यासाठी गुंतवणूकीवर मुख्य भर दिला जातो. गुंतवणूक उत्पन्न आणि उपभोग यातील अंतर कमी करते. गुंतवणूकीचे प्रमाण अपुरे असल्यास, एकूण मागणी किंमत एकूण पुरवठा किंमतीपेक्षा कमी होईल आणि रोजगार आणि उत्पन्न कमी होईल. अशाप्रकारे, रोजगार आणि उत्पन्नातील फरक प्रामुख्याने गुंतवणूकीतील फरकावर अवलंबून असतो.

**गुंतवणूक दोन घटकांवर अवलंबून असते :**

अ) भांडवलाची सीमांत कार्यक्षमता

ब) व्याज दर

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता भांडवलाची पुरवठा किंमत आणि भांडवलापासून मिळणार्या संभाव्य उत्पन्नावर अवलंबून असते. भांडवलाची पुरवठा किंमत उत्पादनाच्या भौतिक आणि तांत्रिक परिस्थितीवर अवलंबून असते. ज्यामध्ये अल्पावधीत लक्षणीय बदल करता येत नाहीत. त्यामुळे, अल्पावधीत, गुंतवणूकीच्या निर्णयामध्ये संभाव्य उत्पन्न हा अधिक प्रबळ घटक बनतो. जेव्हा नफ्याच्या अपेक्षा जास्त असतात आणि उद्योजकांना चांगल्या हेतूने मार्गदर्शन केले जाते तेव्हा गुंतवणुकीचा दर सामान्यत: जास्त होतो. दुसरीकडे, जेव्हा नफ्याची अपेक्षा कमी असते तेव्हा गुंतवणूक कमी होते.

व्याजार दर (गुंतवणूकीचा दुसरा निर्धारक) पैशाचे प्रमाण आणि रोखता प्राधान्य यावर अवलंबून असतो. जर पैशाचा पुरवठा केला गेला तर व्याजाचा दर रोखता प्राधान्याने ठरवला जाईल, रोखता प्राधान्य तीन मानवी हेतूंवर अवलंबून असते.

१) व्यवहाराचा हेतू,

२) सावधगिरीचा हेतू

३) सट्टा हेतू

पैसे ठेवण्याचे पहिले दोन हेतू सामान्यत: व्याज-अलवचिक असतात, तर तिसरा हेतू व्याज-लवचिक असतो असे म्हटले जाऊ शकते. तथापि, रोखतेला प्राधान्य दिल्यास, व्याजाचा दर बँकिंग प्रणालीच्या आर्थिक धोरणाद्वारे निर्धारित केला जातो. भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढवून किंवा व्याजदर कमी करुन किंवा दोन्हीद्वारे गुंतवणूक वाढवली जाऊ शकते.

साधारणपणे, गुंतवणूकीत वाढ झाल्याचे उत्पन्न आणि रोजगारात वाढ होते. पण त्याच वेळी लोकांचा उपभोग घेण्याची प्रवृत्ती कमी झाली तर रोजगार वाढणार नाही. खरं तर, उपभोग कार्य हे रोजगार आणि उत्पन्नाचे, 'केन्सच्या विश्लेषणाचे हृदय" आहे. गुंतवणूकीत तत्सम वाढ न करता उत्पन्न आणि रोजगारातील वाढ, कमीतकमी एका बिंदूपर्यंत वाढलेल्या वापरामुळे टिकून राहते. गुंतवणूकीचे आणि उपभोगाचे महत्त्व, रोजगार, उत्पन्न आणि उत्पादनासाठी, केन्सच्या सिद्धांतामध्ये, गुणक प्रभावाच्या कार्यप्रणालीच्या संदर्भात उत्तम प्रकारे समजले जाऊ शकते. गुंतवणूकीत दिलेल्या वाढीमुळे उत्पन्नात होणारी वाढ दर्शविणारा संख्यात्मक गुणांक संदर्भित करतो. गुण एकूण रोजगार आणि उत्पन्न आणि गुंतवणुकीचा दर यांच्यात उपभोग घेण्याची प्रवृत्ती लक्षात घेऊन, एक अचूक संबंध प्रस्थापित करतो. गुंतवणूकीतील वाढीमुळे उत्पन्नात वाढ होते, ज्यातून उपभोगाच्या वस्तूंची मागणी वाढते ज्यामुळे उत्पन्न आणि रोजगारामधये पुन्हा वाढ होते.

जेव्हा प्रक्रिया संचयी होते, तेव्हा गुंतवणूकीत दिलेल्या वाढीमुळे उपभोग घेण्याच्या प्रवृत्तीद्वारे उत्पन्नात अनेक पटीने वाढ होते. गुणकांचा आकार उपभोगाच्या सीमांत प्रवृत्तीवर अवलंबून असतो. जर उपभोगाची सीमांत प्रवृत्ती जास्त असेल, तर गुणक मोठा असेल आणि या उलट उपभोगाची सीमांत प्रवृत्ती कमी असेल, तर गुणक कमी असेल त्यामुळे उत्पन्न आणि रोजगार वाढवण्यासाठी, उपभोग घेण्याची तसेच गुंतवणूक करण्याची सीमांत प्रवृत्ती वाढवावी लागेल. परंतु उपभोगाची सीमांत प्रवृत्ती उत्पन्न वाढीसह कमी होण्याची शक्यता असल्याने, अर्थव्यवस्थेतील गुंतवणूकीचा दर वाढवणे आवश्यक आहे. उपभोगाच्या मागणीसह गुंतवणूकीची मागणी प्रभावी मागणी निश्चित करेल जी अर्थव्यवस्थेचे उत्पन्न आणि रोजगाराची पातळी निश्चित करेल. हा एका अर्थाने रोजगार, उत्पन्न आणि उत्पादनाचा केन्स यांचा सिद्धांत आहे. रोजगाराचा केन्सचा सिद्धांत खालील आकृतीमध्ये सारांशित केला आहे.




**आकृती क्र. ५.१**

## ५.३ पैसे-वेतन परिदृढता प्रारूप

जे.एम. केन्सच्या मते पैशातील -वेतन परिदृढता म्हणजे पैशाच्या मजुरीची खाली जाणारी लवचिकता ज्यामुळे दिलेल्या वेतनाच्या दराने कामगारांची अनैच्छिक बेरोजगारी मजुरांच्या मागणीपेक्षा जास्त असते ज्यामुळे बेरोजगारी निर्माण होते त्यांच्या मते पैशातील-मजुरीमध्ये पुरेसा बदल होणार नाही आणि अल्पावधीतच पूर्ण रोजगारावर अर्थव्यवस्था बेरोजगारीला कारणीभूत असलेल्या पैशातील मजुरीची परिदृढता समजून घेण्यासाठी मजुरी दर कमी करुन श्रमिक बाजार का स्पष्ट होत नाही हे आपण तपासले पाहिजे.

### ५.३.१ पैशातील - वेतन परिदृढता प्रारूपाची कारणे :

**१) पैशाचा भ्रम :**

मजुरांचा जास्त पुरवठा असूनही उद्योग संस्था मजुरी कमी करणार नाही कारण कामगार मजुरी कमी करण्याच्या कोणत्याही हालचालीचा प्रतिकार करतील जे ते किंमती वाढल्यामुळे वास्तविक वेतनात घट स्वीकारतील. कामगारांना पैशाची किंमत किंवा पैशाची क्रयशक्ती कळत नाही. त्यांना असे वाटते की पैशाचे मूल्य स्थिर आहे म्हणून ते पगार कमी करण्यास कडाडून विरोध करतात परंतु किंमती वाढल्याने खरे वेतन कमी झाल्यास ते विरोध करत नाहीत.

**पैशाच्या मोहाची दोन कारणे आहेत :**

प्रथमत: एखाद्या उत्पादन संस्थेच्या कामगारांना असे वाटते की, किमंती वाढल्यामुळे त्यांचे वास्तविक वेतन कमी होते याचा इतर उद्योगांमधील कामगारांवर तितकाच परिणाम होतो म्हणून त्यांचे सापेक्ष वेतन इतरांमध्ये काम केलेल्यांच्या तुलनेत समान राहते.

दुसरे म्हणजे, कामगार त्यांच्या कर्मचार्यांना वास्तविक वेतनात कपात करण्यासाठी पैशाच्या वेतनात कपात केल्याबद्दल दोषी ठरवतात ज्यांना वाटते की या प्रकरणात सामान्य आर्थिक शक्तींच्या कामाचा थेट परिणाम झाला नाही कारण कामगार संघटना मूक प्रेक्षक आहेत.

**२) कराराद्वारे वेतन निश्चिती :**

अमेरिका आणि इंग्लंडमध्ये मजुरीचे वेतन हे कराराद्वारे निश्चित केली जाते आणि कामगारांच्या अतिरिक्त किंवा तुटीच्या स्थितीत दिलेल्या कालावधीसाठी मजुरीचे वेतन समान राहते.

कामगार संघटनांच्या अंतर्गत द्वि-सामूहिक सौदेबाजी पैशातील मजुरी दर जास्त असतो आणि तो ३-४-५ वर्षासाठी निश्चित केला जातो.

काही कामगार संघटना कामगार बेकार राहिले तरीही कधीही वेतन कपात स्विकारत नाहीत त्यामुळे कामगार बाजार अल्पावधीत स्पष्ट होत नाही आणि पैशातील वेतनाच्या परिदृढतेमुळे अनैच्छिक बेरोजगारी निर्माण होते.

**३) किमान वेतन कायदे :**

निश्चित किमान वेतनावरील सरकारी कायद्यामुळे नियोक्त्यांना किमान वेतनापेक्षा कमी वेतन देण्याची परवानगी नाही.

**४) कार्यक्षमतेचे वेतन :**

नियोक्त्यांनाही वेतन कमी करण्यास स्वारस्य नाही कारण जास्त वेतन कामगारांना अधिक कार्यक्षम आणि उत्पादक बनवते.

**केन्स पैशातील - वेतन परिदृढता आणि लवचिक किंमत प्रारूप :**

अनैच्छिक बेरोजगारीचा उदय.

munotes.in




***Fig. Kens Rigid Wage and Flexiable Price Model. The Emergence of Involuntary Unemployment***

**आकृती क्र. ५.२**

आकृतीच्या पॅनेल B मध्ये अल्पकालीन एकूण पुरवठा वक्र AS आणि एकूण मागणी वक्र $AD_0$ काढले गेले आहेत आणि त्यांच्या परस्पर संवादाद्वारे किंमत पातळी $P_0$ आणि वास्तविक सकल राष्ट्रीय उत्पादनाची पातळी $Y_0$च्या बेरोजगारीची आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की अल्पकालीन एकूण पुरवठा AS वक्र हा $W_0$ इतक्या पैशातील निश्चित वेतन दरासह काढला आहे.

आकृतीच्या पॅनेल A मध्ये कामगार रोजगारांची पातळी $N_0$ नोकर्यांची संख्या दर्शविते. जेव्हा अर्थव्यवस्था पॅनेल B मध्ये राष्ट्रीय उत्पादनाच्या $Y_0$ इतक्या पातळीचे उत्पादन करत असते. तेव्हा एकूण पुरवठा AS आणि एकूण मागणि $AD_0$ मधील समतोल किंमत $P_0$ वर निश्चित पैशातील वेतनासह एकूण राष्ट्रीय उत्पादनाची पातळी $Y_0$ इतकी आहे.

श्रम बाजार समतोल बिंदू हा $E_0$ बिंदूवर समतोलात आहे जेथे वास्तव वेतन दर $W_0 / P_0$ इतका असणे आवश्यक आहे आणि या वेतन दराला $N_0$ इतक्या कामगारांची मागणी केली जाते व त्यांना कामावर ठेवले जाते. वास्तविक वेतन दर हा $W_0 / P_0$ वर नोकर्या मिळविण्यास इच्छुक असलेल्या सर्वांची मागणी आणि रोजगार इतका आहे. अशाप्रकारे $E_0$ किंवा रोजगार पातळी $N_0$ स्तरावरील समतोल पूर्ण रोजगार समतोल दर्शवतो.

आता आकृतीच्या पॅनेल B चा पुन्हा विचार करा. समजा भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेत घट झाल्यामुळे गुंतवणुकीच्या मागणीत घट झाली आहे. जी त्याच्या गुणक परिणामासह एकूण मागणी वक्र AD मध्ये डावीकडे बदल घडवून आणते. केन्सचा असा विश्वास होता की एका निश्चित पैशातील मजुरी दराने एकूण पुरवठा वक्र AS दिलेला आहे आणि तो अपरिवर्तित राहतो हे आकृतीच्या पॅनेल B वरुन दिसेल की नवीन एकूण मागणी $AD_1$ वक्र आणि निश्चित एकूण पुरवठा वक्र AS बिंदू K वर एकमेकांना छेदतात तेव्हा नवीन समतोल किंमत $P_1$ आणि सकल राष्ट्रीय उत्पादन $Y_1$ हे दोन्हीही कमी आहेत.

केन्सने असे प्रतिपादन केले आहे की, अर्थव्यवस्था $Y_1$ या पूर्ण रोजगार पातळीपेक्षा कमी उत्पादन आणि $P_1$ या कमी किंमत पातळीसह बिंदू K वर अडकून राहिला. आता आकृतीच्या पॅनल A वर नजर टाकल्यास असे दिसून येते की, निश्चित पैशातील वेतन WO आणि कमी किंमत पातळी $P_1$ सह वास्तव वेतन दर WO / $P_1$पर्यंत वाढतो आणि उच्च

वास्तव वेतन दराला $N_1$ इतक्या कमी कामगारांची मागणी होईल आणि उत्पादन संस्था तेवढ्याच कामगारांना कामावर ठेवतील. अशाप्रकारे केन्सने स्पष्ट केले आहे की, WO / $P_1$ या उच्च वेतन दराला RT इतके कामगार बेकार होतील. WO स्तरावर पैशातील वेतनदर स्थिर राहिल्यास आणि किंमतीमध्ये लवचिकता असल्यास एकूण मागणीत घट झाल्यामुळे सतत अनैच्छिक बेरोजगारी निर्माण होते.

**केन्स कंत्राटी कामगार बाजारात असे गृहीत धरतो की :**

१) किंमत बदलण्यासाठी मुक्त / स्वातंत्र्य आहे.

२) पैशातील वेतन निश्चित आहे.

केन्सच्या मते पैशातील वेतनाच्या परिदृढतेचा अर्थ असा नाही की पैशातील वेतन पूर्णपणे स्थिर किंवा चिवट / ताठर आहे. याचा अर्थ असा की, पैशातील मजुरी त्वरित कमी होत नाही आणि पूर्ण रोजगारापर्यंत पोहचण्यासाठी मजुरांची मागणी व पुरवठा त्वरित होत नाही. पूर्ण रोजगार सुनिश्चित करण्यासाठी पैशातील मजुरी कमी झाली आहे. कारण अनैच्छिक बेकारी अस्तित्वात आली आहे. कारण राजांना पैशातील वेतनाचा दर खाली येण्याची चिंता होती.

## ५.४ गुणक आणि प्रवेग: परस्पर क्रिया

स्वायत्त खर्चात सुरुवातीच्या वाढीमुळे उत्पन्नातील एकूण वाढ जाणून घेण्यासाठी गुणक आणि प्रवेग यांचे एकत्रित परिणाम विचारात घ्यावे लागतील. स्वायत्त खर्चातील कोणत्याही वाढीचा परिणाम पहिल्या घटनेत उत्पन्नात समान वाढ घडवून आणतो. ज्यामुळे उपभोग वाढतो ज्यामुळे उत्पन्नात आणखी वाढ होते. हे आधीच नमुद केल्याप्रमाणे, गुणक प्रभाव आहे. ग्राहकोपयोगी वस्तूच्या उद्योगांमध्ये अतिरिक्त क्षमतेच्या अनुपस्थितीत, उपभोगातील वाढ गुंतवणूकीस प्रवृत्त करते आणि उत्पन्नात आणखी वाढ होते. हे जसे आपल्याला माहीत आहे हा प्रवेग प्रभाव आहे. म्हणून स्वायत्त खर्चाच्या वाढीच्या प्रतिसादात उत्पन्नात एकूण वाढ केवळ गुणक आणि प्रवेग यांच्यातील परस्पर क्रियांच्या संदर्भात समजू शकते.

आता आपण उदाहरणाच्या मदतीने गुणक आणि प्रवेग यांच्यातील परस्पर क्रिया स्पष्ट करु इच्छितो, आपण असे गृहीत धरु की उपभोगाची सीमांत प्रवृत्ती ०.५ आहे आणि प्रवेग गुणांक २ आहे. जर, या परिस्थितीत, स्वायत्त गुंतवणूक १०० कोटी रु. ने वाढली. तर पहिल्या गुणांक कालावधीत उत्पन्नातील एकूण वाढ ही रु. २५० कोटी इतकी असेल. गुणक कालावधी १ मध्ये उत्पन्न प्रसाराची प्रक्रिया आकृतीमध्ये स्पष्टपणे दर्शविली आहे.

## आकृती

### गुणक आणि प्रवेगक

**स्वायत्त गुंतवणूकीत १०० कोटी रु. वाढ**




**आकृती १ ब - पहिल्या गुणक कालावधीत उत्पन्नातील वाढ**

**तक्ता क्र. ५.१**

| गुणक कालावधी | स्वायत्त गुंतवणूकीत वाढ | प्रेरित उपभोग (रु. कोटी) | प्रेरित गुंतवणूक (रु. कोटी) | एकूण उत्पन्नात वाढ (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|
| ० | १०० | - | - | १०० |
| १ | १०० | ५० | १०० | २५० |
| २ | १०० | १२५ | १५० | ३७५ |
| ३ | १०० | १८७.५ | १२५ | ४१२.५ |
| ४ | १०० | २०६.५ | ३७.५ | ३४३.७५ |

### उत्पन्नावर गुणक आणि प्रवेग यांचा एकत्रित प्रभाव -

तक्ता ५.१ मध्ये स्वायत्त गुंतवणुकीतील वाढीमुळे उत्पन्नात झालेली वाढ दर्शविली आहे. गुणक कालावधी ० मध्ये, उत्पन्नातील वाढ ही गुंतवणूकीतील सुरुवातीच्या वाढीच्या रक्कमेइतकीच आहे, म्हणजे रु. १०० कोटी, गुणक कालावधी १, उत्पन्नातील ही वाढ उपभोगास प्रेरित करेल, आणि सीमांत उपभोग प्रवृत्ती (MPC) ०.५ असल्याने ग्राहकोपयोगी वस्तूंवरील खर्च रु. ५० कोटींनी वाढेल, ज्याच्या बदल्यात, प्रवेग गुणांक २ च्या आधारावर, १०० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीला प्रेरित करेल.

त्यामुळे गुणक कालावधी १ मध्ये एकूण वाढ २५० कोटी रु. इतकी होईल. गुणक कालावधी २ मध्ये, या वाढीव उत्पन्नाचा अर्धा (किंवा ०.५) ग्राहकोपयोगी वस्तूंवर खर्च केला जाईल आणि अशाप्रकारे प्रेरित उपभोग रु. १२५ कोटी होईल. मागील गुणक कालावधीत ५० कोटी रु. किंमतीच्या ग्राहक वस्तूच्या उत्पादनासाठी अतिरिक्त क्षमता निर्मान करण्यात आली आहे. सध्याच्या कालावधीत म्हणजेच गुणक कालावधी २ मध्ये, कंपन्या ७५ कोटी रु. किंमतीच्या अतिरिक्त ग्राहक वस्तूंच्या उत्पादनासाठी त्यांची क्षमता वाढवू इच्छितात. अशाप्रकारे, गुणक कालावधी २ मध्ये, प्रेरित गुंतवणूक फक्त रु. १५० कोटी (२*f* रु. ७५ कोटी) आणि उत्पन्नात एकूण वाढ ३७५ कोटी रु. इतकी असेल. गुणक कालावधी ३ मध्ये प्रेरित उपभोगाची रक्कम रु. १८७.५ कोटी असेल.

munotes.in

या कालावधीत खप केवळ ६२५ कोटी रु. ने वाढला आहे. या कालावधीत प्रेरित गुंतवणूक रु. १२५ कोटी आणि उत्पन्नातील वाढ ही रु. ४१२.५ कोटी. ही खरेतर सर्वोच्च मर्यादा आहे. स्वायत्त गुंतवणूकीत १०० कोटी रु. च्या वाढीच्या प्रतिसादात ते उत्पन्न पोहोचेल. त्यानंतरचा गुणक कालावधीत उत्पन्नाची पातळी घसरेल. गुणक कालावधी ४ विचारात घ्या, ज्यामध्ये प्रेरित उपभोगाची रक्कम रु. २०६.२५ कोटी आहे. हे गुणक कालावधी ३ मध्ये प्रेरित उपभोगाच्या रकमेपेक्षा फक्त रु. १८.७५ कोटींनी जास्त आहे.

त्यामुळे या कालावधीत प्रेरित गुंतवणूक फक्त रु. ३७.५ कोटी असेल. पूर्वीच्या गुणक कालावधीतील प्रेरित गुंतवणूकीच्या तुलनेत, हे खूपच कमी आहे. प्रेरित गुंतवणूकीतील ही तीव्र घसरण मंदीच्या प्रक्रियेला कारणीभूत ठरते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन जे.आर. हिक्सने त्यांचा व्यापार चक्राचा सिद्धांत मांडला आहे.

**तुमची प्रगती तपासा :**

१) 'जनरल थिअरी ऑफ एम्प्लॉयमेंट, इंटरेस्ट अँड मनी' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत?

२) केनेशियन थेअरी ऑफ एम्प्लॉयमेंट कोणत्या घटकांवर अवलंबून आहे?

३) ——— हा गुंतवणूकीचा निर्धारक घटक आहे.

४) जे.एम. केन्सच्या मते पैसा - वेतनाची परिदृढता म्हणजे पैशाच्या मजरुीची ——– लवचिकता.

५) गुंतवणूकीच्या वाढीसह, भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ———.

६) पैशांच्या मजुरीची परिदृढता ——— बेरोजगारी निर्माण करते.

७) स्वायत्त खर्चात सुरुवातीच्या वाढीमुळे ——- जाणून घेण्यासाठी गुणक आणि प्रवेग यांचे एकत्रित परिणाम.

८) उपभोगण्याची सीमांत प्रवृत्ती (MPC) ०.५ आहे आणि प्रवेग गुणांक ——— आहे.

## ५.५ प्रश्न

१) रोजगाराचा केन्स यांचा सिद्धांत स्पष्ट करा.

२) पैसा - वेतन परिदृढता स्पष्ट करा.

३) अनैच्छिक बेरोजगारीची कारणे काय आहेत?

४) गुणक आणि प्रवेग परस्पर क्रिया स्पष्ट करा.

५) $C = 20 + .75Y$ तेव्हा गुणकाचे मूल्य शोधा.

६) MPS = .२५ असताना उत्पन्न गुणकाचे मूल्य शोधा.

❖❖❖❖

# ६

# केन्सची कल्पना - २

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टे

६.१ व्यापार चक्राचा केन्सचा सिद्धांत

६.२ चलनवाढीचा केन्सचा सिद्धांत

६.३ राजकोषीय धोरणाच्या भूमिकेवर केन्सची कल्पना

६.४ केन्स यांचे अर्थशास्त्र आणि विकसनशील देश

६.५ सारांश

६.६ प्रश्न

६.७ संदर्भ

## ६.० उद्दिष्टे

- व्यापार चक्राच्या केन्स यांच्या सिद्धांताचा अभ्यास करणे.
- चलनवाढीचा केन्स यांचा सिद्धांत समजून घेणे.
- राजकोषीय धोरणाच्या भूमिकेवर केन्सची कल्पना जाणून घेणे.
- केन्सचे अर्थशास्त्र आणि विकसनशील देशांमधील संबंधांचा अभ्यास करणे.

## ६.१ व्यापार चक्राचा केन्स यांचा सिद्धांत

केन्सच्या मते, व्यापार चक्र हे भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील चढ-उतारांमुळे गुंतवणूकीच्या दरातील फरकांमुळे होते. 'भांडवलाची सीमांत कार्यक्षमता' या शब्दाचा अर्थ नवीन गुंतवणूकीतून अपेक्षित नफा असा होतो. उद्योजकीय क्रियाप्रक्रिया नफ्याच्या अपेक्षेवर अवलंबून असतात. त्याच्या चक्र सिद्धांतामध्ये, केन्सने अपेक्षांना प्रमुख भूमिका दिली आहे.

व्यापार चक्र हे रोजगार, उत्पन्न आणि उत्पादनाचे नियतकालिक चढ-उतार असतात. केन्सच्या मते, उत्पन्न आणि उत्पादन रोजगाराच्या प्रमाणात अवलंबून असते. रोजगाराचे प्रमाण तीन चलाद्वारे निर्धारित केले जाते.

munotes.in

१) भांडवलाची सीमांत कार्यक्षमता

२) व्याजदर आणि

३) उपभोग करण्याची प्रवृत्ती

केन्स सुचवतात की व्यापार चक्राचे आवश्यक वैशिष्ट्य आणि विशेषत: वेळ-क्रम आणि कालावधीची नियमितता जी आपल्याला चक्र म्हणण्यात न्याय्य ठरते, हे मुख्यत: भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेमध्ये चढ-उतार होण्याच्या मार्गामुळे आहे. भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेमध्ये चक्रीय बदल घडून आल्याने व्यापार चक्राला सर्वोत्तम मानले जाते, जरी किचकट आणि अनेकदा आर्थिक व्यवस्थेच्या इतर महत्त्वाच्या अल्प-कालावधीच्या चलांमधील संबंधित बदलांमुळे वाढले.

आमच्या आधीच्या सिद्धांताने सुचवलेल्या तपासाच्या ओळीला सूचित करण्यासाठी खालील लहान टिपा पुरेशा असतील.

चक्रीय हालचालीचा अर्थ असा होतो की प्रणाली जसजशी पुढे जाते, उदा. वरच्या दिशेने, तिला वरच्या दिशेने पुढे नेणारी शक्ती प्रथम शक्ती गोळा करतात आणि त्यांचा एकमेकांवर एकत्रित प्रभाव पडतो परंतु एका विशिष्ट बिंदूपर्यंत ते हळूहळू त्यांची शक्ती गमावतात. उलट दिशेने कार्यरत असणाऱ्या शक्तीने बदलतात; जे यामधून काही काळासाठी शक्ती गोळा करतात आणि एकमेकांवर जोर देतात, जोपर्यंत ते देखील त्यांच्या जास्तीथ जास्त विकासापर्यंत पोहोचत नाहीत, कमी होतात आणि त्यांच्या विरुद्ध स्थान मिळवतात. तथापि, आपल्या केवळ चक्रीय हालचालीचा अर्थ असा नाही की ऊर्ध्वगामी आणि अधोगामी प्रवृत्ती, एकदा सुरु झाल्यानंतर, त्याच दिशेने कायमचे टिकून राहत नाहीत परंतु शेवटी उलट होतात. आपल्याला असे म्हणायचे आहे की, वरच्या आणि खालच्या दिशेने होणाऱ्या हालाचालींच्या वेळेच्या क्रम आणि कालावधीमध्ये काही प्रमाणात नियमितता ओळखण्यायोग्य आहे.

तथापि, आपण ज्याला व्यापार चक्र म्हणतो त्याचे आणखी एक वैशिष्ट आहे जे पुरेसे असल्यास आपल्या स्पष्टीकरणात समाविष्ट करणे आवश्यक आहे; अर्थात संकटाची घटना ही वस्तुस्थिती आहे की ऊर्ध्वगामी प्रवृत्तीसाठी खालच्या दिशेने बदलणे अनेकदा अचानक आणि हिंसक रीतीने घडते, तर नियमानुसार, जेव्हा खालीच्या प्रवृत्तीसाठी ऊर्ध्वगामी बदलली जाते तेव्हा असे कोणतेही तीव्र वळण नसते.

गुंतवणूकीतील कोणताही चढ-उतार, उपभोग घेण्याच्या प्रवृत्तीतील संबंधित बदलामुळे भरपाई न मिळाल्यास, अर्थातच, रोजगारामध्ये चढ-उतार होईल. त्यामुळे, गुंतवणूकीचे प्रमाण अत्यंत गुंतागुंतीच्या प्रभावांच्या अधीन न असल्याने, गुंतवणूकीतच किंवा भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील सर्व चढउतार हे चक्रीय स्वरूपाचे असतील हे अत्यंत असंभाव्य आहे. या प्रकरणाच्या नंतरच्या भागात एक विशेष बाब, विशेषत:, कृषी उतार-चढावांशी निगडीत असलेल्या प्रकरणाचा स्वतंत्रपणे विचार केला जाईल. केन्स सुचवतात की, एकोणिसाव्या शतकातील सामान्य औद्योगिक व्यापार चक्राच्या बाबतीत, भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील चढ-उतारांची चक्रीय वैशिष्ट्ये असायला हवीत अशी काही निश्चित कारणे आहेत. ही कारणे स्वत:मध्ये किंवा व्यापार चक्राचे स्पष्टीकरण म्हणून कोणत्याही

प्रकारे अपरिचित नाहीत. त्यांचा येथे एकच उद्देश आहे की त्यांना आधीच्या सिद्धांताशी जोडणे.

तेजीच्या नंतरच्या टप्प्यापासून सुरुवात करुन आणि मंदी ची सुरुवात करुन केन्स त्याला काय म्हणायचे आहे हे उत्तम प्रकारे मांडू शकतो.

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता केवळ भांडवली वस्तूंच्या विद्यमान मुबलकतेवर किंवा टंचाईवर आणि भांडवली वस्तूंच्या उत्पादनाची सध्याची किंमत यावर अवलंबून नाही, तर भांडवली वस्तूंच्या भविष्यातील उत्पन्नाच्या सध्याच्या अपेक्षांवरही अवलंबून आहे हे आपण वर पाहिले आहे. टिकाऊ मालमत्तेच्या बाबतीत, हे नैसर्गिक आणि वाजवी आहे की भविष्यातील अपेक्षा कोणत्या प्रमाणात नवीन गुंतवणूकीचा सल्ला दिला जातो हे ठरवण्यात प्रमुख भूमिका बजावली पाहिजे. परंतु, जसे आपण पाहिले आहे, अशा अपेक्षांचा आधार अतिशय अनिश्चित आहे. बदलत्या आणि अविश्वसनीय पुराव्यावर आधारित असल्याने, ते अचानक आणि हिंसक बदलांच्या अधीन आहेत.

आता व्यापार आणि सट्टा हेतूंसाठी पैशाच्या वाढत्या मागणीच्या प्रभावाखाली व्याजदराच्या वाढत्या प्रवृत्तीवर ताण देण्यासाठी मंदी समजावून सांगण्याची आपल्याला सवय झाली आहे. काही वेळा हा घटक नक्कीच उत्तेजक आणि, कधीकधी, आरंभिक भूमिका बजावू शकतो. परंतु तो सुचवितो की मंदीचे अधिक वैशिष्ट्यपूर्ण, आणि बर्याचदा प्रमुख, स्पष्टीकरण म्हणजे, प्रामुख्याने व्याजदरात झालेली वाढ नव्हे तर भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेचे अचानक कोसळणे होय.

तेजी नंतरचे टप्पे भांडवली वस्तूंचे भविष्यातील उत्पन्न त्यांच्या वाढत्या विपुलतेची आणि त्यांच्या उत्पादनाच्या वाढत्या किंमती आणि बहुधा व्याजदरात होणारी वाढ यांची भरपाई करण्यासाठी पुरेशी मजबूत असलेल्या आशावादी अपेक्षांद्वारे वैशिष्टीकृत आहेत. हे संघटित गुंतवणूक बाजारांचे स्वरूप आहे. ज्यांच्या प्रभावाखाली खरेदीदार ते काय खरेदी करुन आहेत याविषयी मोठ्या प्रमाणावर अनभिज्ञ असतात आणि सट्टेबाजांच्या प्रभावाखाली ते बाजारातील पुढील हालचालींचा अंदाज घेतात आणि भांडवली मालमत्तेच्या भविष्यातील उत्पन्नाचा वाजवी अंदाज घेत असतात. म्हणजे जेव्हा आशावादी आणि जास्त खरेदी केलेल्या बाजारात भ्रमनिरास होतो. तेव्हा तो अचानक आणि अगदी आपत्तीजनक शक्तीने कोसळतो.

शिवाय, भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेत घसरणीसह भविष्याविषयीची निराशा आणि अनिश्तिता यामुळे स्वाभाविकपणे रोखता-प्राधान्य-मध्ये तीव्र वाढ होते आणि त्यामुळे व्याजदरात वाढ होते. अशाप्रकारे भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेत घट होणे हे व्याजदरातील वाढीशी संबंधित असते हे तथ्य गुंतवणूकीतील घट गंभीरपणे वाढवू शकते. परंतु परिस्थितीचे सार असे असले तरी, भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेत, विशेषत: अशा प्रकारच्या भांडवलाच्या बाबतीत, जे मोठ्या नवीन गुंतवणुकीच्या मागील टप्प्यात सर्वाधिक योगदान देत आहेत. रोखता-प्राधान्य, वाढत्या व्यापार आणि सट्टा यांच्याशी संबंधित असलेले प्रकटीकरण वगळता, भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेत घट होईपर्यंत वाढत नाही.

हेच आहे, जे घसरणीला अगदी सहजतेने दाखवते. नंतर, व्याजदरातील घट ही पुनर्प्राप्तीसाठी मोठी मदत करेल आणि बहुधा त्याची एक आवश्यक अट असेल. परंतु या क्षणासाठी, भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील घट इतकी पूर्ण असू शकते की व्याजदरात कोणतीही व्यावहारिक कपात पुरेशी होणार नाही. जर व्याजदरातील कपात स्वत:हून एक प्रभावी उपाय सिद्ध करण्यास सक्षम असेल, तर कोणत्याही महत्त्वपूर्ण कालावधीशिवाय आणि कमी-अधिक प्रमाणात थेट चलन प्राधिकरण्याच्या नियंत्रणाखाली पुर्नप्राप्ती साध्य करणे शक्य होईल. पण, खरे तर असे सहसा होत नाही; आणि व्यापार जगताच्या अनियंत्रित आणि अवज्ञाकारी मानसशास्त्राने निर्धारित केलेल्या भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेचे पुनरुज्जीवन करणे इतके सोपे नाही. सामान्य भाषेत बोलणे हा आत्मविश्वासचा परतावा आहे, जो व्यक्तिवादी भांडवलशाहीच्या अर्थव्यवस्थेत नियंत्रणासाठी असह्य आहे. या मंदीचा हा पैलू आहे ज्यावर बँकर्स आणि व्यावसायिकांनी जोर देणे योग्य आहे आणि ज्या अर्थशास्त्रज्ञांनी 'निव्वळ आर्थिक" उपायांवर विश्वास ठेवला आहे त्यांनी कमी लेखले आहे.

केन्सने व्यापार चक्राचा स्वत:चा विशेष सिद्धांत तयार केला नाही. परंतु त्यांनी मंदी आणि चलनवाढीचा विश्लेषणात इतके महत्त्वाचे योगदान दिले की त्यांचे शिष्य चढ-उतार आणि आर्थिक घडामोडीतील मंदीचा पद्धतशीर लेखाजोखा देऊ शकले. या सामान्य सिद्धांतात केन्सने 'व्यापार चक्रावरील माहिती" जोडणे पुरेसे मानले.

व्यापार चक्रावरील या माहितीचे व्यापार चक्राच्या संपूर्ण सिद्धांताशी तडजोड केली नाही. कारण व्यापार चक्राच्या विविध टप्प्यांचे तपशीलवार वर्णन करण्याचा येथे कोणताही प्रयत्न केला गेला नाही. केन्सने चक्रीय चढउतारांच्या अनुभवजनय आकडेवारीचे बारकाईने परीक्षण केले नाही. सर्वसामान्यपणे केन्सने संपूर्ण सिद्धांत तयार करण्याच्या उद्देशाने विश्लेषणात्मक साधने प्रदान केली.

केन्सच्या मते व्यापार चक्र हे भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील चढउतारांमुळे गुंतवणूकीच्या दरातील फरकांमुळे होते. 'भांडवलाची सीमांत कार्यक्षमता' या शब्दाचा अर्थ नवीन गुंतवणूकीतून अपेक्षित नफा. उद्योजकीय क्रियाप्रक्रिया नपांयाच्या अपेक्षेवर अवलंबून असतात. त्याच्या व्यापार चक्र सिद्धांतामध्ये केन्सने अपेक्षांना प्रमुख भूमिका दिली आहे.

व्यापार चक्र हे रोजगार, उत्पन्न आणि उत्पादनाचे नियतकालिक चढ-उतार असतात. केन्सच्या मतानुसार उत्पन्न आणि उत्पादन रोजगाराच्या प्रमाणावर अवलंबून असते. रोजगाराचे प्रमाण हे तीन घटकांवर निर्धारित केले जाते. भांडवलाची सीमांत कार्यक्षमता, व्याज दर आणि उपभोग प्रवृत्ती.

अल्प कालावधीत व्याजदर आणि उपभोग घेण्याची प्रवृत्ती कमी-अधिक प्रमाणात स्थिर असते. त्यामुळे भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील चढउतारांमुळे रोजगारांच्या प्रमाणात चढ-उतार होतात.

**व्यापार चक्राचा केन्सच्या सिद्धांत खाली सारांशित केला आहे.**



**१) गुंतवणूकीची महत्त्वपूर्ण भूमिका :**

केन्सने असे सांगितले की व्यापार चक्र मुलत: भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील चढउतारांमुळे निर्माण होते आणि भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील चढउतार हे गुंतवणूकीच्या दरातील चढउतारांमुळे होतात. भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील चढ-उतार हे केन्सने व्यापार चक्राचे मूळ कारण मानले होते.

**केन्सच्या मते भांडवलाची सीमांत कार्यक्षमता प्रामुख्याने दोन घटकांवर अवलंबून असते:**

१) नवीन भांडवली मालमत्तेतील गुंतवणूकीतून संभाव्य उत्पन्नाची मालिका.

२) नवीन भांडवली मालमत्तेची पुरवठा किंमत (बदली खर्च)

हे दोन घटक गुंतवणूकदारांच्या मानसशास्त्रावर आधारित आहे. त्यामुळे ते कधीही आणि खूप वेगाने बदलू शकतात. भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही व्यावसायिकांच्या अपेक्षांवर आधारित असते. एका वेळी आशावादाच्या लाटा येऊ शकतात ज्यामुळे भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढते. दुसर्या वेळी नवीन भांडवली मालमत्तेसाठी बाजारात निराशावादी सूर असू शकतो. ज्यामुळे भांडवलाची सीमांत कार्यक्षमता लक्षणीयरीत्या कमी होते.

केन्स यांच्या दृष्टिकेनानुसार भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील अचानक बदलांचा परिचय आणि म्हणून गुंतणूक ही व्यापार चक्र समजून घेण्याची गुरुकिल्ली आहे. आर्थिक घडोमोडीतील मंदी आणि चढउतार हे दोन्ही गुंतवणूकीतील अचानक आणि लक्षणीय बदलांचे परिणाम आहेत.

**२) आर्थिक क्रियाप्रक्रियांमध्ये वाढ :**

व्यापार चक्राच्या विस्ताराच्या टप्प्यात गुंतवणूकदारांचा दृष्टिकोन आशावादी असतो. नवीन भांडवली मालमत्तेतील गुंतवणूकीच्या उच्च फायद्याचा त्यांना ठाम विश्वास आहे. त्यांचा गुणक प्रभाव जास्त आहे. गुंतवणूकीचा वाढीपेक्षा उत्पन्न खूप वेगाने वाढते. वाढत्या उत्पन्न, उत्पादन आणि रोजगाराच्या काळात गुंतवणूकदारांच्या आशावादाला आणखी आधार मिळते. त्यामुळे संसाधनांना पूर्ण रोजगार मिळेपर्यंत आर्थिक क्रियाप्रक्रियांचा विस्तार आपोआप होत जातो.

पूर्ण रोजगाराच्या दिशेने जाणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या स्थितीला तेजी असे म्हणतात. तेजीच्या टप्प्यात व्याजदर वेगाने वाढतो. परंतु गुंतवणूकदारांच्या केवळ आशावादामुळे व्याजदर वाढत्या गुंतवणूकीला खंडीत करण्याचे काम करु देत नाहीत. जर गुंतवणूक स्थितीशील गणनेच्या आधारे करायची अशेल तर, व्याजदराचा दर भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेच्या बरोबरीने झाल्यावर नवीन गुंतवणूक होणार नाही.

**जसजसे तेजी पुढे जाईल तसतसे गुंतवणूकीचा नफा तीन घटकांमुळे घसरतो :**

१) भांडवली मालमत्तेच्या वाढत्या पुरवठ्यामुळे सीमांत परतावा कमी करण्याकडे कल.

२) भांडवली मालमत्तेच्या उत्पादनाची वाढती किंमत.

३) व्याजदरात वाढ.

परंतु व्यावसायिक त्यांच्याकडून अती आशावादामुळे सीमांत कार्यक्षमतेतील घसरणीकडे दुर्लक्ष करतात. येथे केन्स म्हणतात की, 'तेजी ही एक अशी परिस्थिती आहे ज्यामध्ये व्याजदरावर आशावादाचा विजय होतो जे स्थितीशील परिस्थितीत अनन्य असल्याचे दिसून येते."

**३) मंदी आणि नैराश्य :**

गुंतवणूकीत सतत होणारी वाढ हळूहळू अशा टप्प्यावर पोहोचते जिथे अतिरिक्त भांडवली वस्तूंची मागणी केली जाणार नाही. भांडवली वस्तूंच्या मागणीच्या संपृक्ततेचा हा एक बिंदू आहे. भांडवली मालमत्तेच्या उत्पादनाची वाढती किंमत, कमी होत चाललेली संभाव्य उत्पन्न टंचाई आणि उत्पादनामध्ये अडथळे निर्माण होणे अत्याधिक स्पर्धा आणि उत्पादित वस्तूंचे विपुलता ही येऊ घातलेल्या मंदीची नि:संदिग्ध चिन्हे आहेत. त्यामुळे तेजीच्या स्थितीचा अतिआशावाद निराशावादाने अनुसरला आहे. निराशावादाचा मार्ग वेगाने पसरतो. या परिस्थितीत भांडवलाची सीमांत कार्यक्षमता अचानक कोसळते जी आपत्तीजनक असते. शेअर बाजार अनेकदा कोसळतात. गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास कमी होतो. उत्पादन घटले, बेरोजगारी वाढते. बाजारात भांडवली वस्तूंची चणचण भासते. अशाप्रकारे आकुंचन टप्पा सुरु होतो.

आर्थिक आकुंचन जलद गतीने होते कारण गुणक उलट दिशने कार्य करते आणि गुंतवणूकीत घट होण्यापेक्षा जास्त वेगाने उत्पन्न कमी करते. आकुंचनाला गती देणारी आणखी एक शक्ती म्हणजे गुंतवणूक बाजार कोसळल्यानंतर व्याजदरात होणारी झपाट्याने वाढ ही होय. तसेच आकुंचन अवस्थेत व्याजदरात तुलनेने जलद वाढ हे किंमती घसरण्याचा कालावधीत लोकांच्या रोखतेच्या पसंतीमध्ये अचानक वाढ झाल्यामुळे होते.

**केन्स यांनी रोखता प्राधान्यामध्ये अचानक वाढीचे श्रेय खालील तीन घटकांना दिले जे मंदीमध्ये कार्य करतात :**

१) रोख्यांच्या किंमती आणखी घसरतील अशी लोकांची अपेक्षा असते ज्यामुळे रोख्यांचे मालक त्यांना आणखी भांडवली तोटा होण्यापूर्वी त्यांची विक्री करतात. रोख्यांचे खरेदीदार कमी असल्याने त्यांच्या किंमती घसरतात आणि व्याजदर रोख्यांच्या किंमती घसरल्याच्या प्रमाणात वाढतात.

२) जेव्हा सामान्य किंमत पातळी घसरत असते तेव्हा ग्राहक त्यांची खरेदी पुढे ढकलतात आणि रोख रक्कम जवळ ठेवतात. पैशाचे मूल्य वाढते म्हणून रोख रकमेची मागणी वाढते.

३) कायमस्वरूपी कर्मचार्यांना भाडे आणि पगाराच्या स्वरूपात त्यांच्या कंत्राटी जबाबदार्या पूर्ण करण्यासाठी या उत्पादकांना त्यांची यादी रद्द करण्यास भाग पाडले जाते. ते या उद्देशासाठी कर्ज उभारण्याचा प्रयत्न करतात ज्यामुळे रोख मागणीत आणखी भर पडते.

हे तिन्ही घटक लोकांची रोखता पसंती वाढवतात आणि त्यामुळे व्याजदर वाढतात. अशाप्रकारे व्याजदर वाढत असताना भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी होत राहते. यामुळे गुंतवणूकीची क्रिया आणखी कमी होते. व्यावसायिक जग उदासीनतेने व्यापले आहे. प्रत्यक्षात परिस्थिती दिसते तितकी वाईट नसावी पण गुंतवणूकदार निराशावादी बनतात. गुंतवणूकीच्या बाजारपेठेतील त्यांचा विश्वास पुनरुज्जीवित करणे सरकारसाठी खूप कठीण आहे.

कारण वाढीव पैशाच्या पुरवठ्याद्वारे सरकार व्याजदर कमी करण्याचा प्रयत्न करु शकते. गुंतवणूकीच्या फायद्याची हमी सरकार देऊ शकत नाही. बँका कर्ज आणि सवलतीचा दर देऊ शकतात. परंतु गुंतवणूकदार या कर्जाचा लाभ घेऊ शकत नाहीत. अशाप्रकारे केवळ आर्थिक धोरण नैराश्यात आर्थिक क्रियाप्रक्रियांना चालना देण्यात अपयशी ठरते. गुंतवणूकीचा कमी दर अर्थव्यवस्थेत समतोल उत्पन्नाची निम्न पातळी निर्माण करतो. यालाच केन्स अपूर्ण रोजगार समतोल असे म्हणतात. हा समतोल काही काळ स्थिर असतो.

मंदीच्या स्थितीतून अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी राजकोषीय धोरणाचा वापर करणे आवश्यक आहे. केवळ सार्वजनिक गुंतवणूकीसह गुंतवणूकीच्या क्रियाप्रक्रियांसाठी कर सवलत आणि इतर प्रोत्साहने अर्थव्यवस्थेला नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढतात.

**पुर्नप्राप्ती ही एक मंद आणि थांबणारी प्रक्रिया आहे.**

मंदीनंतर आर्थिक क्रियाप्रक्रियांच्या विस्ताराची प्रक्रिया मंद होते.

अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी लागणारा वेळ खालील तीन घटकांवर अवलंबून असतो:

१) अर्थव्यवस्थेच्या वाढीचा सामान्य दर हा तुलनेने जास्त किंवा तुलनेने कमी असू शकतो. अर्थव्यवस्थेच्या वाढीचा सामान्य दर लवकर पुर्नप्राप्ती करतो आणि कमी वाढीचा दर तो मंदावतो.

२) भांडवली वस्तूंच्या अप्रचलितपणाचा / परिधानाचा कालावधी भांडवली वस्तूंचे आयुष्य जितके जास्त असेल तितके अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी जास्त वेळ लागतो आणि त्याउलट भांडवली वस्तूंच्या कमी कालावधीसाठी या वस्तूंच्या बदलीसाठी लवकरात लवकर गुंतवणूक करणे आवश्यक आहे. यामुळे पुर्नप्राप्तीसाठी वेळ कमी होतो.

३) तेजीच्या कालावधीपासून जमा झालेल्या साठ्याची विल्हेवाट लावण्यासाठी लागणारा वेळ. जर उद्योजकांनी व्यापार चक्राच्या मंदीच्या टप्प्यात अर्थ-तयार आणि तयार मालाचा साठा आधीच विकला असेल तर गुंतवणूकीच्या वातावरणात थोडीशी सुधारणा देखील पुर्नप्राप्ती सुलभ करते. आर्थिक क्रियाप्रक्रियांच्या उलट

पुनरुज्जीवनास उशीर होईल ज्या प्रमाणात उत्पादकांकडे विक्री न झालेला साठा असेल. म्हणजेच जुना साठा संपपर्यंत नवीन गुंतवणूक करता येत नाही.

त्यामुळे वसुली मंदावते व यासाठी साधारणपणे ३ ते ४ वर्षे कालावधी लागतो. ज्या कंपन्यांचे स्टॉक ते तेजीच्या टप्प्यापासून जमा करतात त्यामुळे बंदी टिकून राहण्यासाठी हा किमान वेळ आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मंदीच्या काळात लोकांच्या उपभोगाची पातळी कमी होते.

आपण आता व्यापार चक्राच्या स्पष्टीकरणासाठी केलेल्या विशिष्ट योगदानाच्या सारांश देण्याच्या स्थितीत आहोत. सर्वप्रथम केन्सने हे स्पष्ट केले की व्यापार चक्र हे समतोल पातळीच्या आसपासच्या आर्थिक क्रियाप्रक्रियांचे चढउतार असतात. आर्थिक क्रियाप्रक्रियांची समतोल पातळी मुख्यत: गैर-प्रेरित (स्वायत्त) गुंतवणूकीद्वारे निर्धारित केली जाते.

दुसरे म्हणजे केन्स प्रथमच व्यापार चक्रातील वळण बिंदूचे खात्रीशीर स्पष्टीकरण देऊ शकते. हे त्यांच्या उपभोग कार्याच्या सिद्धांताच्या मदतीने तो यशस्वीपणे करु शकते. गुंतवणूक बाजारातील पडझड ही लोकांच्या उपभोग कार्याच्या अंतर्गत वास्तविक बचतीच्या तुलनेत जास्त गुंतवणूकीमुळे होते.

जेथे उत्पन्न उपभोगाच्या बरोबरीचे होते आणि निव्वळ बचत किंवा गुंतवणूक नसते तेथे खालचा वळण बिंदू चिन्हांकित केला जातो. तिसरे म्हणजे केन्स हे दाखवू शकतात की अर्थव्यवस्थेत मंदी अचानक का आली तर पुर्नप्राप्ती प्रक्रिया साधारणपणे मंद आहे. तिसरे म्हणजे, चढाव आणि उताराचे एकत्रित स्वरूप केन्सने त्यांच्या गुंतवणूक गुणक संकल्पनेच्या मदतीने स्पष्ट केले. गुंतणूक गुणक उतारामध्ये वेगाने उत्पन्न कमी करण्यासाठी उलट दिशने काम करत असताना उत्पन्न जलद वाढवण्यासाठी मदत करतो.

## ६.२ चलनवाढीचा केन्सचा सिद्धांत

केन्सचा चलनवाढीचा सिद्धांत सनातनवादी सिद्धांतचा विशेषत: विकसलेल्या दृष्टिकोनाचा विस्तार आणि सामान्यीकरणापेक्षा थोडा अधिक आहे असे मानले जाते. तथापि, केन्सने सनातनवादी दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण प्रस्थान केले (बाहेर पडला) आहे. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी पैशाच्या पुरवठ्यात वाढ आणि त्यामुळे एकूण मागणीत वाढ होणे हे चलनवाढीचे एकमेव कारण मानले. केन्सने देखील असे मानले की चलनवाढ ही एकूण मागणी वाढल्यामुळे होते.

केन्सच्या मते, वास्तविक घटकांमध्ये वाढ, सीमांत उपभोग प्रवृत्ती वाढल्यामुळे ग्राहकांच्या मागणीत वाढ, गुंतवणूकीच्या सीमांत कार्यक्षमतेत वरच्या दिशने बदल झाल्यामुळे, गुंतवणूकीच्या मागणीत वाढ आणि सरकारी खर्चात वाढ यामुळे एकूण मागणी वाढू शकते. पैशाचा पुरवठा स्थिर असतानाही असे बदल होऊ शकतात. एकूण मागणीत वाढ आणि एकूण पुरवठा स्थिर राहिल्याने मागणी-पुरवठ्यात तफावत निर्माण होते ज्याला त्यांनी चलनवाढीय अंतर म्हटले. केन्सच्या मते, चलनवाढीचे अंतर हे चलनवाढीचे कारण आहे.

केन्सने आपल्या पुस्तकात चलनवाढीवर आपले मत मांडले होते. हाऊ टू पे फॉर द वॉर? (१९४०), ज्यामध्ये त्यांनी चलनवाढीचा अंतराची संकल्पना दिली. नियोजित खचर् आणि पूर्ण रोजगारावर उपलब्ध वास्तविक उत्पादन यांच्यातील अंतर म्हणून चलनवाढीचे अंतर परिभाषित केले जाते.

केन्सच्या पाठोपाठ, ब्रिटिश चॅन्सेलर ऑफ एक्स्चेकर यांनी त्यांच्या १९४१ च्या अर्थसंकल्पीय भाषणात चलनवाढीची तफावत सरकारच्या खर्चाची रक्कम म्हणून परिभाषित केली. ज्याच्या विरुद्ध समाजातील इतर काही सदस्यांकडून मनुष्यबळ किंवा सामग्रीची वास्तविक संसाधने सोडली जात नाहीत. याला चलनवाढीय अंतर असे म्हणतात कारण त्यामुळे उत्पादनाची पातळी न वाढता चलनवाढ वाढते.

येथे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की केन्सने चलनवाढीय अंतर आणि परिणामी चलनवाढ पूर्ण रोजगार पातळीच्या उत्पादनाशी जोडलेली आहे. त्यांच्या मते, जर अर्थव्यवस्था पूर्ण-रोजगार पातळीपेक्षा कमी असेल, तर किंमत वाढ म्हणजे चलनवाढ नाही. याचा अर्थ असा होतो की, पूर्ण-रोजगार पातळीवर उत्पादनाच्या पुरवठ्यापेक्षा जास्त मागणी निर्माण करणारा खर्च किंमती वाढल्या तरी चलनवाढ वाढवत नाही. कारण, किंमतीतील अशा वाढीमुळे अतिरिक्त रोजगार आणि उत्पादन निर्माण होते. अतिरिक्त उत्पादन पुरवठा वेळेच्या अंतराने अतिरिक्त मागणी शोषून घेतो. केन्सच्या मते, वेळेच्या अंतरादरम्यान किंमत वाढणे म्हणजे चलनवाढ नाही.

जीवन चक्र गृहीतकानुसार, आजीवन उपभोग हे ग्राहकांच्या आजीवन अपेक्षित उत्पन्नाचे कार्य आहे. हे असे प्रितपादन करते की एखादी व्यक्ती त्याच्या अपेक्षित आजीवन उत्पन्नाच्या आधारावर त्याच्या उपभोगाची आणि बचतीची योजना आखते. वैयक्तिक ग्राहकाचा उपभोग त्याच्याकडे उपलब्ध संसाधने, भांडवलावरील परताव्याचा दर, खर्चाची योजना आणिही योजना कोणत्या वयात बपवली आहे यावर अवलंबून असते. त्याच्या संसाधनांच्या वर्तमान मूल्यामध्ये मालमत्ता किंवा संपत्ती किंवा मालमत्ता आणि वर्तमान अपेक्षित कामगार उत्पन्न यांचा समावेश होतो. अशा प्रकारे, त्याच्या एकूण संसाधनांमध्ये त्याचे उत्पन्न आणि संपत्ती असते.जीवन चक्र सिध्दांत उपभोग आणि बचत वर्तन यांना लोकसंख्याशास्त्रीय घटकांशी जोडते, विशेषतः लोकसंख्येच्या वयाच्या वितरणाशी कायमस्वरुपी उत्पन्नातून उपभोग घेण्याची किरकोळ प्रवृत्ती, वयानुसार बदलते. वाढत्या वयाबरोबर सीमांत उपभोग प्रवृत्ती कमी होते. अर्थव्यवस्थेमध्ये, विविध वयोगटातील आणि आयुर्मानाचे लोक असतात, त्यामुळे अर्थव्यवस्थेसाठी वयाबरोबर सीमोत उपभोग प्रवृती (MPC) हे संबंधित (MPC) चे मिश्रण असते. परिणामी, वेगवेगळया वयोगटातील मिश्रण असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये बचत आणि उपभोग करण्याची भिन्न सीमांत प्रवृत्ती असते.

### ७.५.२ गृहीतके :

जीवन चक्र गृहीतके खालील गृहितके आहेत

१. ग्राहकाच्या आयुष्यादरम्यान किंमतीच्या पातळीत कोणताही बदल होत नाही.

२. मालमत्ता दिलेला व्याजदर शून्य आहे.

३. ग्राहकाची निव्वळ मालमत्ता त्याच्या बचतीचा परिणाम आहे.

४. भविष्यातील उपभोग हा ग्राहकाच्या सध्याच्या बचतीचा परिणाम आहे.

५. ग्राहकाला त्याची एकूण आयुष्यभराची कमाई आणि चालू मालमत्ता वापरण्याची अपेक्षा असते.

६. तो कोणत्याही दकणगीची योजना करत नाही.

७. ग्राहकांच्या वर्तमान आणि भविष्यातील उत्पन्नाच्या प्रवाहाविषयी निश्चितता आहे.

८. ग्राहकाला आयुर्मानाची निश्चित जाणीवपूर्वक दृष्टी असते.

९. ग्राहकाला भविष्यातील आप्तकालीन परिस्थिती, संधी आणि सामाजिक दबावांची जाणीव असते ज्यामुळे त्याच्या उपभोग खर्चावर परिणाम होईल.

१०. ग्राहक तर्कसंगत आहे.

या गृहितकांच्या आधारे जीवन चक्र गृहीतक स्पष्ट करते की ग्राहक आयुष्यभर त्याची उपयुक्तता जास्तीत जास्त वाढवेल. त्याची उपयुक्तता वाढवणे त्याच्या आयुष्यभराच्या संसाधनांवर अवलंबून असते.

सांकेतिक भाषेत

$Ct = f(Vt)$

Where $Ct$ - वेळी वापर $t$

$(Vt)$ - - वेळी एकूण संसाधने $t$

जीवन चक्र सिध्दांत लोकसंख्येच्या वयाच्या वितरणासह लोकांच्या उपभोग आणि बचत वर्तनाशी जोडतो. ग्राहकाचा उपभोग त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या संसाधनाच्या प्रमाणात असतो. परंतु उपभोग योजना लहान वयात किंवा नंतरच्या वयात केली जाते यावर व्यक्तीचा उपभोग अवलंबून असतो. आयुष्याच्या मध्यभागी, व्यक्तीचे उत्पन्न जास्त असते.तो त्याच्या श्रमातून आणि मालमत्तेतून कमावतो. पुन्हा, आयुष्याच्या नंतरच्या टप्प्यावर, एखाद्या व्यक्तीचे उत्पन्न माफक असते कारण तो त्याच्या श्रमातून फारच कमी कमावतो आणि त्याच्याकडे कमी मालमत्ता असते. आयुष्याच्या मध्यभागी व्यक्तीचे उत्पन्न जास्त असल्याने, संपूर्ण आयुष्यभर उपभोगाची पातळी स्थिर राहते.जीवन चक्र गृहीतक हे स्पष्ट करते की सर्वसाधारणपणे, व्यक्ती समान स्तरावर उपभोग ठेवतात कारण जीवनाच्या नंतरच्या टप्प्यात ते त्याच्या मुख्य कमाईच्या वर्षांमध्ये निर्माण केलेल्या बचतीचा वापर करतात किंवा ते त्यांची मालमत्ता नष्ट करु शकतात. जावनाच्या सुरुवातीच्या काळात, उपभोगाची विशिष्ट पातळी राखण्यासाठी उत्पन्न पुरेसे नसल्यास, व्यक्ती कर्जाद्वारे त्यांचा उपभोग स्तर राखू शकतात. सिध्दांताचा अंदाज आहे की आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे संपत्ती जमा होण्यासाठी कुबड्याच्या आकाराचा नमुना लागतो.

munotes.in




**आकृती क्र. ७.४**

आकृतीमध्ये,C C१ हा उपभोग वक्र आहे.Y०Y१ही व्यक्तीची मिळकत वक्र आहे, ती व्यक्तीचे आयुष्यभराचे उत्पन्न दाखवते. आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात (OT१) व्यक्तीचे उत्पन्न त्याच्या उपभोगापेक्षा कमी असते. उपभोग वक्र CC१उत्पन्न वक्र Y०Yआहे,तो त्याचा उपभोग स्तर राखण्यासाठी कर्ज घेतो. Y०CB बेबचत आहे.त्याची उपभोग पातळी CB आहे जी जवळजवळ स्थिर आहे.एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील मधली वर्षे T१T२ द्वारे दर्शविली जातात.मधल्या काळात त्याचे उपभोगापेक्षा जास्त असते. उत्पन्न वक्र Y०Y१ उपभोग CC१ च्या वर आहे.त्याची बचत पातळी खूप उच्च म्हणजे BYS आहे.जी मण्यम वयातील एकूण बचत आहे. पुढे,T२T  द्वारे दर्शविलेल्या जीवनाच्या नंतरच्या टप्प्यात, पुन्हा  त्याचे उत्पन्न कमी होते परंतु उपभोगाची पातळी काहीशी तशीच राहते. जीवनाच्या या टप्प्यातील उपभोग वक्र उत्पन्नाच्या वक्र वर आहे. जीवनाच्या सुरवातीच्या टप्प्यातील बचतीचा वापर तो सतत उपभोगाची पातळी राखण्यासाठी करतो. परिणामी SC१Y१ हे बेबचत आहे.

### ७.५.३ परिणाम :

केन्सच्या सिध्दांतानुसार, एकूण बचत दर उत्पन्नाच्या पातळीनुसार निर्धारित केला जातो, परंतु जीवन चक्र गृहीतक असे सूचित करते की बचत दर उत्पन्नाच्या वाढीच्या दरावर अवलंबून असतो.

### २. उपभोगाची भिन्न सीमांत प्रवृत्ती -

जीवन चक्र परिकल्पना कायमस्वरुपी उत्पन्न, तात्पुरते आणि संपत्ती यातून उपभोगण्याची भिन्न सीमांत प्रवृत्ती सूचित करते. त्याच्या आयुष्यभराच्या उत्पन्नाच्या अपेक्षेनुसार त्याचा उपभोग स्थिर राहतो, परंतु जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर त्याचे उत्पन्न बदलते आणि उपभोग करण्याच्या सीमांत प्रवृत्तीमुळे बदलते.

**३. सेवन करण्याची सरासरी प्रवृत्ती स्थिर राहते -**

झसजसे उत्पन्न वाढते तसतसे, (ACP) सरासरी उपभोग प्रवृत्ती उत्पन्नाच्या वाढीसह स्थिर राहते कारण एकूण उत्पन्नामध्ये श्रमिक उत्पन्नाचा वाटा आणि एकूण उत्पन्नातील संपत्ती (मालमत्ता) यांचे गुणोत्तर अर्थव्यवस्था वाढते तसे स्थिर असते.

**४. सुरळीत आणि अखंड वापर -**

जीवन चक्र गृहीतक दर्शविते की ग्राहकाच्या जीवनकाळातच बचत बदलते. आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात, ग्राहकाकडे संपत्ती नसते, परंतु जो त्याच्या कामाच्या वर्षांमध्ये संपत्ती वाचवेल आणि गोळा करेल. पण पुन्हा, त्याचा आयुष्याच्या नंतरच्या टप्प्यात, पिवृत्तीच्या काळात, तो पूर्वीची बचत वापरेल. याचा अर्थ असा होतो की ग्राहकाला त्याचा आयुष्यभर सुरळीत आणि अखंड वापर हवा आहे. कामाच्या वर्षांमध्ये, तो बचत करतो आणि नंतर त्यालाबचत करणे शक्य होत नाही.

**५. भिन्न वयोगटातील रचना आणि संपत्ती असलेल्या अर्थव्यवस्थामध्ये भिन्नसीमांतउपभोग प्रवृत्ती आणि सीमांत बचतप्रवृत्ती असतात-**

संपत्तीची रचना आणि वयोमानानुसार उपभोग आणि बचत करण्याची प्रवृत्ती बदलेल. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबाच्या तुलनेत उच्च उत्पन्न असलेले कुटुंब त्यांच्या उत्पन्नाच्या कमी प्रमाणात वापरते. वेगवेगळ्या वयोगटातील विविध संपत्ती रचना असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये उपभोग आणि बचत करण्याची भिन्न प्रवृत्ती असते.

**७.५.४ टीका :**

**१. आजीवन उपभोगाची चुकीची धारणा -** गृहीतक असे गृहीत धरले की त्याच्या आयुष्यभर त्याच्या उपभोगाची योजना करतो. परंतु भविष्य अनिश्चित असल्याने ग्राहक भविष्यातील उपभोग करण्याऐवजी वर्तमानावर लक्ष केंद्रित करु शकतो.

**२. पुढील पिढ्यांसाठी उच्च बचत -** जीवन चक्र गृहीतक असे गृहीत धरते की जीवनाच्या नंतरच्या टप्प्यावर, बचत कमी होते, परंतु वारसा पुढच्या पिढीला देण्यासाठी लोक अधिक संपत्ती जमा करु शकतात. तसेच, वृध्दापकाळात जास्त प्रमाणात सेवन करण्याची इच्छा नसल्यामुळे ते कमी प्रमाणात सेवल करतात.

**३. उपभोग ग्राहकांच्या मानसिकतेवर अवलंबून असतो -** उपभोग हा केवळ उत्पन्न आणि संपत्तीवर अवलंबून नसतो तर जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यावर अवलंबून असतो. समान उत्पन्न आणि मालमत्ता असलेल्या लोकांचे उपभोग आणि बचतीचे स्तर भिन्न असू शकतात.

**४. ग्राहक असमंजसपणाने वागू शकतो -** असे गृहीत धरण्यात आले आहे की ग्राहक तर्कसंगत आहे त्याला त्याच्या उत्पन्नाबद्दल आणि भविष्यातील उत्पन्नाबद्दल पूर्ण माहिती आहे. त्याचे उपभोगाचे निर्णय आयुष्यभराच्या उत्पन्नावर अवलंबून असतात, तो आयुष्यभराच्या उत्पन्नाबद्दल संपूर्ण माहिती नसू शकते आणि त्यांच्या जीवनभरासाठी त्यांच्या उपभोगाचे नियोजन करण्याची क्षमता किंवा इच्छा त्यांच्याकडे नसते.

**५. अनेक चलांचा अंदाज लावणे आवश्यक आहे.-** हा सिध्दांत सध्याचे उत्पन्न, मालमत्तेचे मूल्य, भविष्यातील अपेक्षित कामगार उत्पन्न, संपत्ती इत्यादीवर अनेक चलांवी अवलंबून आहे, असंख्य चलांचे मूल्यांकन करणे खूप कठीण होते.

**६. पत मर्यादा-** एखाद्या व्यक्तीला त्याच्या भविष्यातील अपेक्षित उत्पन्नाच्या आधारे जीवनाच्या सुरुवातीच्या टप्प्यात भांडवली बाजारात कर्ज घेण्याची संधी कमी असते. परिणामी, आजीवन उत्पन्नावर आधारित अंदाजित उत्पन्नापेक्षा वर्तमान उत्पन्नातील बदलांसह ग्राहक बदलू शकतात.

**७. अचानक फायद्यांचा विचार नाही -** हे गृहितक अचानक नफा आणि उपभोगावर होणारे परिणाम विचारात घेत नाही.

**८. उपभोग सुरळीत नाही-** जीवन चक्र सिध्दांत असे गृहीत धरतो की एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यात उपभोग सुरळीत आणि स्थिर असतो, परंतु अमेरिका आणि इंग्लंड मध्ये असे दिसून आले की उपभोग मध्यम वयाम वाढतो आणि तो जीवनाच्यानंतरच्या टप्प्यात कमी होतो.

अशा मर्यादा असूनही, आधुनिक समग्रा अर्थशास्त्रीय सिध्दांता मध्ये जीवन चक्र गृहीतके महत्त्वाचे स्थान आहे.

## ७.५ सारांश

केन्स नंतरचे अर्थशास्त्र हा विचारांचा एकसंप्रदाय आहे जो केन्सच्या कल्पनांवर आधारित आहे परंतु मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्राच्या कल्पना नाकारते. पुरवठा बाजूचे अर्थशास्त्र पुरवठा बाजू किंवा उत्पादनावर जोर देते.आर्थिक समस्या कमी करण्यासाठी पुरवठा बाजूचे घटक अधिक प्रभावशाली आहेत असे मानणार्या अर्थतज्ज्ञांना पुरवठ-बाजूचे म्हणतात.मागणी-बाजूचे अर्थशास्त्र आणि पुरवठा-बाजूचे अर्थशास्त्र दोन्ही समर्थक आर्थिक वाढीचे उद्दिष्ट ठेवतात आणि इच्छित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांची धोरणे आणि कार्यपध्दती भिन्न आहेत. उत्पादन किंवा पुरवठ्याला प्रोत्साहन देण्यासाठी करांमध्ये प्रस्तावित कपातकेली जाते. केन्सच्या सिध्दांनंतरचा सिध्दांत हा हायेकचा व्यापार चक्राचा सिध्दांत आहे. व्यापार चक्राच्या पूर्वीच्या सिध्दांतांमध्ये भांडवली मालमत्ता आणि गुंतवणुकीच्या अस्थिरतेवर जोर देण्यात आला होता, तर व्यापार चक्रांचे विश्लेषण करताना सापेक्ष आदान आणि प्रदान किमती, व्याजदर आणि नफा यांच्यातील बदलांवर देखील जोर देण्यात आला होता. अँडो मोकडग्लियानी आणि रिचर्ड ब्रुमबर्ग. याने केन्सने विकसित केलेल्या गृहीतकाची जागा घेतली. केन्सने असे सुचवले की बचत उत्पन्नाच्या वाढीसह वाढते, परंतु एकूण मागणी कमी करु शकते. अँडो मोडिग्लियानी आणि रिचर्ड बुरमबर्ग यांनी सुचवले की व्यक्तींनी त्यांच्या उपभोगाचे आणि बचतीचे दीर्घ कालावधीसाठी नियोजन केले पाहिजे जेणेकरुन ते त्यांच्या उपभोगाचे वाटप आयुष्यभर सर्वोत्तम मार्गाने करतात.

## ७.६ प्रश्न

१. पुरवठा बाजूचे अर्थशास्त्र म्हणजे काय? पुरवठा बाजूचे अर्थशास्त्रचे विषय स्पष्ट करा.

२. मागणी-बाजूचे अर्थशास्त्र आणि पुरवठा-बपजूचे अर्थशास्त्र यातील फरक समोर आणा.

३. हायेकच्याव्यापार चक्राचा सिध्दांताचे टीकात्मक मूल्यांकन करा.

४. हायेकच्या व्यापार चक्राच्या सिध्दांताचे वर्णन करा. त्याचे परिणाम काय आहेत.

५. जीवन चक्र गृहीतक स्पष्ट करा. त्याचे परिणाम काय आहेत?

६. जीवन चक्र गृहीतकांचे परीक्षण करा.

❖❖❖❖

munotes.in

# ८

# केन्सनंतरचे अर्थशास्त्र - २

**प्रकरण रचना :**

८.१ उद्दिष्टे

८.२ प्रस्तावना

८.३ पैशाच्या मागणीचा फ्रीडमनचा सिध्दांत

८.४ दीर्घकालीन फिलिप्स वक्र

८.५ मँनकीव यांचे नवीन केन्सियन प्रारुप

८.६ चलनवाढजन्य मंदी

८.७ सारांश

८.८ प्रश्न

## ८.१ उद्दिष्टे

१. मिल्टन फ्रीडमनची पैशाची मागणी आणि पैशाच्या मागणीच्या पूर्वीच्या आवृत्त्यांमधील फरक समजून घेणे.

२. फ्रीडमनच्या मागणीच्या सिध्दांताचे मूल्यमापन करणे.

३. दीर्घकालीन फिलिप्स वक्राच्या वर्तनाचे परीक्षण करणे.

४. केन्सच्या नवीन दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

५. केन्सच्या नवीन अर्थशास्त्राचे मॅनकिव प्ररुप समजून घेणे.

## ८.२ प्रस्तावना

केन्सनंतरचे अर्थशास्त्र हा ज्ञानाचा एक भाग आहे जो सतत वाढत आहे. अनेक सिध्दांत आणि युक्तिवाद केन्सच्या सिध्दांतांवर आधारित आहेत. या प्रकरणामध्ये आणखी काही सिध्दांत समाविष्ट केले आहेत. यापैकी एक प्रमुख सिध्दांत म्हणजे फ्रीडमॅनचा पैशाच्या मागणीचा सिध्दांत. मिल्टन फ्रीडमनचा मागणीचा सिध्दांत अंशतः केन्सच्या विचारांवर आधारित आहे परंतु तो केन्सच्या सिध्दांतापासून काही बाबतीत वेगळा आहे. केन्सच्या कल्पनेवर आधारित आणखी एक युक्तिवाद फिलिप्स वक्र आहे तो चलनवाढ आणि

munotes.in

बेरोजगारी यांच्यातील विपरीत संबंध व्यक्त करतो. असे नाते फार काळ टिकत नाही हा युक्तिवाद सविस्तरपणे सांगितला आहे.

मॅनकीव यांनी किंमत सूची खर्चाच्या सिध्दांताद्वारे अर्थव्यवस्थेत अनैच्छिक बेरोजगारी आहे या केन्सच्या युक्तिवादाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. महागाई व बेरोजगारी म्हणून ओळखल्या जाणार्या अर्थव्यवस्थेत एकाच वेळी चलनवाढ आणि बेरोजगारीच्या अस्तित्वाच्या समस्येला केन्स नंतरच्या अर्थशास्त्रात देखील प्रमुख स्थान आहे, या घटकामध्ये चलनवाढजन्य मंदी समस्येवर चर्चा केली गेली आहे.

## ८.३ मिल्टन फ्रीडमनची पैशाची मागणी

### ८.३.१ प्रस्तावना

पैशाच्या सनातनवादी चलन संख्यामान सिध्दांतावर केंब्रिजच्या अर्थशास्त्रज्ञांनी विशेषतः केन्सने टीका केली होती. त्यांनी असा युक्तिवाद केला की सनातनवादी सिध्दांत हा मौद्रिक सिध्दांत आणि मूल्य सिध्दांत आणि व्याज दर निर्धारण सिध्दांत यांना आर्थिक सिध्दांताशी जोडून पैशाच्या प्रमाण सिध्दांताची पुनर्रचना केली. केन्सच्या पैशाच्या सिध्दांताला व्यापक मान्यता मिळाली. पण शिकागो विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञांचा एक गट पैशाच्या पारंपारिक प्रमाण सिध्दांतावर काम करत होता. शिकागो विद्यापीठात, मिल्टन फ्रीडमन हेन्री सायमन्स, लॉयड मिंट्स, फ्रॅंक नाइट आणि जेकब व्हिनर सारख्या विद्वानांनी पैशाच्या प्रमाण सिध्दांताची एक संबंधित आवृत्ती विकसित केली. त्यांनी सामान्य किंमत पातळीसह प्रमाण सिध्दांत पैसा एकत्रित केला. मिल्टन फ्रीडमन यांनी १८५६ मध्ये " पैशाचे प्रमाण सिध्दांत - A Restatement" मध्ये एक लेख प्रकाशित केला. पैशाच्या प्रमाण सिध्दांताच्या नवीन आवृत्तीच्या प्ररुपावर लेखात चर्चा केली गेली. लेखाच्या प्रकाशनासह, मुद्रावादी क्रांती लक्षणीयरीत्या मजबूत झाली. मिल्टन फ्रीडमनचा पैशाच्या मागणीचा सिध्दांत अंशतः केन्सच्या विचारांवर आधारित आहे कारण तो पैशाची मागणी हा भांडवलाच्या सिध्दांताचा एक भाग मानतो परंतु मिल्टन फ्रीडमनचा सिध्दांत केन्सने मानल्याप्रमाणे पैसे ठेवण्याच्या हेतूंचे वर्गीकरण घेत नाही.

### ८.३.२ फ्रीडमनचा सिध्दांत

मिल्टन फ्रीडमन यांनी त्यांच्या चलन संख्यामान सिध्दांत पुनरावृत्तीमध्ये पैशाला एक प्रकारची मालमत्ता मानली. पैशाची मागणी ही उपभोग सेवेच्या मागणीइतकीच आहे. तो वास्तव रोख शिलकीची संख्या (M/P) एक वस्तू मानतो. त्याची मागणी केली जाते कारण ती त्याच्या मालकीच्या व्यक्तीसाठी उपयुक्त आहे. आर्थिक एजंट जसे की घरे, कंपन्या आणि सरकार त्यांच्या संपत्तीचा एक विशिष्ट भाग पैशाच्या रुपात ठेवू इच्छितात. अशा प्रकारे. पैसा ही एक मालमत्ता किंवा भांडवल आहे ज्याचा सकारात्मक परतावा असतो. म्हणून फ्रीडमनची पैशाच्या सिध्दांताची मागणी हा संपत्ती सिध्दांताचा एक भाग आहे. फ्रीडमन संपत्तीसाठी प्रतिनिधी म्हणून कायमस्वरुपी कमाई घेतो.

### ८.३.३ पैशाच्या मागणीचे कार्य

फ्रीडमनच्या मते, पैशाची मागणी पैसा रोख ठेवण्यासाठी असते. तो असे प्रितपादन करतो की पैसा ही एक प्रकारची संपत्ती ठेवतात. व्यक्ती व्यवहारासाठी पैसे ठेवतात. पैसा क्रयशक्ती म्हणून काम करतो आणि वस्तू आणि सेवा खरेदी करण्यासाठी देखील ते खूप सोयीचे आहे. पैशाच्या मागणीकडे त्याचा दृष्टिकोन पैसे ठेवण्याच्या इतर कोणत्याही हेतूंचा विचार करत नाही.

मिल्टन फ्रीडमनच्या मते संपत्तीचे पाच वेगवेगळे रुप आहेत, पैसा, रोखे, समभाग, भौतिक वस्तू आणि मानवी भांडवल . संपत्तीच्या प्रत्येक प्रकारात विशिष्ट गुण असतात आणि ते परतावा देतात.

**१. पैसा -** यामध्ये चलन, मागणी ठेवी आणि मुदत ठेवी यांचा समावेश होतो ज्यात ठेवींवर व्याज मिळते. पैसे धारकाला प्रवेशयोग्यता, सुरक्षितता इत्यादी स्वरुपात वास्तविक परतावा देखील देतात.

**२. रोखे -** रोखे हे सिक्युरिटिज आहेत जे व्याज उत्पन्न देतात, नाममात्र अटींमध्ये निश्चित केले जातात. रोख्यांवरील उत्पन्न म्हणजे व्याज दर आणि बाजारातील व्याजदरातील अपेक्षित भांडवली नफा किंवा तोटा होतो.

**३. समभाग -** वास्तविक एककामध्ये निश्चित केलेल्या देयकाच्या वेळेचा दावा आहे. समभागातून मिळणारा परतावा हा लाभांशाचा दर, अपेक्षित भांडवली नफा किंवा तोटा आणि किंमत पातळीतील अपेक्षित बदलांवरुन निश्चित केला जातो.

**४. भौतिक वस्तू -** भौतिक वस्तू किंवा मानवतेवर वस्तू  हे उत्पादक आणि ग्रहक यांचे टिकाऊ वस्तूंचे  साठे आहेत.

**५. मानवी भांडवल -** शिक्षण, कौशल्य किंवा चांगले आरोग्य यासारखी मनुष्याची उत्पन्न-उत्पादक क्षमता आहे.  पहिल्या चार प्रकारांना गैर-मानवी संपत्ती म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे तर शेवटची मानवी संपत्ती आहे. गैर-मानवी संपत्तीचे रुपांतर पैशात सहज करता येते. मानवी सहजासहजी संपुष्टात येऊ शकत नाही.

संपत्ती खालीलप्रमाणे प्रतीकात्मक शब्दात व्यक्त केली जाऊ शकतेः

$W = \frac{y}{r}$ Where W - एकूण संपत्तीचे वर्तमान मूल्य, y -  पाच प्रकारच्या संपत्तीतून अपेक्षित उत्पन्नाचा एकूण प्रवाह, r- व्याज दर

### ८.३.४ पैशाच्या मागणीचे निर्धारक

केन्सची पैशाची मागणी ही उत्पन्नाची पातळी आणि व्याजदर यांचे कार्य आहे. परंतु फ्रीडमनचा सिध्दांत असे समर्थन करतो की पैशाची किंवा मालमत्तेची  मागणी खालील घटकांद्वारे निर्धारित केली जाते.

**१. एकूण संपत्ती :** एखाद्या व्यक्तीच्या संपत्तीचा एकूण साठा हा फ्रीडमनच्या पैशाच्या मागणीचा एक महत्तवाचा निर्धारक आहे. एखाद्या व्यक्तीची संपत्ती जितकी जास्त ओल तितका पैसा व्यवहारासाठी आणि आणखी एका उद्देशासाठी मागितला जातो. फ्रीडमनने संपत्तीचा निर्देशांक म्हणून कायमस्वरुपी उत्पन्नरचे सवलत मूल्य वापरले. कायमस्वरुपी मिळकत म्हणजे व्यक्तीच्या जीवनकाळात संपत्तीतून मिळणारे अपेक्षित उत्पन्नहोय.

**२. मानवी ते गैर-मानवी संपत्तीचे प्रमाणः:** मानवी संपत्तीचे प्रमाण (कायमस्वरुपी उत्पन्न) हा पैशाची मागणी ठरवण्यासाठी एक महत्त्वाचा घटक आहे. मानवतेवर संपत्ती आणि संपत्तीचे गुणोत्तर किंवा संपत्ती आणि उत्पन्नाचे गुणोत्तर आहे. परंतु फ्रीडमने आपल्या स्थायी उत्पन्नाच्या गृहीतकात असे सुचवले की मानवी संपत्तीतील सीमांत उपभोग प्रवृत्ती कमी आहे. म्हणूनच, मानची संपत्ती आणि गैर-मानवी संपत्तीचे गुणोत्तर जरी प्रसंगिक असले तरी, फ्रिडमॅनच्या भूमिका बजावत नाही.

**३. पैसे आणि इतर आर्थिक मालमत्तेवरील परताव्याचा अपेक्षित दरः:** पैशाची मागणी करणार्या इतर सिध्दांतांच्या विपरीत, फ्रीडमन पैशाची विस्तृत व्याख्या घेतात. त्यात मागणी ठेवी आणि चलनासह मुदत ठेवी समाविष्ट आहेत. त्यामुळे , पैशाला इतर प्रकारच्या मालमत्तेप्रमाणेच नाममात्र परतावा अपेक्षित आहे. एखाद्या व्यक्तीचे कासमस्वरुपी उत्पन्न स्थिर असल्याने त्याची संपत्ती स्थिर असते. पैसे आणि इतर आर्थिक मालमत्ता या निश्चित संपत्तीतून त्यांचा वाटा मिळविण्यासाठी स्पर्धा करतात. दुसर्या शब्दांत, पैशाचे किंवा इतर आर्थिक मालमत्तेचे प्रमाण इतर मालमत्ता जसे की रोखे, पैशाच्या समभाग ठेवण्यासाठी प्रेत्साहनद्वारे निर्धारित केले जाते. जर आर्थिक मालमत्तेवर परतावा उदाहरणार्थ रोखे व समभाग जास्त असेल तर पैशाची मागणी कमी असेल. परंतु जर रोखे व समभाग सारख्या इतर आर्थिक मालमत्तेवरील परतावा कमी असेल तर पैशाची मागणी जास्त असेल.

**४. किंमत आणि अपेक्षित चलनवाढः** चलनवाढीचे पैशाच्या मागणीवर दोन विपरीत होतात. चननवाढीमुळे पैशाची क्रयशक्ती कमी होते. परिणामी, एखाद्या व्यक्तीला जास्त पैसा शिल्लक ठेवायचा असेल जेणेकरुण तो पूर्वीप्रमाणेच क्रयशक्ती राखण्यास सक्षम असेल. परंतु चलनवाढीमुळे, वास्तव मालमत्ता, सोने इत्यादी सारख्या गैर-मानवी मालमत्तेवरील साक्षेप परताव्यामध्ये वाढ झाली आहे, परिणामी, लोक कमी पैसे ठेवतील आणि उच्च-उत्पादक गैर-मानवी मालमत्तांमध्ये गुंतवणूक करतील. त्यामुळे पैशाची मागणी यावर अवलंबून असते.

**५. इतर चलः:** चव आणि पसंती, जागतिक आर्थिक संकटासारखी अपेक्षित आर्थिक अस्थिरता, व्यापार चक्राचे टप्पे, इ. आणि वेतन देयकाची पध्दत, बिलांची इेयके यासारखे संस्थापक घटक पैशाच्या मागणीवर परिणाम करतात.

### ८.३.५ पैशाच्या मागणीसाठी फ्रीडमनचे समीकरणः

$$\frac{Md}{p} = f(y_p, w, (R_b - R_m), (\mathrm{R_e} - R_m), (\pi^e - R_m))$$

समीकरणात

$\frac{Md}{p}$ -वास्तव रोख पैशाची मागणी

$f$ - कार्यात्मक संबंध

$y_e$ -वास्तविक कायम उत्पन्न

$w$ - मानवी संपत्ती आणि अमानवी संपत्तीचे गुणोत्तर

$R_m$ - पैशातून नाममात्र परतावा अपेक्षित आह

$R_b$ - रोख्यांमधून अपेक्षित नाममात्र परतावा

$R_e$ - समभागातून नाममात्र परतावा अपेक्षित आहे

$\pi^e$ - महागाईचा अपेक्षित दर

$z$ - वास्तविक पैशातून मिळणार्या उपयोगितेवर परिणाम करण्याची शक्ती असलेले इतर कोणतेही चल

फ्रिडानच्या मते, वास्तव शिल्लक पैशची मागणी वाढते जेव्हा कायमस्वरुपी उत्पन्न वाढते आणि अपेक्षित परतावा मिळाल्यावर घटते, पैशांवरील अपेक्षित नाममात्र परताव्याचा तुलनेत रोखे व समभाग किंवा मालमत्ता वाढतात.

हे खालील आकृतीच्या मदतीने सूचित केले आहे.

आकृती - १




**आकृती क्र. ८.१**

आकृती. १ मध्ये पैशांची शिल्लक X - वर दर्शविली आहे तर व्याजदर Y - अक्षावर दर्शविला आहे. MD म्हणजे पैशाची मागणी . व्याजदरातील बदलांमुळे पैशाच्या मागणीवर फारच कमी परिणाम होतो. व्याजदरात बदल होत असताना, पैशाच्या दीर्घकालीन मागणीतील बदल नगण्य आहे. फ्रीडमनने पैशाच्या मागणीचा सिध्दांत म्हणून प्रमाण सिध्दांताचा प्रस्तावना करुन दिला आणि पैशाची मागणी ही मालमत्ता किंमती किंवा साक्षेप

परतावा आणि संपत्ती किंवा उत्पन्न यावर अवलंबून असते असे गृहीत धरले आहे. तो असे दाखवतो की पैशाच्या मागणीचा सिध्दांत हा किमती आणि उत्पादताचा सिध्दांत बनतो.

तो असा युक्तीवाद करतो की पैशाच्या साठ्यातील बदलामुळे किंमत किंवा उत्पन्न किंवा दोन्ही एकाच दिशेने बदलतात. याचा अर्थ असा होतो की जर अर्थव्यवस्थेचीपातळीपूर्ण रोजगारापेक्षा कमी असेल तर, पैशाच्या पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे उत्पादन आणि रोजगारात वाढ होईल कारण अल्प कालावधीत खर्च वाढेल,. पैशाच्या पुरवठ्यातील बदल दीर्घकाळासाठी पैशांच्या शिलकीवर परिणाम करु शकत नाहीत. पूर्ण  रोजगार स्तरावर, पैशाचा पुरवठा वाढल्याने किमती वाढतील.

### ८.३.६ टीकात्मक मूल्यांकन

**१. पैशाची अतिशय व्यापक व्याख्या-** फ्रीडमनच्या अतिशय व्यापक व्याख्येमध्ये चलन आणि मागणी ठेवी M१) आणि व्यावसायिक बँकांमधील मुदत ठेवी (M२) त्याच्या पैशाच्या व्याख्येत समाविष्ट आहेत. त्याची व्यापक व्याख्या सुचित करते की पैशाच्या मागणीची व्याज लवचिकता नगण्य आहे. उदाहरणार्थ, मुदत ठेवींवरील व्याजदर वाढल्यास, मुदत ठेवींची मागणी  (M२) वाढेल. परंतु चलन आणि मागणी ठेवींची मागणी (M१) कमी होईल. परिणामी, व्याजदराचा एकूण परिणाम पैशाच्या मागणीवर नगण्य असेल. पुढे, फ्रीडमनच्या विश्लेषणात ठेवींसाठी दीर्घकालीन आणि अल्प –मुदतीच्या व्याजदरांमध्येकोणताही फरक पडत नाही. पुढे, फ्रीडमनच्या विश्लेषणात ठवींसाठी दीर्घकालीन आणि अल्प –मुदतीच्या व्याजदरांमध्ये कोणताही फरक पडत नाही. मागणीठेवीसाठी (M१), अल्प मुदतीचा व्याज दर श्रेयस्कर आहे, परंतु दीर्घकालीन व्याजदर मुदत ठेवींसाठी (M२) अधिक योग्य आहे.

**२. पैसा, सुख-सोयीची वस्तू नाही-** फ्रीडमनने पैशाला वस्तू मानले. भहुधा त्याचा सिध्दांतानुसार पैशाला पैशाच्या व्याख्येत मुदत ठेवींचा समावेश केल्यामुळे एक विलासी वस्तू मानली गेली होती. त्याने पैशाच्या कल्पनेत मुदत ठेवींचा समावेश केला कारण त्याने ओ निरीक्षण केले की अमेरिकेत उत्पन्नापेक्षा जास्त पैसा पुरवठा आहे. पण इंग्लंडच्या परिस्थितीत असे निरिक्षण चुकीचे ठरले.

**३. संपत्ती चलाला जास्त महत्त्व-** फ्रीडमनच्या पैशाच्या मागणीच्या कार्यामध्ये, संपत्तीची चले मिळकतीसाठी इष्ट आहेत. या प्रकरणात, संपत्ती आणि उत्पन्नाच्या चलांचे एकाचवेळी स्वाकारार्यहोणे कांही अर्थशास्त्रज्ञांना मान्य नाही. उदाहरणार्थ , जॉन्सन स्पष्ट करतात की मिल्टन फ्रीडमनच्या सिध्दांतातील उत्पन्न हा संपत्तीवर परतावा आहे, तसेच संपत्ती हे उत्पन्नाचे वर्तमान मूल्य आहे. व्याज दराची उपस्थिती आणि पैशाच्या मागणीतील या चलांपैकी एक चल इतर चलाला निरर्थक बनवते.

**४. पैशाच्या मागणीचे खूप महत्त्व-** फ्रिडमन यांनी पैशाचा पुरवठा अस्थिर असल्याचे वर्णन केले आहे कारण ते चलनविषयक अधिकार्यांद्वारे निश्चित केले जाते आणि बदलले जाते. परंतु पैशाच्या पुरवठ्यामध्ये बँक कर्जामध्ये बदल करुन तयार केलेल्या बँक ठेवी असतात. बँक राखीव निधीद्वारे निर्धारित केले जाते जे बँकेतर वित्तीय मध्यस्थांद्वारे ठेवी आणि चलन काढणे यांचा विसतार करतात आणि करार करतात; व्यापारी बँकांकडून घेतलेले कर्ज आणि परदेशातून पैशांचा ओघ आणि बहिर्गमनमध्यवर्ती बँकेद्वारे खरेदी सिक्युरिटीजची

खरेदी आणि विक्री यांचा समावेश होतो. पण फ्रिडमन फक्त पैशाचा पुरवठा हा एक बाह्य घटक मानतो तो अवास्तव आहे.

**५. वेळ घटक विचारात घेत नाही-** फ्रिडमन वेळेचे परिणाम निर्दिष्ट करत नाही. चलांमध्ये फरक होण्यासाठी लागणारा वेळ आणि समायोजनासाठी लागणारा वेळ निर्दिष्ट केलेला नाही.

**८.३.७ सारांश :** मिल्टन फ्रीडमन यांनी पैसा हे उपभोग्य वस्तू म्हणून आणि पैशाची मागणी म्हणजे उपयुक्तता असलेल्या कोणत्याही ग्रहक टिकाऊ वस्तूंच्या मागणीची थेट विस्तार म्हणून विश्लेषण केले. त्यांच्या मते. व्यक्ती रोख व्यवहारासाठी पैसे ठेवतात. पैसा क्रयशक्ती म्हणून काम करतो आणि वस्तू आणि संवा खरेदी करण्यासाठी देखील ते खूप सोयीस्कर आहे. पैशांच्या मागणीकडे त्याचा दृष्टीकोन पैसा ठेवण्याचे इतर हेतू विचारात घेत नाही. त्याच्या सिध्दांतानुसार संपत्ती हा मागणीचा एक महत्त्वाचा निर्धारक आहे. तो संपत्तीचे मानवी आणि गैर-मानवी संपत्तीमध्ये वर्गीकरण करतो परंतु संपत्तीयाठी प्रितनिधी म्हणून कायमस्वरुपी उत्पन्न घेतो. फ्रीडमनची पैशाची स्थिर मागणी हे वैयक्तिक ग्रहकांच्या कायम उत्पन्नाचे कार्य आहे. फ्रिडमनच्या मते, वास्तव रोख पैशाला मागणी वाढते तेव्हाकायमस्वरुपी उत्पन्न वाढते आणि रोखे, समभाग किंवा इतर मालमत्तेवरील अपेक्षित परतावा हा पैशाच्या नाममात्र परताव्याचा अपेक्षेच्या तुलनेत वाढतो तेव्हा पैशाची मागणी घटते. तो असा युक्तिवाद करतो की पैशाच्या साठ्यातील बदलामुळे किंमत पातळी किंवा उत्पन्न किंवा दोन्ही एकाच दिशेने बदलतात. याचा अर्थ असा होतो की जर अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगारापेक्षा कमीपातळी असमल, तर पैशाच्या पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे उत्पादन आणि रोजगारात वाढ होईल कारण अल्पावधीतच खर्च वाढेल. पैशाच्या पुरवठ्यातील अदल दीर्घकाळासाठी पैशांच्या शिलकीवर करु शकत नाहीत.

## ८.४ फिलिप्स वक्र

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांचा पूर्ण रोजगार समतोल यावर विश्वास होता. केन्सने या कल्पनेचे खंडन केले आणि सांगितले की पूर्ण रोजगार पातळीपेक्षा कमी पातळीला अर्थव्यवस्था समतोल साधू शकते. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील प्रध्यापक ए.डब्ल्यू. फिलिक्स यांनी आकडेवारीचे विश्लेषण केले आणि १८५८ मध्ये बेरोजगारी आणि महागाई यांच्यातील संबंधांबद्दल एक विकसित केला. त्यांनी १८६१ ते १८५७ पर्यंत इंग्लंडमधील बेरोजगारी दर यांच्यातील संबंधांचे निरीक्षण करुन. त्यांनी चलनवाढ आणि बेरोजगारी यांच्यातील संबंध स्पष्ट केले. चलनवाढ आणि बेरोजगारी यांचा परस्पर/नकारात्मक संबंध आहे. चलनवाढीचा दर जास्त असेल तर बेरोजगारीचा दर कमी बेरोजगारीच्या कमी दराला उच्च प्रमाणात चलनवाढ असते.

कमी बेरोजगारी म्हणजे कामगारांची जास्त मागणी. कमी बेरोजगारीमध्ये जेव्हा कामगारांची जास्त मागणी असते तेव्हा वेतन वाढते. मजुरी वाढल्याने उत्पन्न आणि चलनवाढ वाढते. त्यामुळे, बेरोजगारीच्या निम्न स्तरावर. उच्च चलनवाढीचा दर आहे. चलनवाढ आणि बेरोजबारी यांच्यातील व्यस्त संबंध सूचित करते की सरकार एकाच वेळी कमी चलनवाढ आणि बेरोजगारी कमी करु शकत नाही. १ कमी चलनवाढ साध्य करण्यासाठी उच्च

बेरोजगारी स्वीकारणे आवश्यक आहे. किंवा २ कमी बेरोजगारी आणि चलनवाढ यांच्यातील संबंध फिलिप्स वक्र द्वारे दर्शविला जातो




**आकृती क्र. ८.२**

आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे, फिलिप्स वक्र बेरोजगारी आणि चलनवाढ यांच्यातील व्यस्त संबंध दर्शविते. उदाहरणार्थ, जेव्हा चलनवाढीचा दर ठीक असतो तेव्हा बेरोजगारीची पातळी OL१ असते. याचा अर्थ, कमी महागाई दरात. बेरोजगारीचा दर जास्त आहे. दुसर्या शब्दांत, कमी चलनवाढीचा दर साध्य करण्यासाठी सरकारणे उच्च बेरोजगारीचादर स्वीकारला पाहिजे.

पण दुसरीकडे, जेव्हा चलनवाढीचा दर जास्त असतो, म्हणजे Ok१, बेरोजगारीचा दर OL इतका कमी असतो. याचा अर्थ असा होतो की सरकारला बेरोजगारीचा दर नियंत्रणात ठेवायचा असेल तर चलनवाढीचा उच्चांक स्वीकारला पाहिजे.

फिलिप्स वक्र चलनवाढ आणि बेरोजगारी यांच्यातील व्यापारसंबंध दर्शविते. हे असेही सूचित करते की कमी बेरोजगारासहअर्थव्यवस्थांमध्ये कमी महागाई असू शकत नाही. उच्च बेरोजगारी दराच्या किंमतीवर कमी चलनवाढीचा दर गाठला जातो. अप्रत्यक्षपणे फिलिप्स वक्र असे सूचित करतो की, जर अर्थव्यवस्था क्षमतेपेक्षा कमी काम करत असेल, तर एकूण मागणी (C+I+G) वाढल्याने बेरोजगारीचा दर कमी होतो.

पॉल सॅम्युएलसन आणि रॉबर्ट सोलोवोसारख्याअर्थशास्त्रज्ञांनी १८६०-६१ या वर्षांतील अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या आकडेवारीचे निरीक्षण केले आणि धोरणात्मक फिलिप्स वक्र सिध्दांतावर टीका केली.

### ८.४.१ दीर्घकालीन फिलिप्स वक्र

मिल्टन फ्रीडमन आणि एडमंड सारख्याअर्थशास्त्रज्ञांच्या मते, कामगार वास्तविक वेतन आणि चलनवाढ समायोजित पैशाची मजुरी विचारात घेतात. त्यामुळे सरकारला किमान दीर्घकालीन उच्च चलनवाढीसह कमी बेरोजगारी मिळू शकत नाही.




**आकृती क्र. ८.३**

एडमंड फेल्प्स सारख्या अर्थशास्त्रज्ञांच्या मते, दीर्घकाळ चालणारी फिलिप्स वक्र ही रेखाचित्रात दर्शविलेली उभी सरळ रेषा आहे. अल्पावधीत, खाली उतरलेल्या फिलिप्स वक्र SPC१ द्वारे दर्शविल्याप्रमाणेबेरोजगारीचा दर आणि चलनवाढ यांच्यात एक व्यस्त संबंध आहे. वक्र असे सूचित करते की OK ते OK१ (किंवा विस्तारीत चलनविषयक धोरणाद्वारे) उच्च चलनवाढीचा दर स्वीकारुन बेरोजगारीचा दर OL१ वरुन OLपर्यंत कमी केला जाऊ शकतो परंतु तो केवळ अल्प कालावधीत, लोकांना सध्याच्या किमतीच्या बरोबरीने किमती वाढवण्याची अपेक्षा आहे. फिलिप्स वक्रउजवीकडे सरकतो. SPC२ नवीन फिलिप्स वक्र बनतो. लोक महागाईची अपेक्षा करतात. चलनवाढीचा दर OK वरुन OK१ पर्यंत वाढतो, पांतु बेरोजगारीच्या दरात कोएताही बदल/घट झालेला नाही. दीर्घकाळत, फिलिप्स वक्र ही उभी सरळ रेषा बनते. आकृतीमध्ये , LPC हा दीर्घकाळ चालणराफिलिप्स वक्र आहे. तो हे सूचित करतो का दार्घकालीन आर्थिक विस्तार किंवा चलनवाढीचा दर स्वीकारणे, बेरोजगारीची पातळी कमी करण्यासाठी किंवा रोजगार वाढवण्यासाठी कार्य करणार नाही. दीर्घकाळात महागाई दर आणि बेरोजगारी दर यांच्यात कोणताही व्यापार नाही.

## ८.५ मॅनकीवचे नवीन केन्सीयन प्रारुप

### ८.५.१ प्रस्तावना :

केन्सचे नवीन अर्थशास्त्र ही आधुनिक समग्र अर्थशास्त्राची एक शाखा आहे जी केन्सच्या विचारांवर आधारित आहे. केन्सच्या विचारांनी १८३० ते १८७० पर्यंत जगावर प्रभाव टाकला परंतु काही नवीन शास्त्रीय अर्थशास्त्रज्ञांनी केन्सच्या सिध्दांताच्या अनेक विश्वासांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. केन्सच्या विचारसरणीत फेरबदल करुन नवीन सनातन वाद्यांच्या समालोचनांना प्रितसाद देणार्या अर्थशास्त्रज्ञांना नवीन केन्सीयनविचार म्हणतात.

नवीन सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी वेतन आणि किंमती लवचिक असतात. या गृहितकावर आधारित त्यांचा स्थूल आर्थिक सिध्दांत विकसित केला. त्यांच्या मते बाजारातील किमती त्वरीत समायोजित करुन मागणी आणि पुरवठा संतुलित करतात. परंतु

नवीनकेन्सच्याविचारांच्या अर्थशास्त्रज्ञांच्या मते, बाजार समाशोधन प्ररुप अल्पकालीन आर्थिक चढउतार स्प्ष्ट करु शकत नाहीत. त्यांनी चिकट / ताठर वेतन किंमतीच्या सिध्दांताना समर्थन दिले. त्यांचे म्हणणे आहे की वेतन आणि किंमतीचा चिकटपणा / ताठरता अनैच्छिक बेरोजगारीचे अस्तित्व आणि अर्थव्यवस्थेवरआर्थिक धोरणाचा मजबूत प्रभाव स्पष्ट करु शकते. जॉर्ज मॅनकीव, रॉबर्ट गॉर्डन, डेव्हिड रोमर, आमिलव्हर ब्लँचार्ड लॉरेन्स समर्स, जोसेफ स्टिग्लिट्झ आणि बुरस ग्रीनवाल्ड हे काही प्रमुख नवीन केन्सीयनविचारांचे अर्थशास्त्रज्ञ आहेत.

केन्सच्याप्ररुपाने अनैच्छिक बेरोजगारीवर आणि उत्पादन आणि रोजगार निश्चित करण्यासाठी एकूण मागणीच्या भूमिकेवर जोर दिला. नवीन केन्स विचारांचा अर्थशास्त्रज्ञांनी अनैच्छिक बेरोजगारीचे अतिरिक्त स्पष्टीकरण दिले आहे. एन. ग्रेगरी मॅनकीव आणि डेव्हिड रोमर हे मुख्य योगदानकर्ते आहेत. त्यांनी केन्सच्या प्रणालीमध्ये हा सूक्ष्म आर्थिक पाया एकत्र करण्याचा प्रयत्न केला.

### ८.५.२ मॅनकीवचे नामपात्र किंमत चिकटपणा/ ताठरप्ररुप :

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांचा किमतीतील लवचिकतेच्या गृहीतकावर विश्वास होता. लवचिक किमती बाजारात समतोल आणू शकतात. पण नवीन केन्स विचारांच्या अर्थशास्त्रज्ञांच्या मते, किंमती चिकट /ताठर आहेत. त्यांचा असा युक्तीवाद आहे की किंमत सूचीच्या किंमती हे चिकटपणाचे /ताठरते कारण आहे. ग्रेगरी मॅनकीव त्याच्या लेखात (लहान किंमतसूची खर्च आणि मोठे व्यवसाय चक्र) मक्तेदारीचे एक समग्र अर्थशास्त्रीय प्ररुप ने दावा केला की किंमत समायोजित करणे कठीण आहे. किंमतसूची खर्च म्हणजे किंमती बदलण्याचा खर्च होय. मॅनकीवच्या मते.बाजार लवकर स्पष्ट होत नाहीत (किंमतीतील समायोजनाद्वारे समतोल साधणे) कारण किंमती समायोजित करणे कठीण आहे. किंमत चिकटपणाचा / ताठरतेचा सिध्दांत खालील गृहितकांवर आधारित आहे.

### ८.५.३ गृहीतके :

१. बाजार अवूर्ण आहे आणि तेथे मोठ्या प्रमाणात मक्तेदारी असलेल्या स्पर्धात्मक कंपन्या आहेत.

२. उत्पादन संस्था प्रमाणित किंवा भिन्न उत्पादने तयार करतात.

३. बहुसंख्य कंपन्या त्यांच्या उत्पादनांच्या किंमतीवर ठेवणार्या किंमतरकर्त्या आहेत.

४. किंमत समायोजनासाठी खर्च समाविष्ट आहे.

५. कंपन्यांमध्ये रेखीय मागणी वक्र असतात.

६. सीमांत खर्च वक्र क्षितिजसमांतर आहे.

या गृहितकांवर आधारित, असा युक्तीवाद केला गेला आहे की किंमत सूचीच्या किंमती कंपन्यांच्या किंमती आणि प्रमाणावर परिणाम करतात. जेव्हा कंपन्या किंमती बदलतात, तेव्हा त्यात नवीन किंमत सूची (मेनू) छापणे यासारख्या खर्चाचा समावेश होतो, जरी असे

munotes.in

खर्च कमी असले तरी ते कंपन्यांक्ष्या किंमतीवर आणि उत्पादनावर परिणाम करतात. मॅनकीव सुचवतात की कमी कालावधीत किमती स्थिर ठेवून मागणीतील लहान बदलांवर प्रितिक्रया देणे कंपन्यांसाठी फायदेशीर आहे. या प्रकरणात, कंपन्या उत्पादन बदलून प्रितसाद देऊ शकतात. खालील आकृतीच्या साहाय्याने गृहीतक स्पष्ट केले जाऊ शकते.




**आकृती क्र. ८.४**

वरील आकृतीमध्ये, मुळ मागणी वक्र D० आहे, D१ मागणीत घट दर्शवते. MR० मूळ सीमांत प्राप्ती वक्र आहे. MR१ हा वक्र मागणी कमी झाल्यामुळे सीमांत प्रप्ती वक्रातील घट सूचित करतो. MC१ हा नवीन सीमांत खर्च वक्र आहे. OP० ही मूळ किंमत आहे. जेव्हा MR०, P० किंमत आणि OQ१ उत्पादन परिणाम यांना छेदतो . तेव्हा उत्पादनसंस्था AEKP० नफा कमावते. मागणी कमी झाल्यामुळे, D१ हा नवीन मागणी वक्र बनतो. MR१ हा नवीन सीमांत प्राप्ती वक्र आहे. हे बिंदू इ वर सीमांत खर्चाला छेदते. F OP१ वर नवीन किंमत बनते आणि OQ२ हे नवीन प्रमाण आहे. नफा KFCP१ होतो. जर किंमत सूचीची किंमत जास्त असेल, तर कंपन्या किंमत OP० ठेवतील आणि उत्पादन OQ१ वर ठेवतील. उत्पादन संस्थेचा नफा KGBP० असेल. KFCDP२ नफा KFCP१ (KEDP२>KFCP१) पेक्षा जास्त असेल पण कंपन्या OP२ पर्यंत किंमत कमी करतील. कंपन्या किंमत कमी करणार नाहीत म्हणून OP० वर किमतीत कठोरता/ ताठरता असेल.

ही परिकल्पना देखील किंमत कपातीचा व्यापक आर्थिक परिणाम स्पष्ट करते. किंमतीत घट झाल्याने अर्थव्यवस्थेतील इतर कंपन्यांना फायदा होतो. जेव्हा उत्पादन संस्थेद्वारे किंमत कमी केली जाते, तेव्हा सरासरी किंमत कमी जाते. तेव्हा सरासरी किंमत पातळी थोडी कमी होते ज्यामुळे ग्रहकांचे वास्तविक उत्पन्न वाढेल. वास्तविक उत्पन्न वाढल्याने बाजारपेठेतील सर्व कंपन्यांच्या उत्पादनांची मागणी वाढेल. बाजारातील सर्व कंपन्यांच्या मागणीवर एखाद्या उत्पादन संस्थेद्वारे किंमत समायोजनाच्या या व्यापक आर्थिक प्रभावाला मॅनकीवद्वारे एकूण मागणी बाह्यता म्हणतात.

### ८.५.४ टीका

गृहीतकांवर खालील कारणांवरुन टीका केली आहे.

१. हा दृष्टीकोन उत्पादनाच्या प्रमाणात समायोजनाकडे दुर्लक्ष करतो. हा सिध्दांत किंमतीतील जोर देतो. उत्पादन समायोजनांवर अर्थव्यवस्थेला समतोल आणण्याचा अपेक्षित परिणाम देखील साध्य होतो.

२. असे गृहीत धरण्यात आले आहे की मागणी बदलत असताना सीमांतकिंमतीत त्याच प्रमाणात बदल होतो, परंतु प्रत्यक्षात, सीमांत खर्च एकूण मागणीशी पूर्णपणे संबंधित नाही.

३. हे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की किंमतसूचीचा खर्च कमी आहे आणि आधुनिक काळात डिजिटल क्रांतीमुळे ती आणखी कमी झाले आहेत.

४. हा सिध्दांत किमतीच्या चिकटपणाचे / ताठरतेचे स्पष्टीकरण देतो, परंतु ते किंमतीच्या दराच्या चिकटपणाकडे/ताठरतेकडे दुर्लक्ष करतो.

५. कांही अर्थशास्त्रज्ञ असहमत आहेत की कमी किंमत सूची किंमतींचा चिकटपणा/ताठरपणा स्पष्ट करु शकते. खर्च खूपच कमी आहेत आणि ते मंदी आणि नैराश्य यासारख्या परिस्थितीचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही.

## ८.६ चलनवाढजन्य मंदी

लॉर्ड केन्सने त्याच्या सिध्दांतामध्ये प्रभावी मागणीच्या महत्त्वावर जोर दिला. त्यांच्या मते, बेरोजगारी कमी करण्याचा उपाय म्हणजे प्रभावी मागणी वाढवणे होय. फिलिप्सने बेरोजगारी आणि चलनवाढीची व्यस्त संकल्पना मांडली . त्यांनी पुढे स्पष्ट केले की, विशिष्ट प्रमाणात चलनवाढ स्विकारल्याशिवाय सरकार बेरोजगारी कमी करु शकत नाही. दुसर्या शब्दांत, जर चलनवाढ असेल तर अर्थव्यवस्थेत बेरोजगारीचे प्रमाण कमी असते.

परंतु अलीकडच्या काळात, अर्थव्यवस्थांना अशी परिस्थिती अनुभवायला मिळत आहे ज्यामध्ये किमतीची पातळी सतत वाढत असते परंतु बेरोजगारीची पातळी देखील वाढते. प्रेफेसर सॅम्युएलसन यांनी या परिस्थितीचे वर्णन चलनवाढजन्य मंदी असे केले आहे. त्यांच्या मते, ण्काच वेळी किमती आणि मजुरी यांमध्ये चलनवाढझाल्याने, लोकांना नोकर्या मिळत नाहीत आणि कंपन्या उत्पादित उत्पादनांसाठी ग्रहक शोधू शकत नाहीत. दुसर्या शब्दांत, चलनवाढजन्य मंदी ही अशी परिस्थिती आहे जिथे एकाच वेळी बेरोजगारी आणि चलनवाढ असते. भारत आणि जगातील इतर विकसनशील अर्थव्यवस्था चलनवाढजन्य मंदीच्या समस्येला तोंड देत आहेत. अशा अर्थव्यवस्थेत किमती सतत वाढत असतात पण त्याचवेळी अर्थव्यवस्थेत बेरोजगारी असते. चलनवाढजन्य मंदी ही एक आर्थिक घटना आहे जी जेव्हा महागाई जास्त असते आणि असते आणि आर्थिक वाढ कमी असते तेव्हा मोठ्या प्रमाणात बेरोजगारी असते.

चलनवाढजन्य मंदी = उच्च चलनवाढ + उच्च बेरोजगारी + कमी आर्थिक वाढ

चलनवाढजन्य मंदी अनेक कारणांमुळे होते. असे घटक पुरवठ्यावर परिणाम करतात जे आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे किमतींवर परिणाम करतात.




**आकृती क्र. ८.५**

आकृतीमध्ये एकूण मागणी वक्र आणि एकूण पुरवठा वक्र एकमेकांना Eबिंदूवर छेदतात आणि किंमत पातळी OP आहे आणि वास्तविक सकल राष्ट्रीय उत्पादन OY स्तरावर आहे. पुरवठा बाजूच्या घटकांमुळे (खर्च प्रेरित घटक) एकूण पुरवठा वक्र AS वरुन AS१ असा डावीकडे मागे सरकतो. एकूण मागणी वक्र AD स्थिर राहिल्यास नवीन एकूण पुरवठा वक्र AS१ मुळ एकूण मागणी वक्र AD ला समतोल बिंदू E१ वर छेदतो. जर पुरवठा बाजूचे घटक एकटेच काम करत असतील तर किंमत पातळी OP१ वर गेली असती आणि नंतर वास्तविक सकल राष्ट्रीय उत्पादन Y१ वर घसरले असते. परंतु मागणीच्या बाजूच्या घटकांमुळे एकूण मागणी वक्र देखील AD ते AD १ पासून उजवीकडे वर सरकते आता एकूण पुरवठा वक्र AD१ बिंदु E२ वर एकूण मागणी वक्र AD१ ला छेदतो. P२ ही किंमत वाढली आहे आणि वास्तविक सकल राष्ट्रीय उत्पादन Y२ वर किंचित वाढले आहे. ते हे दर्शविते की चलनवाढीसह मंदी आणि सकल राष्ट्रीय उत्पादनात मंद वाढ दिसून आली.

### ८.६.१ चलनवाढजन्य मंदीची कारणे आणि परिणाम :

**१ तेलाच्या किमतीत वाढ :** जेव्हा एखाद्या अर्थव्यवस्थेत इंधन तेल आणि इतर पेट्रोलियन उत्पादनांच्या किंमतीमध्ये अचानक वाढ होते. परिणामी उत्पादन खर्चात तीव्र वाढ होते आणि उत्पादित वस्तूंच्या किंमती वाढवतात तेव्हा मंदी येते . तेलाच्या किमतीत तीव्र वाढ झाल्यामुळे, एकूण पुरवठा वक्र डावीकडे सरकतो ज्यामुळे किंमती वाढवतात. आणि उत्पादनात घट होते. तेव्हा येथे चलनवाढ आणि बेरोजगारी दोन्हीचे अस्वित्व निर्माण होते.

**२ कृषी उत्पादनांचा तुटवडा :** जेव्हाअर्थव्यवस्थेला कृषी उत्पादनांची कमतरता जाणवते तेव्हा चलनवाढ होते. कृषी उत्पादनांच्या कमी पुरवठ्यामुळे कच्चा मालाच्या किमती वाढवतात. त्यामुळे उत्पादन खर्च वाढतो ज्यामुळे पुरवठ्यावर परिणाम होतो. यामुळे एकुण पुरवठा वक्र डावीकडे (मागे) सरकतो. परिणामीचलनवाढ वबेरोजगारीनिर्माण होते.

**३ रुपयाचे अवमूल्यन :** चलनवाढीचा आणखी एक घटक म्हणजे रुपयाचे अवमूल्यन. अवमूल्यनामुळे चलनाचे मूल्य कमी होते. रुपयाचे अवमूल्यन आयातीच्या किंमती वाढवते आणि जे उद्योग आयात केलेल्या वस्तूंचा उत्पादन घटक म्हणून वापर करतात त्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होते. हे एकूण पुरवठा वक्र डावीकडे किंवा मागे सरकवते कारण जास्त किमतीचा परिणाम पुरवठा कमीकरण्यात होतो आणि उत्पादनाच्या किंमती वाढवतात.

**४ जास्त कर :** जर सरकारने कर वाढवले तर उत्पादन खर्च वाढतो आणि दुसरीकडे उत्पादनात घट होते. हे पुरवठ्यावर परिणाम करु शकते आणि एकूण पुरवठा वक्र डावीकडे सरकवू शकते आणि पुढे अर्थव्यवस्थेत चलनवाढ निर्माण करु शकते.

**५ उच्च-व्याज दर :** जेव्हा व्याजाच्या दरांमध्ये वाढ होते तेंव्हाचलनवाढजन्य मंदीनिर्माण होते. यामुळे पुरवठ्यावर परिणाम करणार्या कंपन्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होते आणि त्यामुळे पुरवठा वक्र डावीकडे सरकतो ज्यामुळे चलनवाढीचा दर वाढवण्यास आणखी हातभार लागतो.

**६ प्रशासित किमतींमध्ये वाढ :** प्रशासित किंमती म्हणजे सरकारद्वारे निर्धारित केलेल्या किंमती पोलाद, कोळसा, सिंमेट , खत यांच्या प्रशासित किंमतीमध्ये वाढ झाल्याने उत्पादन खर्च वाढतो. जास्त किंमतीमुळे पुरवठ्यावर परिणाम होता आणि एकूण पुरवठा वक्र डावीकडे (मागे) सरकतो परिणामी उत्पादनाच्या किंमतीत झपाट्याने वाढ होते आणि चलनवाढीच्यादरात वाढ होते.

**७ मंद औद्योगिक वाढ :** चलनवाढजन्य बेकारी तेंव्हा आढळते जेव्हा आर्थिक विकासाची गती मंद असते.

**औद्योगिक क्षेत्राच्या संथ वाढीस जबाबदार असलेले महत्त्वाचे घटक हे खालीलप्रमाणे आहेतः**

१.उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या कच्च्या मालाच्या आयातीवर निर्बंध.

२. सार्वजनिक गुंतवणुकीत घट.

३. उच्च गुंतवणूक दर.

४. कर्जाची कमी उपलब्धता.

हे सर्व घटक उत्पादनातील वाढ कमी करतात. यामुळे औद्योगिक वाढ आणि चलनवाढीचा उच्च यामुळे मंदीची परिस्थिती निर्माण होते.

**८ किमतींद्दल अपेक्षा :** जर लोकांना अपेक्षा असेल की थोड्याच कालावधीतकिमंती वाढतील तेंव्हा लोक ताबडतोब उत्पादने खरेदी करण्याचा निर्णय घेतात आणि यामुळे एकूण मागणी निर्माण होते ज्यामुळे किंमतीत आणखी वाढ होते. कामगार संघटना चलनवाढीची भरपाई म्हणून वाढीव वेतनाची मागणी करतात. अशा चलनवाढीच्या अपेक्षांमुळे चलनवाढ आणि मंदी निर्माण होते.

**९ मौद्रिक धोरणे :** केंद्रीय बँकेची आर्थिक धोरणे अर्थव्यवस्थेत पत निर्माण करतात. यामुळे पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते ज्यामुळे अतिरिक्त मागणी होते आणि यामुळे एकूण मागणी वक्र उजवीकडे सरकतो आणि चलनवाढीचा दर आणखी वाढतो आणि अर्थव्यवस्था मंदावते. चलनवाढ होते.

तेलाच्या किमतीत झालेली वाढ. रुपयाचे अवमूल्यन , मंद औद्योगिक वाढ , प्रशासित किमतीत वाढ, चलनवाढीची अपेक्षा, इत्यादी हे पुरवठा – बाजूचे घटक आहेत जे एकूण पुरवठा वकग डावीकडे वळवतात आणि त्यामुळे मंदीसदृश्य स्थिती निर्माण होते.

**८.६.२ धोरणात्मक उपाय :**

अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढण्यासाठी सरकारने अशा उपायांचा अवलंब करणे आवश्यक आहे

१ वित्तीय तूट कमी करणे.

२ पैशाच्या पुरवठ्याच्या वाढीवर नियंत्रण ठेवणे.

३ खासगी गुंतवणुकीवरील निर्बंध हटवणे. विशेषतः पायाभूत सुविधांमधील निर्बंध हटवणे.

४ कॉर्पोरेट आणि वैयक्तिक आयकर कमी करणे.

५ उत्पादन शुल्क आणि सीमाशुल्क कमी करणे इ.

## ८.७ सारांश

केन्स नंतरचे अर्थशास्त्र हा एक व्यापक प्रवाह आहे. केन्सची परंपरा खंडीत करण्यासाठी विकसित केलेल्या सिध्दांताची श्रेणी या विचारसरणीमध्ये समाविष्ट आहे. पारंपारिक विचारांना छेद देणारा असा एक सिध्दांत म्हणजे मिल्टन फ्रीडमनचा सिध्दांत. त्याने चलनसंख्यामान सिध्दांतात पैशाला सामान्य किंमतीच्या पातळीशी एकत्रित केले. पैशाच्या साठ्यातील बदलामुळे किंमत पातळी किंवा उत्पन्न किंवा दोन्ही एकाच दिशेने बदलतात असा त्यांचा तर्क आहे. याचा अर्थ असा होतो की जर अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगारापेक्षा कमी पातळी असेल, तर पैशाच्या पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे उत्पादन आणि रोजगारत वाढ होईल कारण अल्पावधीतच खर्च वाढतो. पैशाच्या पुरवठ्यातील बदल दीर्घकाळासाठी पैशांच्या शिलकीवर परिणाम करु शकत नाहीत.

मिल्टन फ्रीडमन आणि एडमंड फेल्प्स यांचा आणखी एक उल्लेखनीय युक्तीवाद म्हणजे फिलिप्स वक्राच्या दीर्घकाळ चालणार्या वागणुकीबद्दलची अभिव्यक्ती. फिल्प्सिने चलनवाढ दर आणि बेरोजगारी दर यांच्यातील व्यस्त संबंधासाठी युक्तीवाद केला. ज्याचा अर्थ असा होता की सरकार काही प्रमाणात चलनवाढ स्वीकारुन बेरोजगारी कमी करु शकते. परंतु मिल्टन फ्रीडमन आणि एडमंड फेल्प्स, दीर्घकाळात कामगारांमध्ये, वास्तविक वेतन आणि महागाई-समायोजित पैशाची मजुरी विचारात घेतात. त्यामुळे सरकारला किमान दीर्घकालीन उच्च चलनवाढीसह कमी बेरोजगारी मिळू शकत नाही.

केन्सच्या परंपरेनंतर विकसित झालेली विचारसरणी म्हणजे नवीन केन्सीयन विचार होय. मॅनकीव यांनी असा युक्तीवाद विकसित केला की अर्थव्यवस्थेत अनैच्छिक बेरोजगारी अस्तित्वात आहे कारण समतोल साधण्यासाठी कंपन्या किंमत समायोजित करु इच्छित नाहीत. किंमती समायोजित करुन समतोल साधणे कठीण आहे. कंपन्या किंमती बदलत नाहीत आणि किंमत चिकट/ताठर झाल्यामुळे अर्थव्यवस्थेत अनैच्छिक बेरोजगारी आहे.

लॉर्ड केन्सने त्याच्या सिध्दांतामध्ये प्रभावी मागणीच्या महत्त्वावर जोर दिला. त्यांच्या मते, बेरोजगारी कमी करण्याचा उपाय म्हणजे प्रभावी मागाणी वाढवणे. परंतु अर्थशास्त्रज्ञांनी ओ नोंदवले की आधुनिक काळात महागाई आणि बेरोजगारी एकाच वेळी अस्तित्वात आहे या स्थितीला चलनवाढजन्य मंदी ओ म्हणतात. केन्सचा सिध्दांत या समस्येवर उपाय देऊ शकला नाही. परंतु असे सुचवण्यात आले की चलन पुरवठा कमी करणे, वित्तीय धोरण कमी करणे यासारख्या उपायांमुळे अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढण्यास मदत होऊ शकते.

## ८.८ प्रश्न

१ फ्रीडमनची पैशाची मागणी स्पष्ट करा. त्याच्या मर्यादा काय आहेत?

२ दीर्घकालीन फिलिप्स वक्र चे वर्तन स्पष्ट करा.

३ नाममात्र किंमत चिकटपणाच्या/ताठरपणाच्या मॅनकीव्ह प्रारुपाचे टिकात्मक परीक्षण करा.

४ चलनवाढजन्य मंदीची कारणे आणि परिणाम काय आहेत?

❖❖❖❖

munotes.in